Epaper www.janmadhyam.com



# जनमाध्यम

आज शिवजयंती

एक प्रतिष्ठित सवय



▪ अमरावती, गुरुवार १९ फेब्रुवारी २०२६ ▪ मूल्य ४.०० ▪ पृष्ठ १०


# बसची ऑटोला धडक; ७ वीच्या विद्यार्थिनीसह पाच जणांचा मृत्यू

## वरुड-राजुरा मार्गावर भीषण अपघात



माही मांगुळकर
मृतक विद्यार्थीनी

**अमरावती/प्रतिनिधीः**-वरुड-राजुरा मार्गावर राज्य परिवहन मंडळाच्या इलेक्ट्रॉनिक शिवाई बसने ऑटो रिक्षाला धडक दिली. या भीषण अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाली तर एका जखमीचा उपचारासाठी रुग्णालयात जाताना मृत्यू झाला. ही घटना आज बुधवार १८ फेब्रुवारीला सकाळी १०.३० वाजता सुमारास समोर आली आहे. या अपघातात दोन जण जखमी आहे. मृतांमध्ये एका शाळकरी मुलीचा देखील समावेश आहे.

माही प्रवीण मांगूळकर (वय १३, रा. वाडेगाव), ऑटो चालक कैलास घनश्याम नागदेवे (वय ४२, रा. वाडेगाव), हरिभाऊ दौलत शिंदे (वय ८३, रा. वघाळ) आणि चिंतामन सदाशिवराव नागदेवे (वय ६०, वाडेगाव) अशी मृतांची नावे आहेत. या अपघातात प्रतिभा लाड, (रा. वडाळा), मोहिनी वनदेव भोरे (वय १८, रा. राजुरा बाजार) हे गंभीर जखमी झाले आहेत. राजकुमार भलावी (वय ५५, रा. गव्हाणकूंड) हे गंभीर जखमी झाल्यानंतर त्यांना नागपूरला नेत असताना रस्त्यात त्यांचा मृत्यू झाला. इतर दोघांवर उपचार सुरू आहेत. माहितीनुसार एमएच ४९/बीझेड ९४३६ क्रमांकाची शिवाई एसटी बस वरूडहून तळेगाव मार्गे वर्धा येथे जात होती. वरुड तालुक्यातील ग्रामीण भागातील काही विद्यार्थी शिक्षणासाठी ऑटो रिक्षा एमएच २७ एआर १८२३ ने वरुड शहराकडे जात होते. या रिक्षात विद्यार्थ्यांसोबतच काही स्थानिक नागरिकही प्रवास करत होते. सकाळी नेहमीप्रमाणं हा प्रवास सुरू असताना वरुड-राजुरा बाजाराजवळ भरधाव वेगातील एसटी बसनं ऑटो रिक्षाला जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की चौघांचा जागीच मृत्यू झाला तर राजकुमार भलावी (५५, गव्हांकुंड) यांचा उपचारासाठी घेऊन जाताना रस्त्यातच मृत्यू झाला. प्रतिभा लाड, मोहिनी भोरे यांच्यावर नागपूरमध्ये उपचार सुरू आहे.

**बस चालक ताब्यात-** अपघाताची माहिती मिळताच वरूड पोलीस तिथे पोहोचले. पोलिसांनी पंचनामा केला आणि जखमी आणि मृतकांना रुग्णालयात पाठविले. प्रकरणाची गंभीरता पाहून एसटी बस चालक निखिल रामभाऊ वरठी (वय २६, तळेगांव श्यामजी पंत, आष्टी, जि. वर्धा) याला ताब्यात घेण्यात आले आहे. सुरज उर्फ चक्रधर जनार्धन नागदिवे (वाडेगांव) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या अपघातामुळे वरुड-राजुरा बाजार रस्त्यावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. हा अपघात नेमका बसचालकाच्या चुकीमुळे झाला की रिक्षा चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे याचा पोलीस तपास करत आहेत.

### वाडेगावांत पसरली शोककळा

अपघातामध्ये शाळेत जाणाऱ्या एका विद्यार्थिनीसह वाडेगावातील ३ लोकांचा मृत्यू झाल्याने परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघातातील अन्य दोन प्रवाशांची प्रकृती चिंताजनक असल्याचं समजते. जखमींवर प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना तातडीनं पुढील उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. जखमींना वाचवण्यासाठी डॉक्टर शर्थीचे प्रयत्न करत आहेत.

# ब्लॅक बॉक्स नष्ट होणे अशक्य : जय पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातामध्ये अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स डॅमेज झाल्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या. यासंदर्भात जय पवार यांनी इन्स्टाग्राम स्टोरी शेअर करत प्रतिक्रिया दिली आहे. जय पवार यांनी विमान अपघातात ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होउ शकत नाहीत, असे म्हटले आहे. याशिवाय व्हीएसआरला तात्काळ उड्डाणे चालवण्यास बंदी घालावी, अशी मागणी देखील जय पवार यांनी केली आहे.

विमान अपघातात ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होउ शकत नाहीत; महाराष्ट्रातील जनतेला आपल्या हृदयाला हादरवून टाकणा-या या दुर्घटनेचे संपूर्ण, पारदर्शक आणि निर्विवाद सत्य जाणून घेण्याचा हक्क आहे. व्हीएसआरला तात्काळ उड्डाणे चालविण्यास बंदी घालून त्यांच्या विमानांच्या देखभालीत झालेल्या संभाव्य गंभीर गैरव्यवहाराबद्दल सखोल आणि निष्पक्ष चौकशी केलीच पाहिजे असे जय पवार यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम स्टोरीच्या माध्यमातून म्हटले आहे.



अजित पवारांच्या कुटुंबातील व्यक्तीकडून पहिल्यांदाच अजित पवार यांच्या अपघातावर जाहीर प्रतिक्रिया देण्यात आली आहे. जय पवार यांच्याकडून इन्स्टाग्राम पोस्ट करत पारदर्शक सत्य जाणून घेण्याची मागणी करण्यात आली आहे. व्हीएसआरला तत्काळ उड्डाणे चालविण्यास बंदी घालण्याची तसेच विमानांच्या देखभालीत झालेल्या संभाव्य गंभीर गैरव्यवहाराबद्दल सखोल चौकशीची मागणी जय पवार यांनी केली आहे. जय पवार यांनी देखील व्हीएसआरच्या चौकशीची मागणी करत रोहित पवार यांच्या प्रमाणे भूमिका घेतल्याचे पाहायला मिळते.

**राष्ट्रवादीकडून सीबीआय चौकशीची मागणी-** अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार देखील उपस्थित होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय मार्फत चौकशी करण्याची मागणी केली होती. रोहित पवार यांनी आतापर्यंत अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात तिसरी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी व्हीएसआरवर अनेक आरोप केल्याचे पाहायला मिळाले. अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात डीजीसीएने दिलेल्या स्पष्टीकरणावर देखील रोहित पवार यांनी आक्षेप घेतला. याशिवाय व्हीएसआर विमान कंपनी आणि तेलुगु देसम पार्टीच्या नेत्यांचे संबंध असल्याने केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांना पदावरुन हटवण्यात यावे, अशी देखील मागणी रोहित पवार यांनी केली होती. अजित पवार यांना जे विमान देण्यात आलेले होते, त्या विमानाचे इंजिन देखील बिघाड असलेले होते, असा दावा देखील रोहित पवार यांनी केला होता.

# विमान मुद्दाम आदळण्यात आले-रोहित पवार


## स्फोट मोठा व्हावा यासाठी अतिरिक्त इंधन कॅनमध्ये ठेवले

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ. रोहित पवार यांनी आज पुन्हा पत्रकार परिषद घेउन दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले. हा अपघात नाही तर घातपात असल्याचा संशय व्यक्तकरणा-या रोहित पवार यांनी त्या पुढे जात हे विमान मुद्दाम आदळवण्यात आल्याचा संशय व्यक्तकरत खळबळ उडवून दिली आहे. बारामतीला दृश्यमानता कमी होती तर विमान उतरवण्याच्या प्रयत्नच करायला नको होता. विमान मुंबईला परत नेता आले असते. विमानात इंधन मोठ्या प्रमाणात होते. या शिवाय इंधनाचे अनेक कॅन विमानात ठेवलेले होते. त्यामुळे हे विमान मुद्दाम आदळवण्यात आले आहे की काय असे आम्हाला वाटायला लागले आहे असा संशय रोहित पवार यांनी व्यक्त केला.

अपघाताच्या तपासाला काहीशी गती आली असली तरी अद्यापही अपेक्षित वेगाने तपास होत नाही. हा तपास निष्पक्ष होण्यासाठी देशाबाहेरील दोन एजन्सीची मदत घेण्याची आणि देशाचे व या तपासावर लक्ष ठेवण्यासाठी राज्याचे आणि देशाचे विरोधी पक्षनेते, कुटुंबातील आणि पक्षातील प्रतिनिधी आणि काही तज्ज्ञांची समिती नेमण्यात यावी अशी मागणीही रोहित पवार यांनी केली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमानअपघातानंतर रोहित पवार यांनी मुंबई आणि दिल्ली अशा दोन पत्रकारपरिषदा घेउन सादरीकरण केले. यात त्यांनी अपघाताबाबत विस्तृत माहिती देत शंका उपस्थित केल्या. बुधवारी पुन्हा एकदा पत्रकारपरिषद घेत त्यांनी सादरीकरण



करत अनेक नवीन मुद्दे उपस्थित केले आहेत. मुंबईवरून बारामतीला जाताना जास्त इंधन भरण्याची गरज नव्हती. तरीही अजितदादांच्या विमानाच्या पंखातील इंधनाच्या टाक्या पूर्णपणे भरण्यात आल्या होत्या. हे विमान बारामतीवरुन हैदराबादला जाणार होते. तिथे विमानात पुन्हा इंधन भरता आले असते. मात्र हे विमान सुरतवरुन मुंबईला येत असतानाच त्याच्या इंधन टाक्या पूर्णपणे भरल्या होत्या. इतकेच नाही तर विमानाच्या टायलेटजवळ इंधनाचे अतिरिक्तकॅनही ठेवण्यात आले होते. तसेच दृश्यमानतेचाही मुद्या होता. त्यामुळेच हे विमान मुददामहून आदळवण्यात आले असा खळबळजनक आरोप रोहित पवार यांनी केला आहे. काकपीट व्हाईस रेकार्डर बाबतचा सरकारी नियम आहे की २ तास संभाषण रेकार्ड झाले पाहिजे. मात्र या विमानातील त्याची क्षमता केवळ ३० मिनिटे इतकी होती. हे विमान आधी खरेदी करण्यात आले आणि त्यानंतर रजिस्टर करण्यात ➪(पान २ वर)



# भारताने सलग चौथा सामना जिंकला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताने २०२६ च्या टी-२० विश्वाचषकात सलग चौथा सामना जिंकला आहे. बुधवारी झालेल्या तिस-या सामन्यात संघाने नेदरलँड्सचा १७ धावांनी पराभव केला. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या ग्रुप अ सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. भारतीय संघाने २० षटकांत ६ गडी बाद १९३ धावा केल्या. प्रत्युत्तरात नेदरलँड्स २० षटकांत ७ गडी बाद १७६ धावाच करू शकला. वरुण चक्रवर्तीने ३ विकेट घेतल्या. शिवम दुबेने २ विकेट घेतल्या. जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पंड्या यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. टीम इंडियाकडून शिवम दुबेने ६६ धावा केल्या. हे त्याचो विश्वाचषकातील पहिलो अर्धशतक आहे. हार्दिक पंड्याने ३० धावा केल्या. लोगान व्हॅन बीकने ३ विकेट घेतल्या. आर्यन दत्तने २ विकेट घेतल्या.

# राज्यातील 5 टक्के मुस्लिम आरक्षण रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यामध्ये पुन्हा एकदा आरक्षणाच्या मुद्यावरून राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. राज्य सरकारकडून मुस्लिम समाजाला देण्यात आलेले ५ टक्के आरक्षण हे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आरक्षण रद्द झाल्यामुळे आणि जात प्रमाणपत्रांची प्रक्रिया थांबवल्यामुळे मुस्लिम समाजात मोठे अस्वस्थतेचे वातावरण आहे. विशेषतः शैक्षणिक प्रवेश आणि नोक-यांमध्ये या आरक्षणाचा लाभ घेउ इच्छिणा-या तरुणांसमोर आता मोठे संकट उभे राहिले आहे. या निर्णयावरून आगामी काळात राज्यभरात राजकीय संघर्ष तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत




यापूर्वी राज्यामध्ये मराठा आरक्षणावरून मोठा वाद पेटला. ओबीसीमधून मराठा आरक्षण देण्याच्या जरांगे पाटील यांच्या मागणीमुळे ओबीसी समाज आक्रमक झाला होता. यानंतर आता मुस्लिम समाजाचे ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आल्यामुळे वाद निर्माण झाला आहे. हा निर्णय जाहीर होताच, विरोधी पक्षांनी, विशेषतः काँग्रेसने सरकारवर हल्लाबोल करण्यास सुरुवात केली. मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी हा निर्णय अत्यंत दुर्दैवी आणि मुस्लिम समुदायाच्या हक्कांवर हल्ला असल्याचे म्हटले. सरकारच्या सबका साथ, सबका विकास या घोषणेवर➪(पान २ वर)

# भारतात कधी परतेन सांगू शकत नाही

## विजय मल्याचा ऊच्च न्यायालयात दावा

**मुंबई/प्रतिनिधी :** आपण भारतात कधी परत येउ हे सांगू शकत नाही, असे फरारी आर्थिक गुन्हेगार (एफईओ) आणि मद्यसम्राट विजय मल्या याच्यातर्फे गुरुवारी उच्च न्यायालयात सांगण्यात आले. भारतात येउन कायद्याच्या वैधतेला आव्हान देणारे प्रकरण चालवावे, असे नमूद करून भारतात येणार की नाही हे स्पष्ट करण्यासाठी न्यायालयाने मल्या याला मागील सुनावणीच्या वेळी शेवटची संधी दिली होती. त्या पार्श्वभूमीवर मल्या याच्या याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली. त्यावेळी, इंग्लंड आणि वेल्स सोडण्याची किंवा तसा प्रयत्न करण्याची अथवा कोणत्याही आंतरराष्ट्रीय प्रवास दस्तऐवजासाठी अर्ज करण्याची आपल्याला परवानगी नाही, ते स्वतःकडे ठेवण्याची आपल्याला परवानगी नाही. त्यामुळे, भारतात कधी➪(पान २ वर)










# जन संवाद उपक्रमामुळे शासन-प्रशासन लोकाभिमुख होणार - आ.प्रवीण तायडे

## नागरिकांशी साधला सवांद, तक्रारीचे केले निराकरण





अचलपूर उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात संपन्न झालेल्या जन संवाद व तक्रार निवारण कार्यक्रमाला महावितरण विभागीय कार्यालय अचलपूरचे कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता व अधिकाऱ्यांची अनुपस्थिती होती. यामुळे सावळी दा. येथे गेल्या चार दिवसापासून शेतकऱ्यांना विद्युत केबल जळाल्यामुळे खंडीत विद्युत पुरवठा बाबत काही शेतकऱ्यांनी आमदार प्रवीण तायडे यांच्या समक्ष तक्रार दाखल केली . पण यावेळी अचलपूर महावितरण विभागीय कार्यालयाचे अधिकारी अनुपस्थित होते. याबाबतही आमदार प्रवीण तायडे यांनी रोष व्यक्त केला व त्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून तात्काळ शेतकऱ्यांना होणाऱ्या असुविधेबाबत कारवाई करण्याचे निर्देश दिले.

**अचलपूर/प्रतिनिधीः-**

अचलपूर तालुका स्तरावर जनसंवाद व तक्रार निवारण उपक्रमामुळे शासन प्रशासन, लोकाभिमुख व गतिमान होणार असून या उपक्रमाची संकल्पना प्रत्यक्षात साकार करणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभारही आज अचलपूर उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात संपन्न झालेल्या जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमांमध्ये अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी मानले.

यावेळी विविध विभागाचे अधिकारी - कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . अचलपूर- परतवाडा जुळ्या शहरातून नव्हे तर तालुक्यातून नागरिक आपले विविध समस्या घेऊन या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. विविध विभागाशी संबंधित असलेल्या तक्रारीचे निवारण सुद्धा तत्काळ आमदार प्रवीण तायडे यांनी केले .विशेष म्हणजे या कार्यक्रमात महावितरण विभागीय कार्यालय अचलपूर व भूमि अभिलेख कार्यालयाचे अनेक तक्रारी आमदार प्रवीण तायडे यांच्या समक्ष नागरिकांनी मांडल्या. याची तात्काळ दखल घेत दोन्ही विभागातील अधिकाऱ्यांना आमदार प्रवीण तायडे यांनी धारेवरही घेतले. यावेळी मंचावर अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव ,तहसीलदार सुदर्शन शहारे ,अचलपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुधीर अरबट ,सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता अभय कुमार बारबदे,कृषी अधिकारी अक्षय शिरसागर आदी मान्यवर उपस्थित होते . यावेळी आमदार प्रवीण तायडे यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की ,जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम हा सर्व सामान्य नागरिकांना विविध शासकीय विभागाशी संबंधित कामे तत्काळ मार्गी लावण्यासाठी मोठ्या दिलासा देणारी ठरत आहे . ते पुढे म्हणाले की, या उपक्रमामुळे शासन, प्रशासन गतिमान व लोकाभिमुख होत आहे . त्यांनी हा उपक्रम प्रत्यक्षात साकार करणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभारही मानले . यावेळी आ. प्रवीण तायडे यांनी नागरिकांशी संवाद साधला. नागरिकांच्या विविध विभागाशी संबंधित आलेल्या तक्रारीचे निवारण ही केलें आणि विविध विभागाचे अधिकारी यांना आलेल्या तक्रारी तात्काळ मार्गी लावून अहवाल सादर करण्याचे निर्देशही आमदार प्रवीण तायडे यांनी यावेळी दिले. अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी प्रास्ताविकेतून या कार्यक्रमाच्या रूपरेषा संदर्भात माहिती दिली दिली . हा उपक्रम अचलपूर तालुक्यातील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. यावेळी विविध विभागाचे अधिकारी - कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. यामध्ये अचलपूर नगरपरिषद, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अचलपूर पंचायत समिती ,महिला व बालविकास विभाग, पशुवैद्यकीय विभाग ,राज्य परिवहन महामंडळ परतवाडा, आरोग्य विभाग ,महावितरण विभाग ,पाणीपुरवठा विभाग, दुय्यम निबंधक अचलपूर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग ,सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूर, जिल्हा परिषद लघु सिंचन विभाग, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग ,अचलपूर कृषी विभाग ,अचलपूर भूमी अभिलेख कार्यालय ,वन विभाग ,सामाजिक वनीकरण विभाग चे अधिकारी-कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते . याप्रसंगी आमदार प्रवीण तायडे यांनी नागरिकांच्या अनेक तक्रारी भूमी अभिलेख व महावितरण विभागीय कार्यालय शी संबंधित असल्याने दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी खडे बोल सुनावले . नागरिकांच्या तक्रारी भविष्यात येऊ नये त्यासाठी ठोस उपाय योजना राबविण्याचे निर्देश ही आ. प्रवीण तायडे यांनी अधिकाऱ्यांना दिले .यावेळी भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष कुंदन यादव , विशाल काकड ,रुपेश ढेपे, भाजपा पदाधिकारी ,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## १ व १० वरिल उर्वरित

### विमान मुद्दाम आदळण्यात

आले. सगळे नियम धाब्यावर बसवण्यात आले होते. तसेच या विमानाचे ५ हजार तास उड्डाण करण्याची परवानगी होती. परंतु या विमानाने ८ हजार तासांपेक्षा जास्त उड्डाण केले होते. तसेच विमान पडल्यानंतर काही वेळाच्या अंतराने स्फोट झाले. त्या विमानात अधिकचे इंधन होते. विमानात जास्त प्रमाणात इंधन असल्यानेच अपघातानंतर वारंवार स्फोट झाले, असा दावा रोहित पवारांनी केला. तसेच व ?शरूम जवळ हे इंधन टँक होते. तिथेच ब्लॅक ब ?क्स असतो. सध्या ब्लॅकब ?क्स जळला असे सांगत असतील. तर हे सगळेच संशयास्पद असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला. अजितदादांच्या अपघाताची आता विविध प्रकारे चौकशी सुरू आहे. पण हा तपास निष्पक्ष होण्यासाठी देशाबाहेरील दोन एजन्सीची मदत घेण्याची आणि देशाचे व या तपासावर लक्ष ठेवण्यासाठी राज्याचे आणि देशाचे विरोधी पक्षनेते, कुटुंबातील आणि पक्षातील प्रतिनिधी आणि काही तज्ज्ञांची समिती नेमण्यात यावी अशी मागणीही रोहित पवार यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबतची चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचली होती. एकत्रित पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांची नियुक्ती करण्याचा निर्णय झाला होता, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे(पवार) नेते आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केला. दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाच्या चर्चेत अजितदादा सक्रियपणे सहभागी होते. इतकेच नव्हे तर अमोल कोल्हे यांना प्रदेशाध्यक्ष करण्याचा निर्णयही ठरला होता. या विलीनीकरणासंदर्भात सुमारे १३ बैठका ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्या दक्षिण मुंबईतील निवासस्थानी झाल्या. ज्यांना शंका आहे त्यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासावे, असे आव्हानही रोहित पवार यांनी अजित पवार गटाच्या नेत्यांना दिले. यावर्षीच्या सुरुवातीला अजित पवार यांच्यासोबत झालेल्या संवादातून या चर्चांना सुरुवात झाली होती. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या दिवशी आम्ही एकत्र प्रवास केला होता. रोहित पवार यांनी आज जे सांगितले ते काही दिवसांपासून सार्वजनिक चर्चेत आहे. मात्र चर्चा करून सर्व काही निश्चित करणारे व्यक्ती आता आपल्यात नाहीत. त्यामुळे ठरलेल्या गोष्टींवर बोलण्यात अर्थ नाही, असा खुलासा खासदार ड?. अमोल कोल्हे यांनी केला आहे.

### राज्यातील ५ टक्के मुस्लिम

टीका करताना वर्षा गायकवाड म्हणाल्या की, एकीकडे सरकार या घोषणेला प्रोत्साहन देते आणि दुसरीकडे मागासवर्गीयांच्या प्रगतीचा मार्ग रोखते, अशी टीका वर्षा गायकवाड यांनी केली आहे. पुढे त्या म्हणाल्या की, मुंबई उच्च न्यायालयाने यापूर्वी मुस्लिम समाजासाठी शिक्षणात ५ टक्के आरक्षण मंजूर केले होते. तरीही, ते लागू करण्याऐवजी, सरकारने जुने अध्यादेश कालबा होउ दिले आणि आता संपूर्ण प्रक्रिया रद्द केली आहे. काँग्रेसचा आरोप आहे की, मागासवर्गीयांना मुख्य प्रवाहात आणण्याऐवजी सरकार त्यांना पुन्हा अस्पष्टतेत ढकलत आहे, असा आरोप गायकवाड यांनी केला. २०१४ मध्ये तत्कालीन सरकारने मराठा समाजासाठी १६ टक्के आणि मुस्लिम समाजासाठी ५ टक्के आरक्षण जाहीर केले होते. तथापि, कायदेशीर अडथळे आणि अध्यादेशाची मुदत संपल्याचा हवाला देत, सध्याच्या सरकारने या जुन्या प्रक्रिया रद्द करण्याचा पर्याय निवडला आहे. उच्च न्यायालयाच्या अंतरिम स्थगिती आणि अध्यादेशाची मुदत संपल्यामुळे हे पाउल उचलणे आवश्यक होते असा प्रशासनाचा युक्तिवाद आहे.**सरकारचा दुटप्पीपणा उघड-**एकीकडे विकासाच्या गप्पा मारायच्या आणि दुसरीकडे आरक्षणासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे मिळवण्याचे मार्गच बंद करायचे, हा सरकारचा शुद्ध दुटप्पीपणा आहे, असा आरोप वर्षा गायकवाड यांनी केला. उच्च न्यायालयाने मुस्लिम समाजाला शिक्षण क्षेत्रात ५ टक्के आरक्षण देण्यास मान्यता दिली असतानाही, त्याची अंमलबजावणी न करणे हे लोकशाहीसाठी घातक असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.**हक्कांवर गदा आणि तांत्रिक कारणांचा आधार-** सरकारने अध्यादेश कालबा झाल्याचे आणि न्यायालयाच्या स्थगितीचे तांत्रिक कारण देउन आरक्षणाला ब्रेक लावला आहे. यावर भाष्य करताना गायकवाड म्हणाल्या की, समाजातील मागास घटकांना मुख्य प्रवाहात आणणे हे सरकारचे कर्तव्य असते. परंतु, हे सरकार त्यांना जाणीवपूर्वक पुन्हा अंधारात ढकलण्याचे काम करत आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा आदर करून अंमलबजावणी करण्याऐवजी जुने शासन निर्णय रद्द करणे, ही मुस्लिम समाजाची मोठी फसवणूक आहे.

दुसरीकडे, माजी खासदार इम्तियाज जलील यांनी या प्रकरणात एक वेगळी बाजू मांडली आहे. त्यांनी मुस्लिम समाजातील धार्मिक नेतृत्वावर (मौलानांवर) निशाणा साधला. जलील म्हणाले की, निवडणुकीच्या दोन-तीन महिने आधी सक्रिय होणारे मौलाना आता गप्प का?

शैक्षणिक व नोकरीतील आरक्षण रद्द करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत चुकीचा व अल्पसंख्याक समाजावर अन्याय करणारा आहे. आरक्षण रद्द करुन भाजपा सरकारने अल्पसंख्याक समाजाला विकासाच्या प्रवाहात येण्यापासून रोखण्याचे पाप केले असून भाजपा सरकार मागासवर्गीय व अल्पसंख्याक समाजाच्या विरोधी आहे, असे माजी मंत्री आणि काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य नसीम खान यांनी म्हटले आहे.

### भारतात कधी परतेन सांगू

परत येउ हे स्पष्टपणे सांगू शकत नाहीत, असे मल्या याच्यातर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. दरम्यान, मल्या हा त्याच्याविरोधात सुरू केलेल्या कारवाईपासून पळ काढून दिलासा मागू शकत नाही, असेही मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालीला खंडपीठाने मल्या याला उपरोक्त भूमिका स्पष्ट करण्याचा इशारा देताना स्पष्ट केले होते. मल्या हा परत येण्यास इच्छुक नाही असे प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट करू शकतो. परंतु, त्यला फरारी आर्थिक गुन्हेगार कायद्याला आव्हान द्यायचे असल्यास भारतीय न्यायक्षेत्रात यावेच लागेल, असेही न्यायालयाने मल्याला भारतात परत येणार की नाही याबाबत भूमिका स्पष्ट करण्याची शेवटची संधी देताना स्पष्ट केले.

### आदिवासी शेतकऱ्यांसाठी बच्चू कडूची

केलं होतं. आमदारांच्या घरांसमोर निदर्शनं तसंच अमरावती ते यवतमाळ दरम्यान दोनशे किलोमीटर पदयात्रा काढण्यात आली. तसंच नागपूर इथं मोठं चक्काजाम आंदोलनही करण्यात आलं. या सर्व आंदोलनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जूनपर्यंत कर्जमाफीबाबत निर्णय घेण्याचं आश्वासन दिलं होतं. मात्र अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्यामुळं शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचं वातावरण आहे,असं बच्चू कडू यांनी सांगितलं.

**सर्वाधिक संकटग्रस्त वर्ष-** पत्रकार परिषदेत बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या. २०१८ मध्ये सोयाबीनचा भाव सुमारे ४ हजार रुपये होता, तो २०२६ मध्ये साडेतीन हजारांवर आला. कापसाचे भाव वाढले असताना खरेदी केंद्र शासनानं बंद ठेवली आहेत. काही ठिकाणी केवळ कापसाची २० टक्केच खरेदी झाली. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील काही जिल्ह्यात तीव्र दुष्काळाचा परिणाम झाला. दुष्काळ पडल्याशिवाय कर्जमाफी कशी करता येईल? असा मुख्यमंत्र्यांचा पूर्वीचा सवाल आता निरर्थक ठरला असून चालू वर्ष हे दुष्काळ आणि हमीभाव न मिळाल्यानं सर्वाधिक संकटग्रस्त वर्ष ठरलं आहे, अशी खंत बच्चू कडू यांनी व्यक्त केली.

**मेळघाटातील मूलभूत प्रश्नांवर लक्ष -** शेतकऱ्यांच्या कर्जमाफी बरोबरच मेळघाटातील गंभीर प्रश्नांकडेही बच्चू कडू यांनी लक्ष वेधलं. 'आजही मेघाटातील २२ गावांत वीज पोहोचलेली नाही. काही गावात पाण्याअभावी मृत्यू झाले तरी शासनानं त्या गावातील प्रश्न सोडवले नाहीत. रुग्णवाहिकेची सुविधा आजही मेळघाटात नाही. काटकुंभ सारख्या भागातून एखाद्या रुग्णाला अमरावतीत आणायचं तर चार तास लागतात. या भागात व्यवस्थित रस्ते देखील नाही. रुग्णवाहिका पोहोचण्याची व्यवस्था नाही. गडचिरोलीमध्ये ज्याप्रकारे एअर ॲम्बुलन्स म्हणून हेलिकॉप्टर सेवा आहे. अगदी तशीच सेवा मेळघाटात का उपलब्ध केली जात नाही,असा प्रश्न देखील बच्चू कडू यांनी उपस्थित केला.

**स्काय वॉक लटकला-** चिखलदरा येथील स्काय वॉक पर्यटन प्रकल्पाबाबत बच्चू कडू यांनी शंका व्यक्त केली.स्काय वॉकचं काम ८० टक्के पूर्ण झालं असताना आता हा स्काय वॉक मध्येच लटकला आहे. या स्काय वॉकला खोल दरीतून पिल्लर उभारून टेका देण्याची गरज आहे. मात्र, या जंगलात पिल्लर उभारण्याची परवानगी वनविभाग देऊ शकत नाही. त्यामुळं हा प्रकल्प पूर्ण होणार की नाही?, असा प्रश्न बच्चू कडू यांनी उपस्थित केला. तसंच मध्य प्रदेशात जंगल भागात चांगले रस्ते बांधले गेले जात असताना महाराष्ट्रात मेळघाटातील रस्त्यांसाठी अडचणी का निर्माण होतात? असा सवाल देखील बच्चू कडू यांनी उपस्थित केला.

### 'जनसंवाद'मध्ये १२००

अंजनगाव सुर्जी १२३, अचलपूर ७६, चांदुर बाजार ४८, धारणी ४३, चिखलदरा ८०, मोर्शी ७६, वरूड ११०, चांदुर रेल्वे १३६, धामणगाव रेल्वे १३४, नांदगाव खंडेश्वर ४३ अशा एकुण ९९७ तक्रारी नागरीकांनी दाखल केल्या.

अचलपूर येथे आमदार प्रविण तायडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, मोर्शी येथे उपजिल्हाधिकारी प्रसेनजित चव्हाण, नांदगाव खंडेश्वर येथे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसिलदार अश्विनी जाधव, अमरावती येथे निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, तहसिलदार विजय लोखंडे आदींनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

धारणी तहसील कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीत जनसंवाद कार्यक्रम पार पडला. यात ग्रामीण ते शहरी भागातील नागरिकांनी विविध विभागांशी संबंधित समस्या थेट प्रशासनासमोर मांडल्या. विशेषतः वीज वितरण, जिल्हा परिषदेचा ग्रामीण पाणीपुरवठा, जलसंधारण, महसूल, शिक्षण, घरकुल योजना, पुनर्वसन, तसेच गॅस वितरणाशी निगडीत तक्रारींचा समावेश होता. धारणी येथील कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, धारणी नगरपंचायत अध्यक्ष सुनील चौथमल, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, जिल्हा जलसंधारण अधिकारी सुनिल जाधव, तहसिलदार प्रदीप शेवाळे, गटविकास अधिकारी विजय गायकवाड आदी उपस्थित होते. नागरिकांनी शासन दरबारी आपल्या तक्रारी अधिकृतपणे नोंदविल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांनी प्राप्त तक्रारींचा आढावा घेत संबंधित विभागांशी समन्वय साधून तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश दिले. या उपक्रमात नागरिकांच्या समस्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्याची संधी मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. जनसंवादाच्या माध्यमातून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न होत आहे.

### 'मुळव्याध स्पेशालिस्ट'चा

प्राप्त झाल्या होत्या. आयुर्वेद, होमिओपॅथी, इलेक्ट्रोपॅथी आणि ॲलोपॅथी औषधांचा एकत्रित वापर करून जनरल प्रॅक्टिस तसेच मुळव्याधीवरील शस्त्रक्रिया केल्याचा आरोप होता. तक्रारींची पडताळणी करण्यासाठी मुख्यालयातील डॉ. रुपेश खडसे आणि शहरी आरोग्य केंद्र बडनेराचे वैद्यकीय अधिकारी डॉ. इमरान शहा यांच्या पथकाने सापळा रचला. बनावट रुग्ण पाठवून तपासणी केली असता संबंधिताने २०० रुपये फी स्वीकारून ॲलोपॅथी औषध लिहून दिले. तसेच मुळव्याधीच्या उपचारासाठी १० ते १५ हजार रुपये खर्च येईल, असे सांगितल्याचे समोर आले. यानंतर पथकाने दवाखान्यावर धाड टाकत शैक्षणिक पात्रता व वैद्यकीय परवान्याची कागदपत्रे मागितली. मात्र कोणतीही वैध नोंदणी अथवा प्रमाणपत्र सादर करता आले नाही. समाधानकारक उत्तर न मिळाल्याने पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली.

**वैद्यकीय व्यवसाय अधिनियमांतर्गत गुन्हा-** मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या नेतृत्वाखाली संबंधितावर वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ च्या कलम ३३, ३३-अ, ३४, ३५ व ३६ अन्वये बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरात अनधिकृत वैद्यकीय व्यवसायाला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे मनपा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी संशयास्पद वैद्यकीय प्रॅक्टिसची माहिती आरोग्य विभागाला देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### छत्रपती शिवाजी महाराजांचे

शिवाजी महाराज यांच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलूंविषयी माहिती दिली. रयतेची काळजी घेणारा, दुष्काळाच्या काळात राज्याची तिजोरी रयतेसाठी खुली करणारा, स्त्रियांचा आदर करणारा, दूरदृष्टी व सूक्ष्म नियोजनात तरबेज, शेत जमिनीची मोजणी करणारा पहिला राजा ते आधुनिक विचारधारा अंगी कारणारा राजा अशा विविध पैलूंवर त्यांनी दाखल्यांसह माहिती दिली.

वैभव मस्के यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाची विविध दाखल्यांसह माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराजांचा दूरदृष्टीकोन, गुणग्राहकता, उत्तम व्यवस्थापन आणि सर्वधर्मसमभाव वृत्ती, त्यांची प्रसंगावधानता ही विविध प्रसंगातून त्यांनी यावेळी व्यक्त केली.

शहरात शिवजयंतीच्या दिवशी, म्हणजे १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता भीमटेकडी येथून भव्य बाईक रॅली काढण्यात येणार आहे. ही रॅली यशोदा नगर चौक, कल्याण नगर चौक, राजापेठ उड्डाणपूल, राजकमल चौक, श्याम चौक, जयस्तंभ चौक, चित्रा चौक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक अशा मुख्य मार्गावरून जात शिवटेकडी येथील शिवाजी महाराज पुतळ्यापाशी विसर्जित होईल. या रॅलीचे खास आकर्षण म्हणजे मार्गातील ठिकठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. राजकमल चौक, इर्विन चौक आणि माँ जिजाऊ पुतळा परिसर येथे शिवरायांच्या जीवनावर आधारित पथनाट्य सादर केले जाणार आहे. तसेच माँ जिजाऊंच्या पुतळ्याजवळ वीररसातील पोवाड्याचे सादरीकरण करून शिवरायांना मानवंदना दिली जाईल. या सर्व कार्यक्रमांमध्ये अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी प्रास्ताविकेतून केले. कार्यक्रमाचे संचालन श्रीकृष्ण पखाले यांनी तर आभार नायब तहसीलदार रासेकर यांनी मानले.

### पैशांच्या वादातून पित्याला

सांगितल्यावर संतापलेल्या निखिलने घरातील लोखंडी औजार उचलून वडिलांच्या डोक्यावर वार केला. तसेच शिवीगाळही केल्याचे तक्रारीत नमूद आहे. हल्ल्यात विठ्ठल दाभेराव यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला. घटनास्थळी उपस्थित दोन परिचितांनी तत्काळ त्यांना दुचाकीवरून वलगाव पोलिस ठाण्यात नेले. पोलिसांनी तक्रारीवरून मारहाणीचा गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### सातुर्णा परिसरात बनावट

(ता. नांदगाव खंडेश्वर) व गजानन धावडे (जुना बायपास) यांनी संगनमताने जमीन विक्रीचे आमिष दाखवले. विश्वास बसावा यासाठी जुन्या ७/१२ उताऱ्याची प्रत दाखवून व्यवहार पक्का असल्याचा भास निर्माण करण्यात आला. मात्र मूळ मालकिणीऐवजी दुसऱ्याच महिलेची ओळख करून देत जमीन स्वतःची असल्याचे सांगण्यात आल्याचा आरोप आहे. ४ डिसेंबर २०२४ रोजी फिर्यादीकडून ७ लाख रुपये स्वीकारल्यानंतर प्रत्यक्ष मालकीबाबत दिशाभूल झाल्याचे लक्षात आले. पोलिसांनी संबंधितांविरुद्ध फसवणूक व इतर कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. कागदपत्रांची पडताळणी, आर्थिक व्यवहारांचा मागोवा व संबंधितांची चौकशी सुरू असून तपासातून आणखी तपशील समोर येण्याची शक्यता आहे.

### भरधाव ट्रकची पिकअपला

अब्दुल नलील (वय ५०, रा. अलमास नगर, बडनेरा) यांच्यासह एमएच २९ टी ३६५५ क्रमांकाच्या बोलेरो पिकअपमधून प्रवास करत होते. रात्री सुमारे ११.५० वाजता वाहनाच्या हेडलाईटची तपासणी सुरू असताना मागून आलेल्या टाटा सिग्ना ३५३० (एमएच २७ व्हीएक्स ९६१०) क्रमांकाच्या ट्रकने भरधाव व निष्काळजीपणे पिकअपला धडक दिली. धडकेचा जोर इतका होता की पिकअप चालक वाहनासह खाली पडले. त्यांच्या डोक्याला, चेहऱ्याला व हाताला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर रेडीयंट हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून ट्रक चालकाविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास सुरू आहे.

### धारदार शस्त्रासह फिरणारा

पथकाने घटनास्थळी धाव घेतली. तपासात उमेश हंसराज तिवारी (वय ३८, रा. शेगाव, माता मंदिरजवळ, अमरावती) यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातून सुमारे १५ इंच लांबीचा व १० इंच पात्याचा, अंदाजे २०० रुपये किमतीचा चाकू जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध कलम ४/२५ आर्म्स ॲक्ट तसेच कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उप आयुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर (गाडगेनगर विभाग), वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईम पोलीस निरीक्षक विजया पंधरे तसेच प्रशासन पोलीस निरीक्षक समाधान वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. डी.बी. पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार मानकर, उपनिरीक्षक धनंजय रत्नपारखी, पोलीस अंमलदार प्रकाश मेश्राम, निलेश जुनघरे, अमोल यादव, विनोद मालवे, सिद्धार्थ शृंगारे व सचिन गोरखेडे यांनी संयुक्तरीत्या ही कारवाई पार पाडली.

### मूकबधीर मुलीवरील अत्याचाराच्या

वरून पळून गेला. यानंतर पीडितेच्या आईने लोणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. ११ मार्च २०२५ रोजी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. तपास अधिकारी प्रविण मोरे यांनी सखोल तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. सरकार पक्षातर्फे एकूण १२ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. विशेष म्हणजे, पीडितेची साक्ष न्यायालयाने सर्व कायदेशीर नियमांचे पालन करून व्हिडिओग्राफीद्वारे नोंदवली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले. न्यायालयाने ठोठावलेल्या १० हजार रुपयांच्या दंडापैकी ८ हजार रुपये पीडितेला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले आहेत. दंड न भरल्यास आरोपीस तीन महिने अतिरिक्त सश्रम कारावास भोगावा लागणार आहे. या खटल्यात सरकारतर्फे अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. सोनाली एस. क्षीरसागर यांनी बाजू मांडली. कोर्ट पैरवी अधिकारी कनोजिया, लोणी पोलिस ठाण्याचे कोर्ट पैरवी अधिकारी भगत तसेच हेड कॉन्स्टेबल रोशन दुधे यांनी सहकार्य केले.

### महावितरणचे स्मार्ट वीजमीटर

स्थानकाजवळ आयोजित 'स्मार्ट मीटर जनजागृती' स्टॉलचे उद्घाटक म्हणून संचालक पवार बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, दीपाली माडेलवार, कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे, उपकार्यकारी अभियंता जयंत घाटे उपस्थित होते. दि. ९ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत राबविल्या जाणाऱ्या जनजागृती पंधरवड्यानिमित्त या विशेष माहिती कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. यावेळी मार्गदर्शन करताना राजेंद्र पवार यांनी स्मार्ट मीटरच्या तांत्रिक अचूकतेवर विशेष भर दिला. ते म्हणाले की, स्मार्ट मीटरच्या दरमहा रिडिंगमध्ये मानवी हस्तक्षेप नाही. स्वयंचलित पद्धतीने मीटरचे वाचन होते. त्यामुळे ग्राहकांना शंभर टक्के अचूक आणि वेळेवर वीज बिल मिळणे आता शक्य झाले आहे. विशेष म्हणजे, स्मार्ट मीटर असलेल्या ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी प्रति युनिट ८० पैशांची 'टाइम ऑफ डे' (ToD) सवलत जुलै २०२५ पासून लागू करण्यात आली आहे. या सवलतीचा फायदा घेतल्यास ग्राहकांच्या मासिक बिलात मोठी बचत होत आहे. याशिवाय, स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना त्यांच्या दर तासाचा वीज वापर मोबाईलवर पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे स्वतःच्या वीज वापरावर नियंत्रण ठेवणे आणि त्याचे योग्य नियोजन करणे ग्राहकांना सहज शक्य झाले आहे.

स्मार्ट मीटरमुळे वीज बिल जास्त येते हा ग्राहकांचा समज पूर्णपणे चुकीचा असल्याचे स्पष्ट करत संचालक पवार यांनी सांगितले की, हे मीटर केवळ वापरलेल्या विजेचे अचूक मोजमाप करते. या मीटरसाठी महावितरण कोणत्याही प्रकारचे शुल्क ग्राहकांकडून आकारत नाही, ही बाब ग्राहकांना प्रकर्षाने सांगावी. हे मीटर बसवणे सर्वच ग्राहकांसाठी अनिवार्य असून, त्यांच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करणे ही काळाची गरज आहे, असे संचालक राजेंद्र पवार यांनी सांगीतले.

**स्मार्ट मीटरच्या अचूकतेचे थेट सादरीकरण-** स्मार्ट मीटरबाबत वीज ग्राहकांच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी बडनेरा येथे विशेष 'स्मार्ट मीटर जनजागृती स्टॉल' उभारण्यात आला आहे. या स्टॉलचे मुख्य आकर्षण म्हणजे स्मार्ट मीटरच्या अचूकतेचे थेट प्रात्यक्षिक दाखवण्यात येत आहे. जुने मीटर आणि नवीन स्मार्ट मीटर एकाच जोडणीवर (Connection) लावून, दोन्हीमध्ये होणारा वीज वापर तंतोतंत सारखाच असल्याचे ग्राहकांना प्रत्यक्ष दाखवले जात आहे. या उपक्रमामुळे स्मार्ट मीटरच्या कार्यक्षमतेवर विश्वासार्हता निर्माण होण्यास मदत होत आहे.

### बेनोडा (शहिद) येथे

सहा-सात वर्षांपासून पत्नी वेगळी राहत असल्याने ते आई-वडिलांसोबतच राहत होते, अशी माहिती समोर आली आहे. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली. पुढील तपास ठाणेदार विवेक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बेनोडा पोलिस करीत आहेत. घरातून बेपत्ता झालेल्या व्यक्तीचा असा शोकांत शेवट झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस सर्व बाजूंनी तपास करीत आहेत.


**शेत विकणे आहे**

आर्णी ते माहूर दोन्ही बाजूंनी फोर लाईन हायवे रोड टच आर्णी पासून ४ किलोमीटर अंतरावरील कोळवण फाट्याजवळ असलेली शेत जमीन एकूण पावणे तीन एकर विक्री साठी आहे व त्याचा गट. क्र ५८ आहे.

-:संपर्क :-

अशोक लक्ष्मण मोरे. मो ९६२३३८९२४३
दिनेश जाधव. मो ७५८८३७९०९५
सचिन पानभरे. मो ९६०७६६१५५५
रमेश डवणे. मो ९१५८२५८७७४
रा सुकळी ता.आर्णी. जि यवतमाळ. महाराष्ट्र

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## आ. रणधीर सावरकरांच्या मध्यस्थीने घंटागाडी चालकांचा संप अखेर मागे

### वेतन वेळेत देण्याचे आश्वासन; EPFO–ESIC ओळखपत्र देणार

■ प्रतिनिधी | अकोला ■

**शहरातील कचरा घंटागाडी वाहन चालकांनी पुकारलेला संप अखेर आमदार रणधीर सावरकर यांच्या पुढाकाराने मागे घेण्यात आला. गेल्या काही दिवसांपासून वेतनविलंब आणि मूलभूत सुविधांच्या प्रश्नावरून संतप्त झालेल्या चालकांनी कामबंद आंदोलन छेडले होते. मात्र मध्यस्थीच्या निर्णायक बैठकीत तोडगा निघाल्याने उद्यापासून घंटागाड्या पुन्हा रस्त्यावर धावणार आहेत.**



बैठकीत महापौर शारदा रणजित खेडकर, माजी महापौर विजय अग्रवाल आणि उपमहापौर अमोल गोगे उपस्थित होते. चालकांचे म्हणणे ऐकून संबंधित कंत्राटदारांशी थेट चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत नियमित वेतन देण्याचे ठोस आश्वासन देण्यात आले. तसेच चालकांना इंइ्ध व एंघ्णची ओळखपत्रे देऊन त्यांची अधिकृत नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

संपामुळे शहरातील स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. काही भागांत कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली होती. या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत 'अकोला स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आमचीच' अशी ग्वाही चालक संघटनेने दिली. घरोघरी जाऊन नियमित कचरा संकलन केले जाईल, असे स्पष्ट करण्यात आले. मनपाचे अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोणे, नगरसेवक मो. रफीक सिद्दीकी, नगरसेविका उषा विर्क, स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजुरकर यांच्यासह वाहन चालक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. सकारात्मक चर्चेतून संप मिटल्याची घोषणा संघटनेने केली.

दरम्यान, वेतनविलंबाचा प्रश्न पुन्हा उद्भवल्यास तीव्र भूमिका घेण्याचा इशाराही संघटनेकडून देण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र सध्या तरी शहरवासीयांना दिलासा मिळाला असून घंटागाड्या पुन्हा नियमितपणे दारात येणार आहेत.

## विहीर सर्वेक्षणातील घोळ सीईओ ॲक्शन मोडवर

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सावरगाव परिसरातील गाळलेल्या विहिरींच्या सर्वेक्षणात गैरप्रकार झाल्याच्या तक्रारीनंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ?क्शन मोडवर आले आहेत. संबंधित प्रकरणाची सुनावणी २४ फेब्रुवारी रोजी सावरगाव येथे होणार असून, चौकशीसाठी मूर्तीजापूर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

सावरगाव परिसरात गाळलेल्या विहिरींच्या सर्वेक्षणात सचिव समाधान साळोकार व कृषी सहाय्यक अरुण ताले यांनी अनियमितता केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी महादेव पायगन यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करत दोषींवर तत्काळ कारवाईची मागणी केली होती. तसेच न्याय न मिळाल्यास आत्मदहनाचा इशाराही दिल्याने प्रशासनात खळबळ उडाली.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेने १७ फेब्रुवारी रोजी पातूर येथील गटविकास अधिकाऱ्यांना पत्र पाठवून तत्काळ चौकशीचे निर्देश दिले. त्यानुसार मूर्तीजापूर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी सावरगाव येथे प्रत्यक्ष सुनावणी घेऊन अहवाल सादर करणार आहेत. दरम्यान, विहीर सर्वेक्षणातील कथित घोळामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, सुनावणीत काय निष्पन्न होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### सावरगाव येथे २४ फेब्रुवारीला सुनावणी; तक्रारीनंतर प्रशासन सतर्क



## मालेगावात राशन माफियांचा धुमाकूळ?

### पुरवठा विभागाची अर्थपूर्ण डोळेझाक

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरात अडत दुकानदारांच्या आडून सुरू असलेल्या कथित राशन माफियांच्या कारवायांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. विशेष म्हणजे हा प्रकार पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर सुरू असल्याची चर्चा शहरात रंगली आहे. कंट्रोलचे तांदूळ आणि गहू खुलेआम काळ्या बाजारात विकले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

गरीब आणि गरजूंसाठी शासनाकडून येणारा धान्यसाठा काही ठिकाणी अडत दुकानदारांच्या माध्यमातून वळवला जात असल्याचे बोलले जात आहे. दिवसा सामान्य व्यापाराचा आव आणला जातो, तर रात्रीच्या सुमारास मोठ्या प्रमाणात धान्याची उलाढाल होत असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे.

अधिक धक्कादायक बाब म्हणजे, आजपर्यंत या प्रकरणात ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे संबंधितांना राजकीय तसेच काही अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्याची चर्चा शहरभर सुरू आहे. काळ्या पैशांच्या जोरावर काही जण मुजोर बनले असून, प्रशासनाकडे तक्रारी जाऊनही परिणाम शून्यच असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

सामान्य नागरिकांचा सवाल आहे की, पोलीस व पुरवठा विभागाला याचा मेळ नाही का? की सर्व काही माहित असूनही डोळेझाक केली जाते? गरिबांच्या तोंडचा घास हिरावून घेणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार का? की हा काळाबाजार असाच सुरू राहणार? प्रशासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. दरम्यान, संबंधित यंत्रणांनी या गंभीर आरोपांची दखल घेऊन शहरातील अडत दुकाने आणि संशयित गोदामांची अचानक तपासणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शिवजयंती-रमजान एकत्र; उत्सव निर्विघ्न पार पाडा

### - आ. साजिद खान पठाण यांचे आवाहन
### - मनपा आयुक्तांसोबत घेतली बैठक

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात शिवजयंती आणि पवित्र रमजान महिन्याचा प्रारंभ एकाच काळात होत असल्याने प्रशासनाने समन्वय साधत काटेकोर व्यवस्था करावी, अशी ठाम भूमिका अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनी घेतली. यासाठी त्यांनी मनपा आयुक्तांसोबत तसेच जिल्हा पोलीस अधीक्षकांसोबत स्वतंत्र बैठक घेऊन ठोस निर्देश दिले.

मनपा आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीत आ. पठाण यांनी शहरातील सर्व मशिदींमध्ये बंद असलेली वीज जोडणी तातडीने सुरू करावी, पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा आणि शिवजयंती मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक भागात विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी केली.

जन्म-मृत्यू नोंदणीसाठी भरतीया रुग्णालयात केवळ एकच खिडकी कार्यरत असल्याने नागरिकांना मोठा त्रास होत आहे. यावर उपाय म्हणून आणखी पाच खिडक्या सुरू करण्यास आयुक्तांनी तत्त्वतः मान्यता दिल्याचे आ. पठाण यांनी सांगितले. तसेच सर्वोपचार रुग्णालयातील टीबी यंत्रणा महापालिकेच्या ताब्यात असून दोन्ही विभाग जबाबदारी एकमेकांवर ढकलत असल्याच्या तक्रारीवरही तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले.

यावेळी काँग्रेसचे गटनेते डॉ. जीशान हुसेन, मो. युसुफ, मोईन खान, महेंद्र गवई, गजानन कांबळे, सोहेल खान, मोहम्मद शरीक, मोहम्मद आसिफ आदीसह मनपाचे उपआयुक्त व सर्व अधिकारी उपस्थित होते.



### पोलीस अधीक्षकांसोबत कायदा-सुव्यवस्थेचा आढावा

आ. पठाण यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्यासोबत विजय सभागृहात बैठक घेतली. शिवजयंती आणि रमजानदरम्यान कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणी केली. रमजानच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यातील मुस्लिम समाजाला खरेदीसाठी रात्रीच्या वेळेत आवश्यक ती मुभा द्यावी, अशी विनंती आ. पठाण यांनी केली. तसेच कोणत्याही समाजात गैरसमज किंवा तणाव निर्माण होणार नाही, यासाठी सर्व पोलीस निरीक्षकांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश दिले. पोलीस प्रशासनानेही सहकार्याची भूमिका घेतल्याचे बैठकीनंतर स्पष्ट झाले. यावेळी माजी नगरसेवक मोहम्मद इरफान, मोहम्मद युसुफ, मंजूर अहमद आदी उपस्थित होते.

शहरात दोन मोठे उत्सव एकत्र येत असताना प्रशासनाने संवेदनशीलता व समन्वय राखत नियोजन करावे, अशी विनंती वजा सूचना या बैठकीतून देण्यात आली.

## गुरुमाऊली जयंतीनिमित्त ५०७ रुग्णांची मोफत तपासणी



■ प्रतिनिधी | अकोट ■

संत वासुदेव महाराज यांच्या १९९ व्या जयंती महोत्सवानिमित्त आयोजित रोगनिदान व औषधोपचार शिबिरात तब्बल ५०७ रुग्णांची मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या शिबिरात रुग्णांना विनामूल्य औषधांचेही वाटप करण्यात आले.

श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे आयोजित या आरोग्य शिबिरात संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त डॉ. अशोकराव बिहाडे व डॉ. संजीवनीताई बिहाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी सेवा दिली. डॉ. अमोल रावणकर, डॉ. प्रवीण पाटील, डॉ. शिवाजीराव ठाकरे, डॉ. अपर्णा पखान, डॉ. शुभांगी बिहाडे, डॉ. प्रसन्न पुंडकर, डॉ. वैष्णवी पुंडकर, डॉ. मनोज गावंडे, डॉ. अभिनय झापे, डॉ. विनोद कोल्हे, डॉ. शीतल गावंडे, डॉ. अभिजित पुंडकर, डॉ. प्रतिक भेडे, डॉ. राम बिहाडे, डॉ. अमोल राजगुरू, डॉ. सुहास कुलट, डॉ. ऋतुजा राजगुरू, डॉ. विजय बिहाडे, डॉ. संतोष पखान, डॉ. दर्शन कुलट, डॉ. ऐश्वर्या कुलट व डॉ. शिवानी बिहाडे आदींनी रुग्णसेवा बजावली.

गरजू रुग्णांना पुढील उपचारासाठी सवलतीच्या दरात सुविधा उपलब्ध करून देण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. शिबिरात विविध आजारांवरील तपासणी करून आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राजु कुकट, रविंद्र कापसे, अनिल गोंडचर, उमेश चोरे, प्रकाश बिहाड, अनिल सावरकर, प्रशांत धाबे, निलेश काळे, रत्नाकर रेळे, शरद पांडे, राममूर्ती वालसिंग, प्रविण वानखेडे, मदनराव देशमुख, रुपाली सामरे, श्वेता टिकार, सुवर्णा गोंडचर, आर्यन हिंगणकर, प्रणिता वानखेडे, अजय आखरे आदींनी मोलाचे सहकार्य केले.

## जिल्हा सत्र न्यायालयाकडून दोनदा नकार

### 'हायकोर्टा'तून पोक्सो आरोपीला दिलासा

■ प्रतिनिधी | अकोला ■

पोक्सो प्रकरणात जिल्हा सत्र न्यायालयाने दोनवेळा जामीन अर्ज फेटाळल्यानंतर अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आरोपीला जामीन मंजूर केला आहे. त्यामुळे कारागृहात असलेल्या आरोपीस मोठा दिलासा मिळाला आहे.

सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात २२ जुलै २०२५ रोजी भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७८, ११५(२), ३५१(२)(३) तसेच बालकांचे लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा (पोक्सो) कलम ८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात स्वराज स्वदेश वाहुरवाघ यांना अटक करून न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते.

या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला येथील विद्यमान तिसरे जिल्हा न्यायाधीश यांनी दोषारोपपत्र दाखल होण्यापूर्वी तसेच दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर अशा दोन्ही टप्प्यांवर आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केला होता. त्यामुळे आरोपीची सुटका रखडली होती.

दरम्यान, आरोपीच्या वतीने ॲड. आकाश गुलाबराव हिवराळे यांनी उच्च न्यायालयात धाव घेत जामीन अर्ज दाखल केला. संबंधित घटना ही प्रेमसंबंधातून घडल्याचा दावा करीत आरोपीला जामीन देण्याची विनंती करण्यात आली. बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत नागपूर खंडपीठाने आरोपीस जामीन मंजूर केला.

हायकोर्टाच्या या निर्णयामुळे आरोपी व त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी खालच्या न्यायालयात होणार आहे.

## अवैधरित्या साठवलेला १२ क्विंटल तांदूळ जप्त

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूरचे तहसीलदार राहुल वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली उमरा येथे अवैधरित्या साठवलेला तब्बल १२ क्विंटल तांदूळ जप्त करण्यात आला. मंगळवारी (१७ फेब्रुवारी) दुपारी पुरवठा निरीक्षण अधिकारी शितल मोरखडे यांनी ही कारवाई करत काळाबाजाराच्या संशयाला आळा घालण्याचा प्रयत्न केला.

उमरा येथील गणपती मंदिर परिसरातील मोकळ्या जागेत संशयास्पदरीत्या तांदळाचा साठा ठेवण्यात आल्याची माहिती पुरवठा विभागाला मिळाली होती. त्यानुसार तातडीने पथकाने पाहणी केली असता अधिकाऱ्यांची चाहूल लागताच तेथे उपस्थित काहीजण घटनास्थळावरून पळ काढल्याचे दिसून आले. चौकशीत हा साठा विनामालकीचा असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर १२ क्विंटल तांदूळ जप्त करण्यात आला.

### उमरा येथे पुरवठा विभागाची कारवाई



जप्त केलेला तांदूळ पातूर येथील शासकीय धान्य गोदामात जमा करण्यात आला आहे. या प्रकरणी पुरवठा निरीक्षण अधिकारी शितल मोरखडे यांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल केली असून, तांदूळ खरेदी करून काळाबाजार करणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे. तहसीलदार राहुल वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा सखोल तपास केला जात असल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

## विश्व मांगल्य सभेची मासिक राजाई सदाचार सभा उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक टिळक चौक शिंपी गल्ली येथील नामदेव महाराज मंदिरात १६ फेब्रुवारी रोजी अध्यक्षा डॉ. अर्चनाताई मेहकरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेत सर्वप्रथम संध्याताई बारटक्के यांनी शक्तीगाण गायले त्यानंतर अर्चनाताई मेहकरकर यांनी शिवमहिम्नस्तोत्र चे महत्व सांगून शिवमहिम्नस्तोत्रामुळे आपल्या जीवनात होणारा सकारात्मक बदल सांगितला, शुभाताई देव यांनी शिवमहिम्न अभिषेक म्हटला आणि उपस्थित महिलांनी भक्ती भावाने अभिषेक केले. सुत्र संचालन आरती चुंबळकर यांनी केले व शर्मिलाताई कोरान्ने यांनी जयघोष केला. सभा यशस्वी करण्यासाठी राज्य सदाचार सभेच्या संयोजिका संध्याताई बारटक्के व त्यांच्या संपूर्ण टीम ने परिश्रम घेतले, वृषाली सुरेश टेकाळे, वृषाली शंकर देशमुख तसेच सर्व सदस्य ,उपस्थित महिलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

## मराठी कवितेची बाराखडी बदलवणारा कवी म्हणजे लोकनाथ यशवंत - प्रा.डॉ. अंभोरे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अनेक मार्गांनी चिंतन करणारा व वाचकाला विचारशील करणारा कवी म्हणजे लोकनाथ यशवंत.अनेक कवींनी पारंपरिक कवितेच्या मांडणी आणि शैलीच्या संदर्भाने फसवणूक केली.विविध प्रकारे लबाडी केली पण लोकनाथ यशवंत यांच्या कवितेने समकाळाच्या कवितेला प्रतिष्ठा मिळवून दिली. लोकनाथ यशवंत यांनी पारंपरिक कवितेची बाराखडी बदलली आहे. लोकनाथ यशवंत हा कवी माणसं वाचणारा, माणसं जाणून घेणारा कवी आहे असे प्रतिपादन वाशीम येथे लोकनाथ यशवंत यांच्या जाहिर सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून ज्येष्ठ विचारवंत, समीक्षक आणि कवी, डॉ.उत्तम अंभोरे यांनी केले.

२८ फेब्रुवारी व एक मार्च या दोन दिवसांत नांदेड येथे विसावे आखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलन होत असून त्याच्या अध्यक्षपदी कवी लोकनाथ यशवंत यांची निवड झाल्याबद्दल वाशीम येथील आंबेडकरवादी साहित्यिक सन्मित्र समितीच्या वतीने वाशीमकर साहित्य प्रेमींनी लोकनाथ यशवंत यांच्या सत्काराचे आयोजन स्थानिक सर्किट हाऊस येथे करण्यात आले होते. त्या प्रसंगी अंभोरे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. उत्तम अंभोरे ज्येष्ठ विचारवंत, समीक्षक, संभाजीनगर, होते तर प्रमुख पाहुणे म्हणून , ज्येष्ठ कवी तथा सकाळचे माजी संपादक संजय वरकड, ज्येष्ठ नेते गोपाळराव आटोटे गुरुजी, रिपाइंचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे, कवी भोजणे,जग्गु राऊत आदिंची उपस्थिती होती. लोकनाथ यशवंत यांच्या कवितेची वरवर सहज वाटणारी भाषा ही आतून सखोल आणि गंभीर वळणाने जाणारी आहे.कमी शब्दात व्यापक अर्थ आशयांकित करणारी त्यांची कविता आहे.शोषण आणि दुःखाच्या मुळांचा शोध घेणारी त्यांची कविता आहे,असे भाष्य करुन लोकनाथ यशवंत यांच्या अनेक कवितेची बलस्थानं कशी आहेत याची सविस्तर चिकित्सा करत लोकनाथच्या अनेक कवितांचे वाचन डॉ. उत्तम अंभोरे यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी कवी लोकनाथ यशवंत यांच्या काव्य प्रवासाचा आढावा घेत आपले मनोगत व्यक्त केले.सत्कारा दरम्यान सत्काराला उत्तर देताना कवी लोकनाथ यशवंत यांनी आपल्या अनुभवाचे अनेक किस्से सादर केले.कवितेने आपल्याला काय दिले हे सांगताना ते म्हणाले, कवितेने मला भाकर दिली,घर दिले,पद दिले, प्रतिष्ठा दिली.जगण्याची ऊर्जा दिली.व्यवस्थेतील शेवटच्या माणसांचे प्रश्न आणि दुःख माझ्या कवितेतून मांडले असे सांगताना नारळात पाणी गेलेच कसे?असा प्रश्न विचारणारी विद्रोही कविता यावेळी त्यांनी सादर केली. प्रारंभी दीप प्रज्वलित करुन प्रज्ञासूर्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.आंबेडकरवादी साहित्यिक सन्मित्र समितीच्या वतीने शाल, पुष्पहार आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कारमूर्ती लोकनाथ यशवंत यांचा सत्कार करण्यात आला.



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ८४ ■ गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## वरुड-राजुरा मार्गावर भीषण अपघात; चार जणांचा जागीच मृत्यू

### -खासदार अमर काळे यांची तातडीची दखल



**वरुड जनमाध्यम :** वरुड-राजुरा मार्गावरील रेल्वे क्रॉसिंगजवळ बुधवारी सकाळी मृत्यूने अक्षरशः थैमान घातले. परिवहन मंडळाची शिवाई (इलेक्ट्रीक) बस आणि ऑटो यांच्यात झालेल्या जबरदस्त धडकेत चार निष्पाप जीव जागीच काळाच्या पडद्याआड गेले. या अपघाताने संपूर्ण परिसर सुन्न झाला असून दुःखाची काळी छाया पसरली आहे.

ऑटोमध्ये सात प्रवासी होते. त्यापैकी चार जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये कु. माही प्रविण मंगरुळकर (वय १३), कैलास नागदेवे (वय ४२), चिंतामण नागदेवे (वय ६०) सर्व रा. वाडेगाव तसेच हरिभाऊ शिंदे (वय ८३) रा. वाघाळ यांचा समावेश आहे. एका शाळकरी मुलीचा अकाली अंत झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे.

या भीषण अपघातात प्रतिभा लाड (रा. वडाळा), राजकुमार भलावी (गव्हाणकुंड) आणि मोहीनी भोरे (वय १८, रा. राजुरा) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच खासदार अमर काळे यांनी तातडीने दखल घेत संपूर्ण घटनाक्रमाची माहिती तहसीलदार वरुड यांच्याकडून घेतली. अपघाताचे भयावह चित्र पाहून काही क्षण तेही निःशब्द झाले. हा प्रसंग अतिशय वेदनादायक आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. खासदार काळे यांनी तत्काळ एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांना व तहसील प्रशासनाला मृतांच्या कुटुंबीयांना तात्पुरती आर्थिक मदत देण्याचे तसेच जखमींच्या उपचारासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, या अपघाताने वरुड-राजुरा परिसरात हळहळ व्यक्त होत असून रेल्वे क्रॉसिंगवरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. निष्पाप जीवांच्या या दुर्दैवी जाण्याने परिसर शोकसागरात बुडाला आहे.

## फाटक बंद... पुलगाव संतप्त

# तीन वर्षांचा अन्याय; निधीच्या सबबीखाली नागरिकांचे हाल, २१ फेब्रुवारीनंतर 'रेल्वे रोको'चा इशारा

**पुलगाव जनमाध्यम :** तीन वर्षे झाली... पण पुलगावच्या जखमेवर फुंकर घालायला कुणीच तयार नाही, रेल्वे फाटक बंद असल्याने शहराचे नाकच जणू दाबले गेले आहे. हजारो नागरिकांचा रोजचा प्रवास कोंडीत सापडला आहे. शालेय विद्यार्थ्यांना पहाटे अंधारात घराबाहेर पडावे लागते, तर नागरिकांना तीन किलोमीटरचा वळसा घालून शहरात यावे लागते. जीव धोक्यात घालून रुळ ओलांडणाऱ्या चिमुकल्यांचे दृश्य मन सुन्न करणारे आहे.

या गंभीर प्रश्नावर अखेर लोकप्रतिनिधी आणि रेल्वे प्रशासन आमनेसामने आले. १६ फेब्रुवारी रोजी मध्य रेल्वे नागपूर विभागाचे वरिष्ठ अधिकारी पुलगावात दाखल झाले. पाहणी, चर्चा, आश्वासने... पण ठोस निर्णय मात्र शून्य बैठकीत अधिकाऱ्यांनी रेल्वे उड्डाणपुलाच्या कामासाठी रेल्वेचा हिस्सा पूर्ण झाल्याचे सांगत राज्य सरकारवर जबाबदारी ढकलली. सार्वजनिक बांधकाम विभागाला निधी मिळालेला नसल्याने काम रखडल्याचे कारण पुढे करण्यात आले.



अंडरपास परिसरातील काळी माती, तांत्रिक अडचणी, निधीअभाव या सबबींच्या ढिगाऱ्याखाली पुलगावकरांचा संयम चिरडला जात आहे. निधी मिळाल्याशिवाय काम सुरू होणार नाही, असा निर्वाळा देत प्रशासनाने हात वर केल्याची भावना नागरिकांत आहे.

दरम्यान, रेल्वे फाटक तातडीने सुरू करण्याबाबतचे निवेदन वरिष्ठांकडे पाठवले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले; मात्र निर्णय अद्याप प्रलंबित आहे. बैठकीला नगराध्यक्ष कविता ब्राह्मणकर, काँग्रेसचे सुनील ब्राह्मणकर, रेल्वे अधिकारी एस. एस. महाजन, विकास भाले, शिवम अवस्थी, सहाय्यक पोलिस निरीक्षक पंकज ढोके, धीरज पाखरे, दिनेश भावे आदी उपस्थित होते.

**आता थांबणार नाही**

जनतेचा संयम संपत आला आहे. २१ फेब्रुवारीपर्यंत सकारात्मक निर्णय न झाल्यास आम्ही रेल्वे फाटकासमोर साखळी उपोषण सुरू करू. वेळ पडल्यास 'रेल्वे रोको' आंदोलनही करू, असा इशारा नगराध्यक्ष कविता ब्राह्मणकर यांनी दिला. पुलगावकरांचा प्रश्न आता केवळ फाटकाचा राहिलेला नाही, तो सन्मानाचा आणि सुरक्षिततेचा बनला आहे. २१ फेब्रुवारीनंतर या संतापाची ठिणगी ज्वालामुखी ठरेल का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## न्याय द्या, अन्यथा चाके थांबतील' १०२ चालकांचा आक्रमक इशारा

**वर्धा जनमाध्यम :** विविध मागण्यांकडे सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षाविरोधात १०२ रुग्णवाहिका चालकांनी आक्रमक भूमिका घेतली असून सोमवार २३ फेब्रुवारीपासून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. रविवार २२ फेब्रुवारीपर्यंत ठोस निर्णय घ्या, अन्यथा रुग्णवाहिकांची चाके थांबवू, असा थेट इशारा चालकांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन जिल्हा आरोग्य विभाग वर्धा यांना सादर करण्यात आले आहे.




जिल्ह्यात सध्या १०२ सेवेच्या ६४ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. अपघातग्रस्त, गंभीर रुग्ण तसेच बाळंतिणींना तातडीची सेवा पुरविण्यात या चालकांची महत्त्वाची भूमिका असते. कोविड काळात जीव धोक्यात घालून सेवा देणाऱ्या चालकांना आज मात्र मूलभूत मागण्यांसाठी आंदोलन करावे लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. मानधनवाढ, सेवा सुरक्षा आणि नियमितीकरणाच्या मागण्या प्रलंबित असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

सोमवारपासून कामबंद आंदोलन सुरू झाल्यास जिल्ह्यातील सुमारे ५८ चालक यात सहभागी होतील, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे आपत्कालीन आरोग्यसेवा विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दरम्यान, संभाव्य परिस्थिती लक्षात घेता आरोग्य विभागाकडून पर्यायी व्यवस्थेबाबत हालचाली सुरू असल्याचे समजते. मात्र शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार चालकांनी व्यक्त केला आहे.

## मुदतबाह्य औषधांचा खेळ अखेर उघड 'श्वास' फार्मसीचा परवाना रद्द

### -९ वर्षांच्या लेकराला एक्सपायरी स्टेरॉइड विक्री; औषध प्रशासनाची धडक कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** रुग्णांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या रामनगर येथील श्वास हॉस्पिटलमधील 'श्वास फार्मसी'वर अखेर प्रशासनाचा हातोडा पडला आहे. ९ वर्षांच्या चिमुकल्याला मुदतबाह्य स्टेरॉइडच्या गोळ्या विक्री केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने फार्मसीचा परवाना कायमस्वरूपी रद्द केला आहे. सहाय्यक आयुक्त (औषधी) नीरज लोहकरे यांनी हा कठोर आदेश निर्गमित केला.

रामनगर परिसरातील या फार्मसीतून शौर्य भेंडे (वय ९) या रुग्णासाठी डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांमध्ये चार मुदतबाह्य स्टेरॉइड टॅबलेट देण्यात आल्या. दोन गोळ्या मे २०२५ तर दोन




जुलै २०२५ मध्येच मुदत संपलेल्या होत्या. धक्कादायक बाब म्हणजे बिलावर मात्र त्या औषधांची मुदत ऑगस्ट २०२८ पर्यंत असल्याचे नमूद करण्यात आले होते. म्हणजेच केवळ हलगर्जीपणा नव्हे, तर दिशाभूल केल्याचा संशयही व्यक्त होत आहे. तक्रार प्राप्त होताच ४ फेब्रुवारी रोजी औषध विभागाने धडक तपासणी केली. तपासात गंभीर नियमभंग उघडकीस आल्यानंतर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. स्पष्टीकरण असमाधानकारक ठरल्याने अखेर परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात आली.

**९० दिवसांचा अल्टीमेटम**

फार्मसीतील संपूर्ण औषधसाठा पुढील ९० दिवसांत, म्हणजे मे २०२६ अखेरपर्यंत नियमांनुसार विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रुग्णांच्या जीवाशी खेळ करणाऱ्यांना प्रशासनाचा हा चपराक आहे. वर्ध्यातील औषध विक्री व्यवस्थेवर आता अधिक कडक नजर ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे.


## एलसीबीच्या कारवाईत 'चांग्या' जेरबंद; ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट येथे घडलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावत वर्धा स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) पथकाने एका अट्टल आरोपीला अटक केली आहे. प्रफुल उर्फ 'चांग्या' हरिदास चंदनखेडे (रा. भीमनगर, हिंगणघाट) असे अटकेतील आरोपीचे नाव असून त्याच्याकडून ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दुसरा आरोपी रोहित गोदे हा अद्याप फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

फिर्यादी विजेंद्र शंकर देशमुख यांनी हिंगणघाट पोलिस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीनुसार, ते डेली कलेक्शन करून परत येत असताना अज्ञातांनी त्यांच्या जवळील रोख रकमेची बॅग बळजबरीने हिसकावून नेली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल होताच स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला.

तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार टाका ग्राउंड परिसरातून 'चांग्या'ला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी, रोख रक्कम व मोबाईल असा एकूण ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पुढील तपास सुरू आहे.



### वाघाच्या धास्तीचा थरारक कहर

## खोल खाईत अडकून दोन्ही बैल ठार; शेतकरी गंभीर जखमी, मुलगा बचावला

**आष्टी शहीद जनमाध्यम :** तालुक्यातील पार्डी येथे वाघाच्या अचानक हालचालीमुळे बैलजोडीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी (दि. १८) दुपारी तीन वाजताच्या सुमारास घडली. या घटनेत शेतकरी किसना डोमाजी मरस्कोल्हे (वय ७०) गंभीर जखमी झाले असून त्यांचा मुलगा सुखरूप बचावला आहे.

माहितीनुसार, मरस्कोल्हे हे मुलासह बैलबंडीने माळरानावरील शेतात जात होते. त्याचवेळी झुडुपात दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक हालचाल केली. धास्तावलेल्या बैलांनी सैरावैरा पळ काढला. बंडी सुसाट वेगाने पुढे जात असताना ती एका खोल खाईत अडकली. या धावपळीत दोन्ही बैलांच्या गळ्याला फास बसून त्यांचा जागीच मृत्यू झाला.



बंडीवरून खाली पडल्याने मरस्कोल्हे गंभीर जखमी झाले. वेदनांकडे दुर्लक्ष करत त्यांनी बैलांचा शोध घेतला. खाईत निश्चल पडलेल्या आपल्या जीवापाड जपलेल्या बैलांना पाहताच त्यांनी हंबरडा फोडल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. मुलगा मात्र या दुर्घटनेतून सुखरूप बाहेर आला. घटनेची माहिती माजी सरपंच दीपाली कवारे यांचे पती मंगेश कवारे तसेच पोलीस पाटील अरविंद चाफले यांनी वनविभाग व महसूल विभागाला दिली. जखमी शेतकऱ्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, आष्टी ते कारंजा (घा.) मार्गावरील सिमेंट रस्त्याच्या कामामुळे वन्य प्राण्यांच्या नैसर्गिक मार्गांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याची चर्चा आहे. पाण्याच्या शोधात वाघ व इतर वन्यप्राणी गावशिवारात दिसत असून मानव-वन्यप्राणी संघर्ष वाढत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मृत बैलांची किंमत सुमारे एक लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत असून, संबंधित शेतकऱ्याला तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वनविभागाने या घटनेची चौकशी सुरू केली असून आवश्यक उपाययोजना करण्याचे संकेत दिले आहेत.


### जाहीर सूचना

माझे पती प्रशांत त्रंबकराव लोखंडे यांचे दिनांक 11/12/2025 रोजी दुखत निधन झाले. त्यांच्या मालकीचे HONDA ACTIVA वाहन क्रमांक MH32AW9629 चेचीस नंबर ME4JK156FRW740576 इंजिन JK15EW5740087 हे आहेत.(नाते पत्नी ) माझे नाव अश्विनी प्रशांत लोखंडे (वय-35 ) रा. समता नगर,सावंगी मेघे, वर्धा.442001 हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे.वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

**आपली नम्र**
**अश्विनी प्रशांत लोखंडे**
रा. समता नगर,सावंगी मेघे, वर्धा- 442001
7410590318



**महाराष्ट्र शासन**
**कोर्ट विद्यमान श्री.समर्थ क्षिरसागर तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय, देवळी**
**जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये ज.मृ.नो.र.प्र.क. /२०२५-२६**
**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार कु.सोनल राजेशराव बकाणे, रा.श्री.दिपक तराळे यांचे घराजवळ वार्ड नं.१ देवळी, ता.देवळी, जि.वर्धा यांचे जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) आणि महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम व फौजदारी प्रकिया संहिता १९७३ च्या कलम २० चे पोटकलम (१) अंतर्गत स्वतःचे जन्म दिनांक १६.०६.१९९३ रोजीची नोंद नगर परिषद कार्यालय, देवळी, येथे उपलब्ध नसल्याने नगर परिषद, देवळी यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये नोंद घेण्याचा आदेश होणेबाबत या कार्यालयास नगर परिषद, वर्धा यांचेद्वारे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

त्याअर्थी सदर व्यक्तिच्या जन्माच्या नोंदीबाबत हितसंबंधीत व्यक्तीचे आक्षेप/हरकती असल्यास ते त्यांनी निश्श्चित केलेल्या तारखेस स्वतः अथवा विधी व्यवसायीमार्फत किंवा मान्यता प्राप्त अभिकर्त्यामार्फत हजर राहून १५ दिवसांचे आत सादर करावे. उक्त तारखेनंतर व ठिकाणी अशा रितीने हजर राहण्यास व हरकती निवेदन करण्यास कसूर केल्यास त्यानंतर प्राप्त कोणत्याही हरकती व आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**दिनांक /०२/२०२६**

**तहसीलदार, देवळी**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# महाराष्ट्रातील 7 जागांसह देशातील 37 राज्यसभा जागांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

## 16 मार्च रोजी मतदान



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय निवडणूक आयोगाने बुधवारी देशातील १० राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकींचा कार्यक्रम जाहीर केला आहे. ही निवडणुकीसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी संध्याकाळी मतमोजणी केली जाणार आहे.

राज्यसभेच्या या ३७ जागा येत्या एप्रिल महिन्यात रिक्त होणारा आहेत. महाराष्ट्र (७), ओडिशा (४), तमिळनाडू (६), पश्चिम बंगाल (५), आसाम (३), बिहार (५), छत्तीसगड (२), हरियाणा (२), हिमाचल प्रदेश (१) आणि तेलंगणा (२) अशी या जागांची संख्या आहे.राज्यसभेचा कार्यकाळ संपणार असलेल्या नेत्यांमध्ये अनेक बड्या नावांचा समावेश आहे. ज्यामध्ये शरद पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, काँग्रेसचे नेते अभिषेक मनू सिंघवी, तृणमूल काँग्रेसचे नेते साकेत गोखले, आणि राज्यसभेचे उप सभापती हरिवंश नारायन सिंह यांचा समावेश आहे. या जागांसाठी २०२० मध्ये द्विवार्षिक निवडणुका झाल्या होत्या. तेव्हा भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या मित्र पक्षांनी आसाम, बिहार, हरियाणा आणि हिमाचल प्रदेशमध्ये मोठे यश मिळवले होते. महाराष्ट्रात या जागा भाजपा, दोन्ही गट एकत्र असलेली शिवसेना, दोन्ही गट एकत्र असलेली राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यात विभागलेल्या होत्या. तामिळनाडूमध्ये डीएमकेच्या नेतूत्वाखालील युतीने बहुतांश जागा जिंकल्या होत्या. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने आणि ओडिशामध्ये बिजू जनता दल यांचा दबदबा दिसून आला होता.

**कसे असेल वेळापत्रक?**

निवडणूक आयोगाने जारी केलेल्या वेळापत्रकानुसार, या निवडणुकींचे नोटिफिकेशन २६ फेब्रुवारी रोजी जारी केले जाईल. तर अर्ज दाखल करण्याची अखेरची तारीख ही ५ मार्च असणार आहे. अर्जांची छाननी आणि ही ६ मार्च रोजी केली जाईल आणि अर्ज माघारी घेण्याची अखेरची तारीख ९ मार्च असणार आहे. तर १६ मार्च रोजी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ पर्यंत मतदान होईल आणि त्यानंतर ५ वाजता मतमोजणीला सुरूवात होईल. निवडणुकीची प्रक्रिया ही २० मार्चपर्यंत पूर्ण केली जाईल. निवडणूक आयोगाने मतदानाच्या प्रक्रियेबद्दल देखील निर्देश जारी केले आहेत, ज्यानुसार बॅलेट पेपरवर पसंतीक्रम नोंदवण्यासाठी फक्त रिटर्निंग ऑफिसरने पुरवलेला इंटीग्रेटेड व्हायलेट स्केच पेनचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मार्च महिन्यात होणा-या या निवडणुकीचा निकाल हा संबंधित राज्य विधानसभांमधील राजकीय पक्षांच्या सद्यसंख्याबळावर अवलंबून असणार आहे. या निवडणुकीच्या निकालांमुळे राज्यसभेच्या रचनेत किरकोळ बदल होउ शकतात.

# राज ठाकरेंनी घेतली एकनाथ शिंदेंची भेट



**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या नंदनवन या निवासस्थानी जाउन भेट घेतली. राज ठाकरे आणि शिंदे यांच्या या भेटीमुळे राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क व्यक्तकेले जात आहेत. महापालिकेतील समीकरणावर व स्वीकृत नगरसेवकाबाबत या भेटीत चर्चा झाली असावी असा अंदाज आहे.

नुकत्यात राज्यात महापालिका निवडणूका पार पडल्या. यात मुंबईत दोघा ठाकरे बंधूंची युती होती. ठाकरे बंधू हे महायुतीविरोधात लढले. मात्र मुंबईत त्यांचा पराभव झाला. त्यानंतर कल्याण-डोंबिवली महापालिकेत मनसेने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली होती. त्यानंतर राज ठाकरे यांनी भविष्यात आपण राजकारणात लवचिक भूमिका स्वीकारणार असल्याचे स्पष्ट केले होते. आता राज्यातील निवडणुकांचा हंगाम संपला आहे. या पार्श्वभूमीवर दोघांमधील भेटीला महत्व आले आहे. दोघांमध्ये सुमारे अर्धा तासाहून अधिक काळ चर्चा झाली.

विकासकामांवर सहकार्याची भूमिका

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार दोघांमध्ये मुंबई शहराच्या विविध विकासकामांवरही चर्चा झाली. कोस्टल रोड आदी प्रकल्पांमुळे नागरिकांना होणा-या गैरसोयीचा मुददा राज ठाकरे यांनी मांडला. विकासकामे करताना नागरिकांना गैरसोय होउ नये अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विकासकामांना राज ठाकरे हे नेहमीच सहकार्याची भूमिका घेत असतात. विरोधी पक्ष आहे म्हणून विरोधासाठी विरोध असे ते कधी करत नाहीत. त्यामुळे यापुढेही चांगल्या पदधतीने होणा-या विकासकामांना आपले सहकार्यच असेल असे राज ठाकरे यांनी याबैठकीत सांगितल्याचे समजते.महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने दोघे ठाकरे बंधू वीस वर्षांनंतर राजकीयदृष्टया एकत्र आले होते. या निवडणूक प्रचारात दोघांनी महायुतीविरोधात जोरदार टिकास्त्र सोडले. शिंदे गट आणि ठाकरे गट यात विळ्या-भोपळ्याचे सख्य आहे. असे असतानाही राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

# भारताला सर्व क्षेत्रात अग्रगण्य राष्ट्र बनवण्याच्या दिशेने शासनाची गतीमान वाटचाल -केंद्रीय मंत्री पीयूष गोयल



**मुंबई/प्रतिनिधी :-** सर्वसमावेशक विकास, जागतिक गुंतवणूक, नवतंत्रज्ञान आणि युवकांच्या सहभागातून भारताची अर्थव्यवस्था अधिक मजबूत करण्याच्या दिशेने शासनाची गतीमान वाटचाल सुरू आहे. येत्या काळात भारताला सर्व क्षेत्रात अग्रगण्य राष्ट्र बनवण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासन कृतिशील असल्याचे प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी केले. विदेश मंत्रालय, फयुचर इकानामिक कार्पोरेशन कौन्सिल आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्तविद्यमाने आयोजित ग्लोबल इकान?मिक को ऑपरेशन समिट मधील संवाद सत्रात केंद्रिय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल बोलत होते. एफइसीआयसीचे कार्यकारी संचालक विजय चौथायवाला यांनी या संवादसत्राचे संचलन केले.भारताला पुढील दोन दशकांत जगातील अग्रगण्य राष्ट्र बनविण्याचा निर्धार शासनाने केला आहे. केंद्र शासनाच्या विविध उपक्रमांमुळे देश विकासाच्या नव्या पर्वाकडे वाटचाल करत असल्याचा विश्वास व्यक्त करून वाणिज्य मंत्री गोयल म्हणाले की, केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत राबविलेल्या सर्वसमावेशक आणि जनकेंद्रित योजनांमुळे देशातील गरीब, वंचित आणि मध्यमवर्गीय नागरिकांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा झाली आहे . प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली शासनाने सबका साथ, सबका विकास या ध्येयाने काम करत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याला प्राधान्य दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.केंद्र शासनाने आर्थिक समावेशन, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सुधारणा केल्या. गरीब कुटुंबांना निवारा, स्वच्छता सुविधा, गॅस जोडणी, मोफत धान्य आणि आरोग्य संरक्षण देणा-या विविध योजनांमुळे जीवनमान उंचावले आहे. वंचित, मागास आणि ग्रामीण भागातील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणाली अधिक प्रभावी करण्यात आली आहे.

**पायाभूत सुविधांमध्ये विक्रमी गुंतवणूक**

देशभरात महामार्ग, रेल्वे, बंदरे, विमानतळ आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीच्या विकासाला गती देण्यात आली आहे. गती शक्ती सारख्या उपक्रमांद्वारे विविध प्रकल्पांचे समन्वयित नियोजन केले जात आहे. उद्योग आणि गुंतवणूक वाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यावर भर देण्यात आला असून, उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी विविध प्रोत्साहन योजना राबविण्यात येत आहेत.

**युवा पिढी आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन-**शासनाने स्टार्टअप इंडिया आणि स्किल इंडियासारख्या कार्यक्रमांतून युवकांना कौशल्यविकास आणि उद्योजकतेसाठी संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. नवउद्योजकांना आर्थिक सहाय्य, मार्गदर्शन आणि जागतिक बाजारपेठांशी जोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दुहेरी पदवी आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक देवाणघेवाणीला प्रोत्साहन देउन भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक अनुभव मिळवून देण्यावर भर आहे.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्स कार्गो हबमुळे महाराष्ट्रातील व्यापाराला नवी गती-मुख्यमंत्री






**मुंबई/प्रतिनिधी :**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्सच्या समर्पित कार्गो हबचे भूमिपूजन हा भारत, मुंबई आणि महाराष्ट्रासाठी पुरवठा व्यवस्थापन खर्च क्षेत्रातील ऐतिहासिक टप्पा असून, या सुविधेमुळे राज्यातील उद्योग, निर्यात आणि व्यापाराला मोठी चालना मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. बदलत्या जागतिक व्यापार परिस्थितीत फेडेक्सने मुंबईत गुंतवणूक करण्याचा घेतलेला निर्णय हा भारताच्या आर्थिक सामर्थ्याचा आणि महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांवरील जागतिक विश्वासाचे महत्त्वपूर्ण प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्सच्या समर्पित कार्गो हबचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष विजय सिंघल, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अदानी एअरपोर्ट होल्डिंग लि. चे संचालक जीत अदानी, फेडेक्सचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी राज सुब्रमण्यम, फेडेक्स एमईआयएसच्या अध्यक्षा कामी विश्वनाथन, रिचर्ड स्मिथ, अरुण बंसल आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, फेडेक्सची जागतिक स्तरावरील मजबूत उपस्थिती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे महाराष्ट्रातील कार्गो हाताळणी आणि व्यापाराला मोठी चालना मिळेल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भविष्यात भारतातील सर्वोत्कृष्ट आणि सर्वाधिक व्यग्र प्रवासी व कार्गो विमानतळ ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) हा भारताच्या भविष्यातील आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू असून २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन ड?लर अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे योगदान देईल. पुरवठा व्यवस्थापन खर्च कमी करणे देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे असून फेडेक्ससारख्या कंपन्यांमुळे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हा खर्च कमी होण्यास मदत होईल. महाराष्ट्र हा देशाच्या उत्पादन क्षेत्रात आघाडीवर असून फेडेक्सच्या सुविधेमुळे उद्योग, निर्यात आणि संपूर्ण व्यावसायिक परिसंस्थेला मोठा फायदा होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# प्राचीन महानुभवीय तीर्थक्षेत्रांच्या नोंदी घेण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात विविध ठिकाणी प्राचीन महानुभवीय तीर्थक्षेत्र आहेत. या तीर्थक्षेत्रांची माहिती संकलित करुन अधिकार अभिलेखामध्ये त्यांच्या नोंदी घेण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिका-यांना दिले. महानुभव स्थान महात्म्य अभियान, नागपूरचे समन्वयक हरिहर पांडे यांनी शासनास केलेल्या विनंतीनुसार महानुभाव तीर्थस्थानांबाबतची माहिती विहित विवरणपत्रात शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिका-यांना कळविण्यात आले होते. या अनुषंगाने महसूल मंत्री बावनकुळे यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत आढावा घेतला. विविध जिल्ह्यांमध्ये असलेले महानुभवीय तीर्थक्षेत्र शासकीय, खासगी, वन, ग्रामपंचायत अशा विविध जागांवर असल्याची माहिती यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत देण्यात आली. यावर महसूल मंत्री बावनकुळे यांनी आवश्यकतेनुसार उपलब्ध असलेले दस्त तपासून त्यांच्या नोंदी घेण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले.

# विवेक भीमनवार लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी

## लोकभवन येथे राज्यपालांकडून शपथ



**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय प्रशासकीय सेवेतील ज्येष्ठ अधिकारी विवेक भीमनवार यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष पदाची शपथ देण्यात आली. लोकभवन येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी सोहळ्यात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी भीमनवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

शपथविधीनंतर राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भीमनवार यांचे पुष्पगुच्छ देउन अभिनंदन केले.भीमनवार यांची नियुक्ती सहा वर्षांच्या कालावधीसाठी किंवा ते वयाची ६२ वर्षे पूर्ण करेपर्यंत (जे अगोदर येईल तेथपर्यंत) करण्यात आली आहे.शपथविधी सोहळ्याला आयोगाचे माजी अध्यक्ष रजनीश सेठ, कार्यवाहू अध्यक्ष डॉ अभय वाघ, आयोगाचे सदस्य, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, शासनाचे अधिकारी तसेच भीमनवार यांचे कुटुंबीय उपस्थित होते.सुरुवातीला राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी विवेक भीमनवार यांच्या नियुक्तीची सामान्य प्रशासन विभागाची अधिसूचना वाचली. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार शपथविधी सोहळ्याची सुरुवात वंदेमातरम, राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तर समारोप वंदेमातरम व राष्ट्रगीताने झाला.

### विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ८९ वी बैठक

# सिंचन प्रकल्पांच्या प्रगतीला गती मिळणार-जलसंपदा मंत्री महाजन



**मुंबई/प्रतिनिधी :**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ८९ वी बैठक मंत्रालयात जलसंपदा मंत्री तथा नियामक मंडळाचे अध्यक्ष गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत विविध प्रकल्पांच्या विषयांना मंजुरी देण्यात आली. या मंजूर कामांमुळे विदर्भातील शेतक-यांच्या पाण्याच्या प्रश्नावर तोडगा निघणार असून सिंचन प्रकल्पांच्या प्रगतीला गती मिळणार असल्याचे जलसंपदा मंत्री महाजन यांनी सांगितले.या बैठकीस अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांच्यासह नियामक मंडळाचे सदस्य व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा-**बैठकीत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील विविध सिंचन प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला. प्रकल्पग्रस्त शेतक-यांना देण्यात येणा-या नुकसानभरपाईबाबत माहिती घेतली तसेच प्रलंबित प्रकल्पांची कामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

**गुणवत्तापूर्ण व वेळेत काम पूर्ण करण्यावर भर-**जलसंपदा मंत्री महाजन यांनी प्रकल्पांची कामे करताना गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करण्याचे निर्देश दिली. सिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून शेतक-यांना पाण्याची हमी मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे कामे वेळेत व दर्जेदार पूर्ण व्हावीत, असे त्यांनी यावेळी सांगितले.

**शेतक-यांच्या हिताला प्राधान्य-** बैठकीत महत्त्वाच्या व प्राधान्य प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले. सिंचन सुविधा वाढल्यास कृषी उत्पादनात वाढ होईल तसेच शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यास मदत होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# हवामान बदलाच्या लढ्यात भारत नवकल्पना व अंमलबजावणीचे नेतृत्व करेल-हिलरी क्लिंटन

## ■ कल्पना, भागीदारी आणि कृतीशिवाय पर्याय नाही

## ■ मुंबई क्लायमेट वीकमध्ये हिलरी क्लिंटन यांचा तरुणाईला संदेश






**मुंबई/प्रतिनिधी :**हवामान बदलाच्या लढ्यात युवक, महिला आणि स्थानिक समुदाय यांच्या कल्पना व कृती निर्णायक ठरणार असून दरवाजे ठोठावत राहा, आवाज बुलंद ठेवा आणि उपाय मांडत राहा, असा स्पष्ट संदेश अमेरिकेच्या माजी परराष्ट्र सचिव हिलरी क्लिंटन यांनी दिला. मुंबई क्लायमेट वीकमधील फायरसाइड चर्चेत त्या बोलत होत्या. श्लोका नाथ यांनी त्यांची मुलाखत घेतली. यावेळी पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज उपस्थित होत्या.

**हवामान बदलात भारत नवकल्पना व अंमलबजावणीचे नेतृत्व करेल- हिलरी क्लिंटन**

हवामान बदलाच्या लढ्यातील आघाडीवर भारत आणि दक्षिणेकडील देश नवकल्पनांचे नेतृत्व करू शकतात. पर्यावरणासाठी आणि मानव जातीच्या कल्याणासाठी परिणामकारक उपायांकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. यात भारताचीही भूमिका महत्वाची राहणार आहे. पर्यावरण रक्षणासाठी केवळ चर्चा नकोत, तर कृती करणे, हीच खरी काळाची गरज आहे, असे श्रीमती क्लिंटन यांनी यावेळी नमूद केले.

पर्यावरण कृती ही केवळ धोरणांची नव्हे, तर राजकारण, बाजारपेठ आणि उद्योग यांच्या वास्तवाची जाण ठेवून पुढे नेण्याची प्रक्रिया असल्याचे श्रीमती क्लिंटन यांनी नमूद केले. दक्षिणेकडील देशातील युवकांकडे स्थानिक पातळीवरील प्रभावी उपाय आहेत; मात्र त्यांना भांडवल, नेटवर्क आणि व्यासपीठाची कमतरता भासते. कल्पना कुठूनही येउ शकतात, फक्त त्यांना पाठबळ देणे आवश्यक आहे. सार्वजनिक, खासगी आणि सामाजित उत्तरदायित्व क्षेत्रांनी एकत्र येउन अंमलबजावणीसाठी सक्षम भागीदारी उभी करणे ही काळाची गरज आहे. यासाठी क्लिन्टन ग्लोबल इनिशिएटीव्ह वर्षभर भागीदारांसोबत काम करून निधी, तांत्रिक मदत आणि अंमलबजावणीची साखळी उभी करत असल्याचे त्यांनी सांगितले. हवामान, आरोग्य आणि त्याचे विशेषतः महिलांवर होणारे परिणाम, हे परस्परांशी जोडलेले असून विशेषत? उष्णतेच्या लाटांचा सर्वाधिक फटका महिलांना बसतो, असे त्यांनी नमूद केले. भारतातील स्वयंरोजगार करणा-या महिलांसोबत काम करताना हवामान बदलाचा प्रत्यक्ष परिणाम दिसल्याचा उल्लेख करत श्रीमती क्लिंटन यांनी सेल्फ एम्प्लाइड असोसिएशन (सेवा) सोबतच्या उपक्रमाचे उदाहरण दिले. अत्यंत उष्णतेमुळे कामाचे तास कमी होउन महिलांचे उत्पन्न घटते. यासाठी हवामान-संवेदनशील विमा म?डेल विकसित करण्यात आले असून सध्या भारतात पाच लाख महिला या संरक्षणाखाली आल्या आहेत. हा नमुना पुढे इतर देशांत राबवण्याचा मानस आहे, असे श्रीमती क्लिंटन यांनी सांगितले.हवामान बदल हा केवळ पर्यावरणीय नव्हे, तर आरोग्य आणि अर्थव्यवस्थेशी संबंधित प्रश्न असून स्वच्छ उर्जा, अनुकूलन उपाय आणि स्थानिक पातळीवरील नवकल्पनांवर भर द्यावा. जागतिक समस्या असली तरी उपाय स्थानिक पातळीवरच सुरू होतात, असेही त्या म्हणाल्या.पर्यावरण संवर्धनाविषयी त्यांनी निसर्गाशी असलेले मानवी नाते अधोरेखित केले. समुद्र, डोंगर, नद्या आपण तयार केल्या नाहीत. त्यामुळे या पृथ्वीचे वारसदार आहोत; तिचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे, असे सांगत त्यांनी युवकांना नेतृत्व स्वीकारण्याचे आवाहन केले.

**हवामान बदल म्हणजे धोरणाचा नव्हे, तर आरोग्याचाही प्रश्न-**हवामान बदल हा केवळ उर्जा धोरणाचा मुद्दा नसून तो सार्वजनिक आरोग्या संदर्भातीलही गंभीर विषय आहे, असे श्रीमती क्लिन्टन यांनी स्पष्ट केले. दिल्ली, बीजिंगसारख्या शहरांतील प्रदूषण, महिलां व मुलांमधील श्वसनविकार यांचा उल्लेख करत त्यांनी स्वच्छ इंधन व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या प्रसाराची गरज मांडली. अमेरिका, ब्रिटनसारख्या देशांसह चीन, भारतासारख्या देशांनीही अक्षय उर्जेकडे संपूर्ण संक्रमण करणे आवश्यक आहे.

**एआय क्रांती आणि पर्यावरणीय परिणाम-**एआय तंत्रज्ञान, हवामान अंदाज, पूर व्यवस्थापन, शेतीक्षमता वाढविणे यासाठी उपयुक्त ठरू शकते; मात्र येणा-या काळात एआयमुळे रोजगार क्षेत्रात मोठे बदल घडतील. लाखो लोक विस्थापित होउ शकतात. त्यामुळे सरकारांनी आतापासूनच याबाबत नियमन व धोरणात्मक तयारी करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सोशल मीडियाच्या अनियंत्रित विस्तारातून घेतलेला धडा लक्षात घेउन, एआयसंदर्भात उशीर होण्यापूर्वीच योग्य पावले उचलावीत, असा सल्ला त्यांनी दिला.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# 'एआय' नवे दालन

कृत्रिम बुद्धिमत्ता तथा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) म्हणजे विज्ञानकथेतील कल्पना नव्हे, तर आपल्या वर्तमानाचे आणि भविष्याचे नवे वास्तव आहे. मानवाच्या बुद्धीची निर्मिती असलेले 'एआय' आज सर्जनशीलतेपासून अर्थव्यवस्थेपर्यंत प्रत्येक क्षेत्राला नवे वळण देत आहे. या बदलत्या युगाच्या उंबरठ्यावर उभा असलेला भारत, संधी आणि जबाबदारी या दोन्हींचा समतोल साधण्याच्या निर्णायक टप्प्यावर आहे. राजधानी दिल्लीतील भारत मंडपममध्ये इंडिया 'एआय इम्पॅक्ट समिट'चा झाली असून, ही परिषद ऐतिहासिकच मानावी लागेल. विकसनशील देशात भरवली जाणारी ही पहिलीच परिषद असून, त्यामुळे या क्षेत्रातील भारताच्या प्रज्ञेचे दर्शन जगाला होत असून, जगाची या क्षेत्रातील प्रगतीही भारतास बघायला मिळत आहे.एआय परिवर्तनात भारत जगामध्ये आघाडीवर आहे. या क्षेत्रातील भारताची प्रगती म्हणजे महत्त्वाकांक्षा आणि जबाबदारी या दोन्ही गोष्टींचे प्रतिबिंब आहे. मजबूत डिजिटल व्यवस्था, चैतन्यशील स्टार्टअप परिसंस्था आणि अत्याधुनिक संशोधन यांच्या बळावर भारत या क्षेत्राचे नेतृत्व करत आहे, असे सार्थ उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. जागतिक एआय व्यवस्थापन आणि सहकार्यासाठी समान आराखडा जाहीर करणे, हा या परिषदेचा उद्देश आहे. त्याचवेळी रोजगारावर होणारा परिणाम, बालसुरक्षा, नैतिकता आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर या क्षेत्रातील अनेक नामवंत परिषदेत विचारविनिमय करतील. जगातील आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्या, स्टार्टअप्स, विद्यापीठे व संशोधन संस्था या परिषदेत सहभागी झाल्या असून, थेट प्रात्यक्षिकेही सादर केली जात आहेत. त्यामुळे ही परिषद तसेच भरवण्यात आलेल्या 'एआय एक्स्पो'मुळे एक नवे तंत्रस्नेही वातावरण तयार होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही दुहेरी तलवार असल्याचे मानले जाते. यातील धोके कमी करून संधींचा अधिकाधिक फायदा घेण्यावर भारत सरकारचा भर आहे; मात्र मुलांचा विकास, मानसिक आरोग्य आणि शिक्षण यावर एआय साधनांचा काय परिणाम होतो, हे समजून घेण्यासाठी अधिक पुराव्यांची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. यावर नक्कीच अधिक संशोधन व्हायला हवे. भारतात एआयची कौशल्ये विपुल आहेत. कल्पकतेला वाव देण्यासाठी अतिनियमन न करण्याचे सरकारचे धोरण आहे. शक्य तितक्या किफायतशीर दरांमध्ये जीपीयू म्हणजेच ग्राफिक प्रोसेसिंग युनिट उपलब्ध करून देण्याची खबरदारी घेण्यात आली आहे, ही चांगली बाब आहे. या पार्श्वभूमीवर एआय हा भारतासाठी धोका नसून, ती सुसंधीच आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अर्थात, त्यासाठी सुस्पष्ट धोरणे आणि व्यापक कौशल्य विकासाच्या सोयी-सुविधांची आवश्यकता आहे. नजीकच्या काळात त्या निर्माण करण्याचे आव्हान असेल. खासगी व शैक्षणिक क्षेत्र व धोरणकर्त्यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक असल्याचे अचूक प्रतिपादन भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. नागेश्वरन यांनी यासंदर्भाने करत त्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. शैक्षणिक सुधारणेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीसाठी एआयचा स्वीकार करून, भारत जगाचे नेतृत्व करू शकतो, हे त्यांचे मत विचार करण्यासारखे आहे. भारतातील रोजगारक्षम व्यक्तींची संख्या मोठी आहे; परंतु त्यांना नोकऱ्या नाहीत. म्हणूनच कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास आपोआप होऊ देण्याऐवजी तो व्यापक रोजगारनिर्मितीशी संलग्न करणे गरजेचेच आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेला माणसाने जन्म दिला असला, तरी कालांतराने एआय माणसावर राज्य गाजवेल, अशी भीती बऱ्याच काळापासून व्यक्त केली जात आहे. आता एआय हे केवळ आदेश पाळण्यापुरते मर्यादित न राहता स्वतः विचार करू शकणारे एक तंत्रज्ञान आहे. एआयमुळे पारंपरिक कौशल्ये व त्यावर आधारित रोजगार कालबाह्य ठरू शकतील; परंतु त्यामुळे हे सर्व रोजगारच नष्ट होतील, असे नाही. त्याऐवजी कामांचे स्वरूप बदलेल आणि त्यातून नवीन संधी निर्माण होतील.केंद्र सरकारने संगणकीय पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १० हजार ३७२ कोटी रुपयांचा कृत्रिम बुद्धिमत्ता कार्यक्रम यापूर्वीच लाँच केला आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या उद्योग व्यावसायिकांना त्यांच्या डेटा सेंटरचे रूपांतर कॉम्प्युटर युनिटस् मध्ये करण्यासाठी वेगवेगळी प्रोत्साहने दिली जाणार आहेत. कॉम्प्युटर युनिटस्च्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेला चालना देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. एकीकडे माहिती किंवा डेटा असेल आणि दुसऱ्या बाजूला त्यामधून कत्रिम बुद्धिमत्तेची निर्मिती होईल. शिवाय भारतात मुळातच बुद्धिमानांची संख्या मोठी आहे. देशात या क्षेत्रात सार्वजनिक आणि खासगी कंपनीची भागीदारी केली जात आहे. आता मोठ्या प्रमाणात माहितीचे संकलन, आकडेवारीचे गणन-विश्लेषण, तिचा अन्वयार्थ लावणे याची आवश्यकता निर्माण झाली आहे. शेकडो सेंटर प्रोसेसिंग युनिटस् (सीपीयू) जगावर अधिराज्य गाजवू शकतात. हा पायाभूत आधार असला, तरी वास्तवाकडेही पाहावे लागेल. संशोधन आणि विकास क्षेत्रातील भारताची प्रगती समाधानकारक नाही. आज संशोधनात भारताचा वाटा दोन टक्केदेखील नाही. उलट चीन आणि अमेरिकेचा तो अनुक्रमे ५८ टक्के व ५९ टक्के आहे. सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत संशोधनावरील भारताचा खर्च एक टक्कादेखील नाही. अमेरिका आणि चीनचा तो साडेचार टक्के आहे. हा खर्च हे देश मुख्यतः संशोधनविषयक पायाभूत सुविधांवर करतात. एआयच्या तंत्रज्ञानात जो श्रेष्ठ, तो जगावर राज्य करील, असे रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी म्हटले होते. २२ आणि २३ फेबुवारी रोजी मुंबईत जागतिक कृषी एआय परिषद भरत आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी, यासाठी महाराष्ट्र सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. अन्य राज्यांनीही याच दिशेने पावले टाकली पाहिजेत. केंद्र आणि राज्य यांच्या सहकार्यातून एआयबाबत देशात नवी क्रांती होऊ शकते. जगाचे लक्ष भारताकडे आहे. विशेषत: भारताच्या विशाल बाजारपेठेकडे आहे. या संधीचा जगाच्या स्पर्धेत राहताना पुरेपूर फायदा करून घ्यावा लागेल.

# नव्या पद्धतीतील महागाई मोजणी

**भारताने किरकोळ किंमत निर्देशांकासाठी २०२३-२४ हे नवे आधारवर्ष स्वीकारत आर्थिक मोजणीची पद्धत अधिक व्यापक आणि कालसुसंगत केली आहे. वस्तू व सेवांचे वर्गीकरण, भारांक आणि डेटा संकलनाच्या पद्धतीत झालेल्या या बदलामुळे महागाईचे चित्र अधिक वास्तवदर्शी होण्याची अपेक्षा आहे.**



कुठल्याही देशात अंतर्गत आर्थिक धोरणांची आखणी करत असताना राष्ट्रीय उत्पन्न, महागाई दर आणि रोजगारनिर्मिती यासंबंधीची आकडवारी उपलब्ध असणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट असते. त्यातही ही आकडेवारी वेळोवेळी अद्ययावत करून अधिकाधिक विश्वासार्ह तसेच विस्तृत अशा स्वरूपात उपलब्ध असणे अनिवार्य ठरते. राष्ट्रीय उत्पन्न, महागाईचा दर आणि रोजगारनिर्मिती या घटकांचा एकमेकांशी असलेला संबंध लक्षात घेऊनच धोरणे आखावी लागतात. या घटकांच्या मोजणीची पद्धत अद्ययावत करण्यासाठीची आंतरराष्ट्रीय मानकेही सुधारत असतात. उदाहरणार्थ, राष्ट्रीय उत्पन्नाची- पर्यायाने महागाईची-मोजणी करण्याची नवी मानके २०१३ ते २०१५ या काळात अनेक देशांनी स्वीकारली. भारतातही २०१५ पासून राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीसाठी या पद्धतीचा वापर सुरू झाला. त्याबरोबरच २०१६ साली रिझर्व्ह बँकेच्या महागाईसंबंधीच्या धोरणात मोठा बदल घडवून 'लक्ष्याधारित महागाई नियंत्रण' असे नवे धोरण अवलंबण्यास सुरुवात झाली. त्यामुळे 'किरकोळ किंमत निर्देशांक चार टक्क्यांच्या आसपास राखून किरकोळ बाजारातील महागाईचे नियंत्रण करणे' हे लक्ष्य मानून हे रिझर्व्ह बँकेला धोरण आखावे लागते.

या दोन्ही बदलांचा एक भाग म्हणून राष्ट्रीय उत्पन्न आणि महागाई यांचे मोजमाप करताना आकडेवारी गोळा करण्याची एक निश्चित पद्धत हवीच. या आकडेवारीवर प्रक्रिया करून त्यातून विश्लेषणाअंती निष्कर्ष काढणे हा धोरणात्मक रचनेचा गाभा समजला जातो. त्यानुसार देशात ग्रामीण व शहरी भागासाठी किरकोळ बाजारातील ग्राहक किंमत निर्देशांक काढला जातो व त्यावर आधारित महागाईसंबंधी आकडेवारीचा वापर करून धोरणनिश्चिती केली जाते. असा ग्राहक किंमत निर्देशांक निश्चित करण्यासाठी किरकोळ बाजारातील ग्राहकोपयोगी वस्तूंची संख्या, बाजाराचे स्थान, ग्रामीण किंवा शहरी, आधारभूत वर्ष, आधारभूत वर्षातील किमती या सर्वांचा उपयोग त्यासाठी होतो. आधारभूत वर्ष बदलले तर आकड्यांच्या विश्लेषणावरही परिणाम होतो.

भारतात किरकोळ किंमत निर्देशांक मोजण्यासाठी २०१२ हे आधारभूत वर्ष बदलून २०२४ हे नवीन आधारभूत वर्ष आता ग्राह्य धरले जाणार आहे. त्यानुसार अलीकडेच अर्थ मंत्रालयाच्या सांख्यिकी विभागाकडून जानेवारी २०२६ या महिन्यात उपलब्ध असलेल्या आकडेवारीवरून ग्राहक किंमत निर्देशांक प्रसिद्ध करण्यात आला आणि बाजारात एक सकारात्मक भावना निर्माण झाली. सरत्या महिन्यात ग्राहक किंमत निर्देशांक हा २.७५ टक्के होता. याचा अर्थ किरकोळ बाजारातील महागाई दर हा केवळ पावणेतीन टक्के आहे असा होतो.

अर्थात, फक्त आधारभूत वर्ष बदलण्यापुरता हा बदल नाही. ग्राहक किंमत निर्देशांकासाठी वस्तू व सेवांच्या वर्गीकरणाची व्याप्तीदेखील वाढवण्यात आली आहे तसेच वस्तू व सेवांच्या वर्गवारीच्या भारांकातदेखील बदल करण्यात आलेले आहेत. भारतीय किरकोळ बाजारात महागाई ही लोकांच्या किमतीबद्दलच्या अपेक्षा आणि पुरवठ्यातील चढ-उतार या दोन घटकांनी निश्चित होते असे अनेक अभ्यासांतून स्पष्ट झाले, म्हणूनच सांख्यिकी मंत्रालयाने लोकांच्या अपेक्षांचा आणि उपभोग खर्चाचा महागाईवर होणारा परिणाम लक्षात घेण्यासाठी घरगुती उपभोग खर्च सर्वेक्षण करणे ही पद्धत देशात रूढ केली आणि २०२३-२४ साली केलेल्या या सर्वेक्षणानुसार वस्तू व सेवांचे वर्गीकरण तसेच भारांक यात महत्त्वाचे बदल करून ग्राहक किंमत निर्देशांकासाठी २०२३-२४ हे आधारभूत वर्ष निश्चित केले. त्याआधीच्या पद्धतीनुसार (डिसेंबर २०२५ च्या ग्राहक किंमत निर्देशांकासाठीही) हे आधारभूत वर्ष २०१२-१३ असे होते. परंतु मागच्या दशकभराच्या काळात उपभोगाच्या पद्धती, बाजाराची रचना, घरगुती उपभोग खर्च यामध्ये अनेक बदल झालेले आहेत आणि कोविडनंतरच्या काळात ग्राहकांची उपभोग खर्चाची मानसिकतादेखील मोठ्या प्रमाणावर बदलली आहे. त्यामुळे आधारभूत किमतीतील बदल हा तर्कसुसंगत आहे असे म्हणावे लागते.

या नवीन रचनेनुसार ग्राहक किंमत निर्देशांक मोजण्यासाठी सुमारे ३५८ वस्तू व सेवांचा अंतर्भाव केला जाणार असून पूर्वी २९९ वस्तू व सेवांचा यात अंतर्भाव होत असे. नवीन रचनेमध्ये सुमारे ३०८ वस्तूंच्या किमती तसेच ५० वेगवेगळ्या प्रकारच्या सेवांचे दर यांचा विचार करून ग्राहक किंमत निर्देशांक मोजला जाईल तसेच ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किमतीची माहिती मिळवण्यासाठी देशभरच्या एक हजार ३९५ शहरी बाजारपेठांतून, तर एक हजार ४६५ ग्रामीण बाजारपेठांमधून आकडेवारी गोळा केली जाईल. महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण व शहरी बाजाराप्रमाणेच या नवीन रचनेनुसार विविध प्रकारच्या १२ ऑनलाइन शॉपिंग संकेतस्थळांवरूनदेखील किमतींची आकडेवारी गोळा केली जाईल. किंमत निर्देशांक पद्धत अधिक अद्ययावत आणि कालसुसंगत करण्यासाठी हा बदल खूपच महत्त्वाचा ठरतो. याशिवाय या सर्व वस्तूंचे साधारण १२ प्रकारांत वर्गीकरण केले जाणार असून प्रत्येक वर्गवारीला एक विशिष्ट भारांक दिला जाईल.

वस्तूंच्या वर्गवारीचा भारांक म्हणजे त्या ग्राहकोपयोगी वस्तूंवर खर्च होणाऱ्या उत्पन्नाची सरासरी मासिक टक्केवारी होय. नवीन रचनेनुसार किरकोळ महागाई निर्देशांकावर सर्वात मोठा परिणाम घडवून आणणाऱ्या खाद्य व पेयद्रव्य या वर्गवारीला ३६.७५ टक्के एवढाच भारांक (वेटेज) दिला गेला असून यामुळे महागाई निर्देशांकात अन्न या घटकाच्या अनिश्चिततेचा परिणाम कमी प्रमाणावर दिसून येईल; तर इतर वस्तूंच्या किमतीतील चढउतार अधिक दृश्यमान होतील. अन्न व पेयजल याशिवाय रोजच्या वापराचे पाणी, वीज, गॅस, इतर इंधने या वर्गवारीला १७.६७ टक्के एवढा भारांक दिला असून आरोग्य, दळणवळण, शिक्षण, हॉटेल सेवा आणि सामाजिक सुरक्षा अशा वर्गवारीमध्ये वस्तू व सेवांची विभागणी करण्यात आली आहे. नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या वस्तू व सेवांच्या खर्चाची आकडेवारी ही बाजाराशी अधिकाधिक संलग्न असल्याने ती अर्थव्यवस्थेचा अधिक विश्वासार्ह निकष बनेल व त्यातून मौद्रिक व राजकोषीय धोरण अधिकाधिक बाजाराभिमुख होईल असे वाटते.

सांख्यिकी मंत्रालयाच्या माहितीनुसार या नवीन रचनेतून काढण्यात आलेला ग्राहक किंमत निर्देशांक हा साधारणपणे २०१३ पासून उपलब्ध असलेल्या ग्राहक किंमत निर्देशांकाच्या आकडेवारीशी पडताळून पाहता येईल. त्यामुळे किंमत निर्देशांकाची जुनी व नवी मालिका ही अभ्यासकांना साधारण फेब्रुवारी महिन्याच्या शेवटपर्यंत उपलब्ध होईल. सांख्यिकी मंत्रालयाच्या माहितीनुसार ग्राहक किंमत निर्देशांकाचे आधुनिकीकरण करणे हा या बदलांचा उद्देश असून याच महिन्यात उपलब्ध होणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्न निर्देशांकाशी किंमत निर्देशांकाची सांगड घालून देशातील राष्ट्रीय उत्पन्न आणि महागाई यातील चढ-उतार यांचा तौलनिक विचार करणे धोरणनिर्मितीच्या दृष्टीने शक्य होणार आहे. म्हणूनच योग्य वेळी झालेला हा बदल अधिक फायदेशीर ठरेल.

महागाई निर्देशांकाच्या दृष्टीने अन्न व पेट्रोलियम या दोन वर्गवारी वगळता मोजला जाणारा गाभा निर्देशांक हा जानेवारी महिन्याच्या शेवटी तीन टक्के एवढा असल्याचे दिसून आले. गाभा निर्देशांक तसेच किरकोळ बाजारातील ग्राहक किंमत निर्देशांक हे दोन्ही रिझर्व्ह बँकेच्या लक्ष्याधारित महागाई नियंत्रण कक्षेत आले असले तरीदेखील बाजारपेठेतील एकल वस्तूंचा महागाईवरील परिणामदेखील लक्षणीय अशा स्वरूपाचा आहे. उदाहरणार्थ, जानेवारी २०२६ या महिन्यात सोन्याच्या किमतीतील वाढ ही सरासरी १९ टक्के, तर चांदीच्या किमतीतील वाढ ही १६० टक्के इतकी जास्त होती हेदेखील लक्षात घ्यावे लागेल.

थोडक्यात, भारतीय ग्राहक बाजारपेठेत होणारे चढउतार हे ग्राहकांची खरेदीची मानसिकता, ग्राहकोपयोगी वस्तूंचे स्वरूप आणि मागणीची लवचीकता यावर अवलंबून असतात आणि त्यानुसार बाजाराचा प्रतिसाद ठरत जातो हे निश्चितपणे मान्य करावे लागेल. देशाचे आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी या पुनर्रचित पद्धतीचे स्वागत करताना, वित्तीय आणि मौद्रिक धोरणाच्या पुनर्रचनेसाठी हा बदल सकारात्मक आहे असे मत व्यक्त केले आहे. अर्थात सद्य:स्थितीतील किंमत निर्देशांकातील घसरण ही रिझर्व्ह बँकेच्या मौद्रिक धोरणासाठी जमेची बाजू आहे. कारण नजीकच्या भविष्यात रिझर्व्ह बँकेला व्याजदरात घट घडवून आणून बाजारात अधिक तरलता उपलब्ध करून देणे व गुंतवणुकीस हातभार लावणे शक्य होणार आहे. आर्थिक वृद्धीसाठी हे सुचिन्ह मानावे लागेल.

**डॉ. अपर्णा कुलकर्णी**

# संघ आणि विनोबा

भूदान, ग्रामदान आंदोलनाचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांनी सर्वोदय साप्ताहिकामध्ये ९सप्टेंबर१९४९ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी 'अनुताप की आवश्यकता' या शीर्षकाखाली एक टिपण लिहिले होते. मूळ टिपण हिंदीत आहे.त्याचा मराठी सारांश असा...



आरएसएसच्या लोकांनी आता आपले विधान जाहीर केले आहे. त्यांचा उद्देश राजकीय काम करण्याचा नसून सांस्कृतिक कार्य करण्याचा आहे व त्यासाठी ते शांततापूर्ण आणि न्याय्य मार्गांचे अवलंबन करतील. त्यांच्या सभासदांना कोणत्याही राजकीय पक्षात दाखल होण्याचा अधिकार राहील. जे पक्ष हिंसात्मक व गुप्त संघटन करू इच्छितात, अश्या पक्षांमध्ये त्यांचे सभासद सामील होणार नाहीत. आणि सर्व धर्मांच्या बाबतीत ते सहिष्णुता बाळगतील. या सगळ्या गोष्टी चांगल्या आहेत आणि या नुसार ते काम करतील तर त्यांच्या हातून काही सेवा होईल, अशी आशा बाळगता येईल.

परंतु एक गोष्ट त्यांनी सोडून दिली पाहिजे, जी ते आजकाल करत आहेत. ते त्यांच्या पूर्वीच्या कामांचे समर्थन करत आहेत. ते असे म्हणतात की 'आम्ही जे विधान तयार करीत आहोत ते काही आमच्यातील बदलामुळे नव्हे. आम्ही पहिले जे करत होतो तेच हे आहे'. त्यांना सच्चेपणाने काम करायचे असल्यास अशाप्रकारचे स्वतःचे समर्थन करणे त्यांनी सोडून दिले पाहिजे. त्यांच्या जुन्या कामांविषयी महाराष्ट्रातील सामान्य लोकांमध्ये अत्यंत अविश्वास आणि रोष आहे. तो सर्व रोष व अविश्वास फक्त गैरसमजावर आधारित आहे, असे म्हणता येत नाही. त्यांनी प्रत्यक्षात अशी काही पद्धत अवलंबिली आहे की जी लोकांची सेवा करण्याऐवजी काही खास लोकांचे अधिकार कायम करणारी होती. त्यामुळे जर आज ते म्हणत असतील की आम्ही सच्चेपणानेच काम केले तर ते असत्या आहे यातून त्यांच्यावर जनतेचा विश्वास निर्माण होणार नाही, उलट अविश्वास जो आहे तो वाढेल.

म्हणून पश्चातापाची आवश्यकता आहे. मी असे नाही म्हणणार की दुसऱ्या पक्षांनी नेहमीच सत्याचे अवलंबन केले आहे. परंतु त्यामुळे आर एस एस वाल्यांचा बचाव होऊ शकत नाही. हिंसा आणि असत्याचा प्रयोग कमी अधिक प्रमाणात पुष्कळ पक्षांनी केलेला आहे. परंतु आर एस एस वाल्यांविषयी एक विशेष अविश्वास जनतेत आहे, हे त्यांनी ओळखले पाहिजे. जनतेत त्यांच्यावर होणारे सर्व आरोप कदाचित खरे नसतीलही, पण त्यातील जितका अंश सत्य आहे तो त्यांनी सूक्ष्मपणे पाहावा व पश्चाताप करावा, अन्यथा ते कोणतेही चांगले काम करू शकणार नाही.

त्यांच्यामध्ये अनेक त्यागी निष्ठावान व शक्तिशाली लोक आहेत, यात शंका नाही. अश्या लोकांचे चुकीच्या रस्त्याने जाणे अथवा निष्क्रिय राहणे देखील हानिकारक ठरू शकते मी असेही मानतो की सामान्य जनतेच्या प्रवाहापासून हे त्यागी आणि पराक्रमी लोक वेगळे पाडण्यात आमचा, माझाही दोष आहे कारण जर अहिंसेला आम्ही मानत असू तर अश्या लोकांना आत्मसात करण्याची शक्ती आमच्यात असली पाहिजे. आम्ही आमच्या कार्यक्रमांमध्ये त्यांना आकर्षित करण्याइतकी स्फूर्ती प्रगट करू शकलो नाही. गांधीजी जेव्हा आपल्या पक्षाचे दोष जाहीर करायचे तेव्हा ते काही गमावत नसत. आर एस एस वाल्यांना मी जो सल्ला दिला आहे. तो एक मित्र म्हणून दिलेला आहे. माझा हा सल्ला त्यांच्या हृदयापर्यंत जाईल अथवा नाही हे मला माहित नाही. पण त्यांच्यातील काही लोकांनाही माझे म्हणणे पटले तर मला समाधान वाटेल. आणि अशी अपेक्षा मी बाळगेन की ते त्यांची कार्यपद्धती बदलतील.

(महिलाश्रम, वर्धा.)

**किशोर देशपांडे**

# अहिंसक घटनेचा धुरंधर...

भारताचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण झाले आणि राष्ट्राची घटना लोकांना समर्पित करून लोक प्रतिनिधींनी आपापल्या जागा घेत भारताचे नेतृत्व करायला सुरुवात केली.प्रधानमंत्री ते गावचा सरपंच हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले राजकीयक्षेत्र या राष्ट्रात सांभाळण्याची जबाबदारी घेत आज पंचाहत्तरावी उलटून गेली.

नुकताच संविधान वर्षाचा उत्सव पार पडला.संविधानाला आताच्या संविधान भवनात म्हणजे संसदेत चर्चिल्या गेले.एकीकडे चर्चिलने हे राष्ट्र जनतेच्या स्वाधीन करायला विरोध केला होता.कारण ब्रिटिश साम्राज्याने भारताची प्रशासन व्यवस्था, व कायद्याची घडी सांभाळण्याबद्दल भारतीय अपरिपक्वता असल्याचे जाहीर केले होते.मात्र मोहनदासने त्यांना त्यांच्या भाषेत उत्तर देण्याची कुवत ठेवली होती.मोहनदास हे अशा गुरुचे चले होते; त्या गुरूच्या १११ व्या पुण्यस्मरणार्थ उजाळा देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे मोहनदास करमचंद गांधीचे राजकीय गुरु म्हणून त्यांचे हिंदुस्थानबद्दलचे राष्ट्रसमर्पण हे अत्यंत मौलिक होते. महात्मा बुद्धाची अहिंसा जगावर निशस्त्र राज्य करीत होती; तत्कालीन बॉम्बे उच्च न्यायालयाचे भारतीय न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे त्या बुद्धाचे फॉलोवर होते.न्यायमूर्ती रानडे यांना गुरुस्थानी ठेऊन गोपाळ कृष्ण गोखले यांनी स्वतःचे आयुष्य राष्ट्राला समर्पित केले.हिंदुस्तानचे स्वराज्य हे अहिंसक आणि घटनात्मक मार्गाने प्राप्त करण्यासाठी सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना केली.



घटना ही कशी असावी? त्याचा उद्देश काय असावा? ह्याचे अग्रणी गोपाळ कृष्ण गोखले हे आहेत.कारण गोखले हे इंपिरियल लेजिसलेटीव कौन्सिल चे संसदपटू म्हणून निवडल्या गेले होते.त्यांना घटना काय काम करू शकते याचा अंदाज व अभ्यास झाला.भारत सेवक समाजासाठी राष्ट्राला समर्पित युवकांची निवड पदवीधर या पात्रतेतून करीत असताना मोहनदास वर यांचे अपार प्रेम जडले आणि हिंदुस्थान काय आहे; त्यासाठी राष्ट्रभ्रमण करून अभ्यासावे. असा सल्ला मोहनदासला देणारे राजकीय गुरु गोपाळ कृष्ण गोखलेच आहे. राष्ट्रातील शोषिक व राष्ट्राचे शोषक हे एकाच मायभूमीचे लेकरे असल्याचे जाणवल्यावर गोखल्यांनी ब्रिटिशांचे शासन शिक्षणासाठी स्वीकारले आणि स्वतः आयसीएस ही परीक्षा देण्याचा निर्धार केला. कारण त्यांना सुद्धा हिंदुस्थानची घटनात्मक बांधणी करायची होती.

त्यासाठी भारत सेवक समाज ही संस्था देशभरात हिंद सेवक संघ म्हणून ग्रामीण विकास करण्यासाठी उभारल्या गेली.इंग्रजांच्या करप्रणालीला आवाहन देत ब्रिटिश लष्करावरचा खर्च शिक्षणाकडे वळवून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे तर शिक्षणाच्या गुंतवणुकीतून राष्ट्र विकास होतो असा विश्वास गोखलेना होता.त्यामुळे नामदार गोपाळ कृष्ण गोखले घटनात्मक मार्गाचा अवलंब करणारे घटनेचे आद्य धुरंदर आहेत; असे त्यांचा अभ्यास करताना दिसून येते.

अहिंसक व घटनात्मक मार्गाने आध्यात्मिक राजकारण करण्याचा विचार प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करणारे गोखले मानवीवंशाला सार्वभौम व्यवस्थेत सुव्यवस्थित ठरवण्याचे मार्ग घटनात्मक व अहिंसक असावे;याकरिता प्रयत्नरत होते. त्यामुळे ते मवाळ विचारसरणीचे पुरस्कर्ते होते. बुद्ध तत्त्वज्ञानाचा पगडा त्यांचेवर होता. त्याच दिशेने भारतीय घटना निर्माण झाल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्धधम्म स्वीकारला; हे सुद्धा आपण विचारात घेतले पाहिजे.भारतीय राज्यघटना ज्या मूल्यांचे संगोपन करते त्या मूल्याला मानवी वंशाच्या विकासासाठी निश्चितच उपयुक्त समजावे.

ज्याची पाळेमूळ गोखले यांनी रोवली; त्यामुळे ते आजच्या भाषेत घटनेचे धुरंधर होते.अवघ प्रौढत्व त्यांच्या कार्याने व्यापल होते.त्याच धुरंधरीत स्वतःच्या आजारपणाकडे लक्ष देण्याचा विसर पडला आणि महात्मे घडवणारा द्रष्टा १९फेब्रुवारी१९१५ मध्ये अल्पायुष्यात विसावला. त्यांच्या १११व्या पुण्यस्मरणाला विनम्र आदरांजली.

**डॉ.प्रवीणकुमार एस. राऊत**
सदस्य सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटी.

जनमाध्यम

# शेंबाळपिंपरीत बनावट देशी मद्यसाठ्यावर छापा

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई, दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त; तीन आरोपी अटकेत

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : पुसद तालुक्यातील शेंबाळपिंपरी येथे राज्य उत्पादन शुल्क विभाग, पुसद-1 विभागाने बनावट देशी मद्य निर्मिती व विक्री प्रकरणी मोठी कारवाई करत सुमारे 2 लाख 2 हजार 40 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई 16 फेब्रुवारी रोजी गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे शेंबाळपिंपरी, ता. पुसद, जि. यवतमाळ येथील एका किरकोळ देशी दारू दुकानात बनावट मद्य तयार करून त्याची विक्री केली जात असल्याची माहिती विभागाला मिळाली होती. त्यानुसार दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुसद-1 विभाग यांच्या पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला असता मोठ्या प्रमाणात बनावट देशी दारू तसेच त्याच्या निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य आढळून आले. कारवाईदरम्यान 90 मि.ली. आणि 180 मि.ली. क्षमतेचे बनावट देशी दारूचे बॉक्स, बनावट लेबल, ओरिजिनल लेबल, बनावट बुच (झाकण), एक मोबाईल फोन आणि इतर साहित्य असा एकूण 2 लाख 2 हजार 40 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हे बनावट मद्याचे सेवन केल्याने लोकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो तसेच शासनाच्या महसुलाचे खूप मोठे नुकसान होते. त्यामुळे या प्रकरणी तीन जणांविरुद्ध गुन्ह्या दाखल करून आरोपीना जागीच अटक करुन आरोपीस दोन दिवसांची एक्साईज मिळाली आहे. ही कार्यवाही आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उप-आयुक्त पराग नवलकर, अधीक्षक नितेश शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक अनिल पिकले, सुकेशनी शिंदे, जवान पंजाब राठोड, महेंद्र रामटेके, वाघजी बोंबले, पुनम गटलेवार, प्रतिक कौटुरवार यांनी यशस्वीरित्या पार पडली असून पुढील तपास दुय्यम निरीक्षक अनिल एन. पिकले करीत आहेत.

राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ यांनी सर्व जनतेस असे आवाहन केले की, अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक या बाबत कोणतीही तक्रार असल्यास या विभागाच्या टोल क्रमांक १८००८३३३३३३ व व्हाटसअॅप क्रमांक ८४२२००११३३ या वर संपर्क करावा. माहिती/खबर सागंणाऱ्या व्यक्तीचे नावे गोपनिय ठेवल्या जाईल, असे आवहन करण्यात आले आहे.

# ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : महाराष्ट्रातील जानेवारी 2026 ते डिसेंबर 2026 दरम्यान मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांनी हा कार्यक्रम प्रसिद्ध केला असून सहसचिव वर्षा भरोसे यांनी याबाबतचे अधिकृत पत्रक जारी केले आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील सुधारित तरतुदी तसेच महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार, स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपते त्या महिन्याच्या सहा महिने आधीपासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संबंधित क्षेत्र व हद्दीत कोणताही बदल करता येणार नाही. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यवाही तात्काळ सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कार्यक्रमानुसार तहसिलदारांनी 20 फेब्रुवारी 2026 पर्यंत गुगल अर्थ नकाशांवर सुपर इम्पोज करून प्रत्येक गावाचे अंतिम नकाशे तयार करणे. त्यानंतर संबंधित तलाठी व ग्रामसेवकांनी संयुक्त स्थळ पाहणी करून 27 फेब्रुवारी 2026 पर्यंत प्रभाग पाडणे व सीमा निश्चित करणे. तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने, ज्यामध्ये गटविकास अधिकारी व संबंधित मंडळ अधिकारी यांचा समावेश असेल, 5 मार्च 2026 पर्यंत प्रारूप प्रभाग रचनेची तपासणी करणे. समितीने तयार केलेला प्रारूप प्रस्ताव 11 मार्च 2026 पर्यंत उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे. जिल्हाधिकाऱ्यांनी नमुना 'ब' मधील प्रारूपाची संक्षिप्त तपासणी करून आवश्यक दुरुस्त्या करत तो 17 मार्च 2026 पर्यंत राज्य निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी पाठवणे. राज्य निवडणूक आयोगाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याने 23 मार्च 2026 पर्यंत आवश्यक असल्यास दुरुस्त्या करून अंतिम मान्यता देणे. त्यानंतर 30 मार्च 2026 पर्यंत तहसिलदार अध्यक्षतेखालील समितीने सर्व दुरुस्त्या अंतर्भूत करून प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता देणे. प्रारूप प्रभाग रचनेला 7 एप्रिल 2026 पर्यंत व्यापक प्रसिद्धी देऊन हरकती व सूचना मागविण्यासाठी जाहिर सूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. नागरिकांना 13 एप्रिल 2026 पर्यंत हरकती सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे. प्राप्त झालेल्या सर्व हरकती 16 एप्रिल 2026 पर्यंत उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येतील व 21 एप्रिल 2026 पर्यंत त्यावर सुनावणी घेतली जाईल.

# आमरण उपोषणाचा आठवा दिवस : स्थानिक नेत्यासह शासन, प्रशासनाकडून उपोषण बेदखल

## बंजारा समाजाच्या आरक्षणात होणारी घुसखोरी थांबवा; जिनकर राठोड सामाजिक कार्यकर्ते

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - संत सेवालाल महाराज मंदिर आदर्श नगर वाशिम रोड पुसद येथे बंजारा समाजाच्या न्यायिक व विधायक प्रश्नांना घेऊन शासन व प्रशासन दरबारी कायम आग्रही असणारे बंजारा समाजाचे सामाजिक कार्यकर्ते जिनकर राठोड यांनी दिनांक - 12/02/2026 पासून अन्नत्याग आमरण उपोषणाला सुरुवात केली असून या आमरण उपोषणास आठ दिवस उलटूनही शासन, प्रशासन दरबारी हे उपोषण बेदखल आहे. नायब तहसीलदार यांनी या उपोषणाला भेट दिली पण उपोषणकर्त्याचे समाधान न झाल्यामुळे आपल्या उपोषणाच्या भूमिकेवर ठाम मुख्यमंत्री, पालकमंत्री सह स्थानिक नेत्याने या उपोषणाकडे पाठ फिरविल्याने, दखल न घेतल्याने बंजारा समाज बांधवांकडून शासनाप्रती रोष व तीव्र नाराजी व्यक्त होत आहे याचीच दखल घेत उपोषण कर्त्याचे तब्येतीची विचारपूस करून त्याला समर्थन व पाठिंबा जाहीर करण्यासाठी काल शेतकरी नेते मनीष जाधव यांनी या उपोषण स्थळी भेट दिली प्रकृती बिघडत असल्याने उपोषण मागे घेण्याची विनंती केली पण उपोषणकर्त्यांनी नकार दिल्याने ते हताश झाले. यापूर्वी जिनकर राठोड यांनी 22 फेब्रुवारी 2019 ला मुंबई येथे तर 30 सप्टेंबर 2023 पासून ते 9 ऑक्टोबर 2023 ब्राह्मणगाव तालुका पुसद जिल्हा यवतमाळ येथे 23 जून ते 7 जुलै 2024 पर्यंत स्थळ- वसंतराव नाईक पुसद येथे तर 8 सप्टेंबर 2025 ते 18 सप्टेंबर 2025 संत सेवालाल महाराज मंदिर स्वप्न नगरी माहूर रोड पुसद या ठिकाणी उपोषण केले दोन वेळा राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी शासन प्रतिनिधी म्हणून त्यांच्या उपोषणाची सांगता केली त्यावेळी या सर्व न्यायिक मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन शासन स्तरावर दिले होते पण हे आश्वासन उपोषणकर्त्यासाठी वांझोटे ठरले. शासनाकडे अन्न त्याग आमरण उपोषणाच्या माध्यमातून यावेळेस त्यांनी केलेल्या विधायक मागण्या : बोगस राजपूत भामटा यांची घुसखोरी थांबवणे वन नेशन वन कास्ट वन रिझर्व्हेशन या धर्तीवर अनुसूचित जमाती चे आरक्षण देण्यात यावे. संत सेवालाल महाराज यांच्या जयंती ला शासकीय सुट्टी जाहीर करणे, वसंतराव नाईक यांना भारतरत्न पुरस्कार प्रदान करणे, पुसद येथील वसंत उद्यान श्रीरामपूर हे जनतेसाठी खुले करण्यात यावे, बंजारा आरक्षण करीता आत्मदहन केलेल्या बंजारा समाजातील युवकांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात यावी. गोर बोली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात याव, शासनाने या उपोषणकर्त्याच्या मागण्यांची तात्काळ दखल घ्यावी विकासापासून कोसो दूर असलेल्या बंजारा समाजाला रचनात्मक पद्धतीने विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बंजारा समाज बांधवाकडून मागणी होत आहे यावेळी शेतकरी नेते मनीष जाधव, विकास राठोड काटखेडा, सामाजिक कार्य, पंजाब चव्हाण याडिकर पुसद, रणजित चव्हाण उडदिकर, डॉ राहुल राठोड आयकॉन हॉस्पिटल, आकाश राठोड कासोळा, निलेश आडे जणुना,सोनू पवार उमरीगड, सर्व समाज बांधव या उपोषणकर्त्यांच्या पाठीशी आहे.

# • वेचक



## शिवमंदिर संस्थान लेवा येथे मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर संपन्न

महागाव - तालुक्यातील लेवा येथील शिवमंदिर संस्थान येथे अखंड हरिनाम, श्रीमद् भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाचे आयोजन दिनांक 11 फेब्रुवारी ते 17 फेब्रुवारी पर्यंत सुरू आहे. या सप्ताहातील पाचव्या दिवशी महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर सामाजिक उपक्रम भक्तीच्या सोबतीला सेवेचा हात आरोग्य म्हणजे पूर्ण जीवनाची नवी पहाट, जनसेवा हीच ईश्वर सेवा म्हणून कमिटीने मोफत आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरात 110 रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली त्यामध्ये त्यांची बीपी, शुगर तसेच मशीनद्वारे नेत्र तपासणी करण्यात आली व गरजू रुग्णांना चष्मे, ड्रॉप व औषधीचे वाटप करण्यात आले. या शिबिरातील रुग्णांची तपासणी डॉ. राजकुमार माळवे नेत्रचिकित्सक उमरखेड, सुरज भोयर पाटील पद्मावती आय केअर अँड ऑप्टिकल्स माहूर, डॉ. रावसाहेब देशमुख, डॉ. संदीप शिंदे, डॉ. प्रदीप राठोड, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र खडका येथील कर्मचारी डॉ. मानसी कदम, आरोग्य सेविका आंबेकर ताई, राठोड सर, मदतनीस जमदाडे काकू यांनी केली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी विलास खंदारे, ओमप्रकाश भगत, कैलास खंदारे, रवींद्र देशमुख, सचिन देशमुख, जीवन खंदारे, आदित्य देशमुख,राजू खंदारे, किशोर मारशेट्टीवर, सोनबा खंदारे, नितीन शिंदे, हरी देशमुख, गणेश शिंदे,देवाशिष देशमुख तथा शिव मंदिर संस्थान कमिटी व अखंड हरिनाम सप्ताह कमिटी यांनी प्रयत्न केले.

## टेंभी ग्रामपंचायतचे उपक्रमशील सरपंच अमोल चिकने यांच्या संकल्पनेला गावकऱ्यांची साथ



महागाव - टेंभी ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून अनेक उपक्रमशील निर्णय मागील पाच वर्षात घेण्यात आले. गाव आणि ग्रामपंचायत ज्यावेळी एका विचाराने काम करते त्यावेळी त्या गावातील प्रत्येक समस्येचे निराकरण होते. सरपंच अमोल चिकणे यांच्या संकल्पनेतून ग्रामस्थांना आव्हान केले आपल्या गावाच्या सुरक्षे करिता आपण सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे या संकल्पनेला ग्रामस्थांनी हाकेला ओ देत लोकसहभागातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविले ज्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हे कार्य टेंभी ग्रामपंचायतीने पूर्णत्वास नेले ज्या कारण गाव सुरक्षित झाले. गावाची सुरक्षा निश्चित झाली. गैरप्रकाराच्या हालचालीला बंधने येतील. गावाची सुरक्षा सुरक्षित करण्याच्या दृष्टीतून गावकरी एकवटले या सहकार्याबद्दल ग्रामस्थांचे अभिनंदन करतो गावाचा सर्वांगीण विकास शासनाच्या विविध योजना आणि लोकसहभाग हा महत्त्वाचा असतो आज टेंभी येथील ग्रामस्थांनी सिद्ध केले ग्रामपंचायतच्या प्रत्येक निर्णयांमध्ये सहकार्य करून आपले गाव विकसित करायचे हा ध्यास टेंभी ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांच्या एकत्रित विचारातून परिपूर्ण होत असताना दिसून येत आहे.

## ओबीसी व डीएनटी विद्यार्थ्यांसाठी केंद्राची 'पीएम-यसस्वी' योजना

यवतमाळ : केंद्र सरकारच्या पीएम-यसस्वी या एकछत्री योजनेंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास वर्ग प्रवर्गातील अधिवास असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना शासनाने लागू केली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक ओमप्रकाश नगराळे यांनी केले आहे. मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना इयत्ता ९ वी व १० वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांसाठी लागू आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यास दर शैक्षणिक वर्षाला रुपये ४ हजार इतका शैक्षणिक भत्ता मिळणार आहे. तसेच मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना ओबीसी, डीएनटी तसेच विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी लागू असून, महाआयटीच्या महाडीबीटी पोर्टलवर मॅपिंग केलेल्या अभ्यासक्रमांसाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. शुल्क निर्धारण समिती एफआरए सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कानुसार राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास वर्गातील विद्यार्थ्यांना महा डीबीटी पोर्टलवरील निर्धारित दराप्रमाणे शिष्यवृत्ती शिष्यवृत्ती लागू राहणार आहे.

# रमजान : संयम, आत्मशुद्धी आणि मानवतेचा पवित्र संदेश

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा : इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र मानला जाणारा रमजान महिना केवळ उपवासाचा कालावधी नसून तो आत्मपरीक्षण, संयम आणि मानवतेची जाणीव करून देणारा आध्यात्मिक पर्व आहे. इस्लामी पंचांगातील नवव्या महिन्यात पाळला जाणारा हा उपवास प्रत्येक मुस्लीमासाठी श्रद्धा आणि शिस्त यांचा संगम असतो.

रमजानमध्ये पहाटे सहरी करून सूर्यास्तापर्यंत अन्न-पाणी त्याग केला जातो. मात्र हा उपवास केवळ शारीरिक नसून मन, वाणी आणि कृती यांचेही शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न असतो. राग, मत्सर, द्वेष यांसारख्या नकारात्मक भावनांवर नियंत्रण ठेवणे आणि सदाचाराचा मार्ग स्वीकारणे, हा या महिन्याचा खरा उद्देश आहे. इस्लामी परंपरेनुसार, पवित्र कुरआनचे अवतरण प्रेषित Prophet Muhammad यांच्यावर याच महिन्यात सुरू झाले. त्यामुळे कुरआन पठण, नमाज आणि विशेष तरावीह नमाज यांना मोठे महत्त्व आहे. मशिदींमध्ये रात्री उशिरापर्यंत इबादत सुरू असते आणि भक्तीमय वातावरण अनुभवायला मिळते. रमजानमध्ये जकात व सदका या दानधर्माला विशेष स्थान आहे. गरजू, गरीब आणि वंचित घटकांना मदत करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा संदेश दिला जातो. उपवासामुळे भुकेची जाणीव अधिक तीव्र होते आणि त्यामुळे इतरांच्या दुःखाची जाणीवही वाढते—यातूनच करुणा आणि सहकार्याची भावना दृढ होते. रमजानच्या शेवटी चंद्रदर्शनानंतर Eid al-Fitr साजरी केली जाते. हा सण बंधुभाव, प्रेम आणि एकात्मतेचे प्रतीक आहे. रमजान आपल्याला केवळ धार्मिक कर्तव्याची जाणीव करून देत नाही, तर एक जबाबदार आणि संवेदनशील समाजघटक होण्याची प्रेरणाही देतो.

आजच्या धावपळीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात रमजान आपल्याला थांबून स्वतःकडे पाहण्याची, चुकींचा विचार करण्याची आणि नव्या उमेदीने पुढे जाण्याची संधी देतो. म्हणूनच रमजान हा केवळ एक महिना नसून आत्मिक उन्नतीचा आणि मानवतेच्या मूल्यांचा उत्सव आहे.

**– तनवीर शा. शेख पांढरकवडा**

# पूसनदी पुल प्रकरण थेट मुख्यमंत्र्यांच्या दरबारी

## दोषींवर कारवाई व कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**





पुसद - दिग्रस मार्गावरील (MDR 51) पूस नदीवरील पुलाच्या बांधकामावरील कथित अनियमितता प्रकरण आता थेट मुख्यमंत्री स्तरावर गेले आहे. स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांनी सुमारे 14.91 कोटींच्या या प्रकल्पाबाबत गंभीर आरोप करत, देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेसह संबंधित विभाग यांच्याकडेही तक्रार दाखल केली आहे. सदर काम Work Order No. 5263/TC अंतर्गत मंजूर असून 5 ऑगस्ट 2025 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र फेब्रुवारी 2026 पर्यंत काम अपूर्ण असल्याने विलंबाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. रवी ग्यानचंदानी जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा. दीपक परिहार जिल्हा सरचिटणीस, भाजपा. अॅड.विश्वास गोविंदराव भवरे जिल्हा कार्यालय प्रमुख, पुसद जिल्हा भाजपा आणि अश्विन रमेशलाल जयस्वाल उत्तर भारतीय आघाडी जिल्हाध्यक्ष, पुसद जिल्हा भाजपा यांनी जिल्हाधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह आता थेट मुख्यमंत्री यांचे दरबारी निवेदन सादर केले आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, कामाच्या ठिकाणी आवश्यक माहिती फलक नसणे, कालावधी वाढ (EOT) संदर्भातील आदेश सार्वजनिक न करणे, वाहतूक सुरक्षेची अपुरी उपाययोजना, तसेच कामगार सुरक्षेतील त्रुटी या बाबी अत्यंत गंभीर आहेत. हा मार्ग पुसद शहराला दिग्रस, नागपूर व राष्ट्रीय महामार्ग 361 शी जोडणारा मुख्य दुवा असल्याने येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. अशा ठिकाणी अपुरी सुरक्षा उपाययोजना नागरिकांच्या जीवितासाठी धोकादायक ठरू शकतात, असे त्यांनी नमूद केले आहे. तसेच काँक्रीट चाचण्या, तांत्रिक नोंदी, क्यूब टेस्ट व इतर गुणवत्तेसंबंधी कागदपत्रे उपलब्ध नसल्याचा आरोप करत कामाच्या दर्जाबाबतही शंका व्यक्त करण्यात आली आहे. काही ठिकाणी लोखंडी सळ्या उघड्या व जंग लागलेल्या अवस्थेत दिसत असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. तक्रारदारांनी स्पष्ट मागणी केली आहे की, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. चौकशीत संबंधित कंत्राटदार दोषी आढळल्यास त्यास तात्काळ ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. महत्वाची बाब अशी की, हे काम पूर्णपणे स्पर्धात्मक टेंडर प्रक्रियेद्वारे झाले असते, तर अधिक बिलो दर मिळून शासनाचा आर्थिक फायदा झाला असता, असा दावा तक्रारदार यांनी केला आहे. सार्वजनिक निधीतून उभारल्या जाणाऱ्या या महत्त्वाच्या प्रकल्पात पारदर्शकता व गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री स्तरावर हस्तक्षेप व्हावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाकडे आता संपूर्ण पुसद तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# सृजनशील प्राचार्य हेमंत महल्ले यांच्या पुढाकाराने जीवघेणे खड्डे बुजविले

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - पुसद-महागाव मार्गावरील गुंज ते कलगाव दरम्यान सुरू असलेले रस्त्याचे काम मागील वर्षभरापासून अत्यंत कासवगतीने सुरू आहे. या दरम्यान सवना बसस्थानकाजवळ मोठा व धोकादायक खड्डा निर्माण झाला होता. या खड्ड्यामुळे अनेकदा उसाने भरलेल्या ट्रॅक्टर-ट्रॉल्या पलटल्याच्या घटना घडल्या असून मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली होती.या वर अंकुश लावण्यासाठी वि.रू.महाविद्यालयाचे सृजनशील प्राचार्यांच्या पुढाकाराने नुकत्याच जीव घेण्या खड्यात मुरूम टाकून मार्ग सुरळीत केला गेला. या मुळे त्यांचे परिसरातील नागरिकांनी त्यांना धन्यवाद दिले.

सवना गावालगत नॅचरल शुगर कारखाना असल्याने जड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. तसेच विठ्ठल रुक्मिणी कला-वाणिज्य महाविद्यालय,श्री. शिवाजी महाविद्यालय आणि ग्रामीण रुग्णालय यामुळे अनेक खेड्यांतील नागरिकांची सतत ये-जा सुरू असते. त्यामुळे या ठिकाणचा खड्डा 'जीव घेणारा' ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये होती. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन श्री विठ्ठल रुक्मिणी कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महले यांनी पुढाकार घेत स्वखर्चाने त्या खड्ड्यात मुरूम व खडी टाकून तो बुजविला. संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी त्यांनी केलेल्या या कृतीचे परिसरात कौतुक होत आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने या मार्गावरील रखडलेल्या कामाकडे तातडीने लक्ष देऊन कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वर्तमान काळात कवी, लेखकच समाजाला दिशा देऊ शकतात : राम देवसरकर

**जनमाध्यम प्रतिनिधी**




उमरखेड - वर्तमान काळात कवी, लेखकच समाजाला दिशा देऊ शकतात. विद्यार्थ्यांनी संधीचा फायदा घेऊन करिअर करून स्वतःच्या पायावर उभे राहावे, असे प्रतिपादन यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ सिनेट सदस्य राम देवसरकर यांनी केले. गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयात आयोजित "कलाविष्कार" स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे सचिव डॉ. यादवराव राऊत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. छत्रपती संभाजीनगर येथील साहित्यिक व कवयित्री गुंजन पाटील, प्राचार्य डॉ. माधव कदम, महाविद्यालय सल्लागार समितीचे सदस्य दत्तराव शिंदे, सुभाषराव शिंदे, आयक्युएसी समन्वयक प्रा. डॉ. कुंतल बोंपिलवार व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधवराव कदम यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा चढता आलेख मांडला. या प्रसंगी आयक्युएसीने तयार केलेले न्यूजलेटर व अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. उषा पाटील यांच्या चार पुस्तकांचे मान्यवरांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले. मराठी साहित्यिक व कवयित्री गुंजन पाटील यांनी उद्घाटनपर भाषणातून मार्गदर्शन केले. त्यांच्या 'भ्रष्टाचार', 'मुलींना सारं कळतं!' आणि अतिशय गाजलेल्या 'लक्ष्मणरेखा' कवितेसह हृदयस्पर्शी, बहारदार विविध प्रेम कविता, स्त्री भ्रूणहत्येसारख्या विषयावर भाष्य करणाऱ्या सामाजिक कविता आणि स्त्रीवादी कविता त्यांनी सादर केल्या. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्या म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनो; सोशल मीडियाचा चांगला, जबाबदारीने वापर करा, आजचे बाहेरचे जग माणुसकी कमी करण्याचे काम करीत असताना महाविद्यालये माणुसकी निर्माण करीत आहेत. स्वतः मधील माणुसकी नष्ट होऊ देऊ नका. मुलींना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, मुलींना आपले स्वतःचे जग बनवावे लागेल. मुलींनो, स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःचे असे घर बनवा की, तुम्हाला तुमच्या त्या घरातून कोणी ऊठ, जा असे म्हणणार नाही. डॉ. यादवराव राऊत यांनी अध्यक्षीय मनोगतातून "कलाविष्कार" स्नेहसंमेलनास शुभेच्छा दिल्या. स्नेहसंमेलनात समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या वरिष्ठ सल्लागार समितीचे सदस्य अॅड. विलासराव देवसरकर व अमोल इंगळे यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. स्नेहसंमेलन उद्घाटन व समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वंशिका गंगात्रे, कल्याणी वानखेडे, वैभवी संगेवार, मंगेश कदम, साईनाथ निर्मलवाड, राहूल कांबळे व रितेश गाडेकर या विद्यार्थ्यांनी केले.

स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. माधवराव कदम यांच्या मार्गदर्शनात सांस्कृतिक विभाग समिती, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी - विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

# छत्रपती शिवराय जन्मोत्सव-२०२६ : 'शिव शौर्यगाथा' सांस्कृतिक सोहळ्याने पुसद दुमदुमले; मान्यवरांकडून उत्स्फूर्त दाद

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - छत्रपती शिवराय जन्मोत्सव समिती पुसद यांच्या वतीने शिवजन्मोत्सव २०२६ निमित्त दिनांक १६ रोजी आयोजित 'शिव शौर्यगाथा' या भव्य शालेय सांस्कृतिक कार्यक्रमाने संपूर्ण परिसर शिवमय केला. इतिहास, संस्कृती आणि राष्ट्राभिमान यांचा संगम घडविणाऱ्या या सोहळ्यास मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. माधवराव माने होते, तर उद्घाटक म्हणून उपविभागीय अधिकारी डॉ. आशिष बीजवल यांनी उपस्थिती लावली. प्रमुख अतिथी म्हणून मिलिंद उदयपूरकर, डॉ. स्वप्निल देशमुख, विनोद जिल्हेवार यांच्यासह समितीचे मुख्य समन्वयक राजेश साळुंखे, मार्गदर्शक दिगंबर जगताप व अध्यक्ष हरगोविंद कदम , दीपक जाधव, शिक्षण विस्ताराधिकारी अमित बोजेवार, परीक्षक पंजाबराव सुरोशे, मीनाक्षी खंदारे, गणेशराव धर्माळे, माधवी गुल्हाने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. असावरी नितीन पवार हिने सादर केलेल्या जिजाऊ वंदनाने कार्यक्रमाची मंगल सुरुवात झाली. सांस्कृतिक समिती प्रमुख प्रा. गजानन जाधव यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील संकल्पना स्पष्ट केली. उद्घाटक डॉ. आशिष बीजवल यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात शिवचरित्रातून प्रेरणा घेऊन नेतृत्वगुण, शौर्य व संघटनशक्ती आत्मसात करावी, असे प्रतिपादन केले. अध्यक्ष अॅड. माधवराव माने यांनी शिवजयंती उत्सवाची ऐतिहासिक परंपरा उलगडत समितीने जपलेला सांस्कृतिक वारसा उल्लेखनीय असल्याचे सांगून सर्वांचे अभिनंदन केले. यानंतर पुष्पावंती परिसरातील १०+१०-२० शाळांमधील तब्बल ४५० विद्यार्थ्यांनी 'महाराष्ट्र संस्कृती दर्शन' या संकल्पनेवर आधारित नेत्रदीपक सादरीकरणे केली. राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित नृत्यनाट्य, पोवाडे, देशभक्तीपर गीत आणि ऐतिहासिक प्रसंगांच्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या अभिनयकौशल्य, वेशभूषा आणि संवादफेकीला मान्यवरांनी उत्स्फूर्त दाद दिली. सहभागी सर्व शाळांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. दोन दिवस चालणाऱ्या कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे वेगवेगळ्या सत्रात सूत्रसंचालन प्रा. गजानन जाधव नीता खराटे चंद्रकांत ठेंगे व यशवंतराव देशमुख यांनी समर्थपणे केले, तर चंद्रशेखर देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले.

या सांस्कृतिक सोहळ्यास पुसद शहरी व ग्रामीण भागातून उत्तम प्रतिसाद लाभला असून परिसरातील मोठ्या संख्येने शिवप्रेमी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. शिवचरित्रातील शौर्य, राष्ट्रनिष्ठा आणि संस्कार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा समितीचा उपक्रम यशस्वी ठरल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली. सदर शिवजन्मोत्सव यशस्वीतेसाठी समीतीचे सर्व पदाधिकारी सदस्य प्रयत्नशील आहेत.

# प्रस्तावित कर्ज निवारण योजनेसाठी नेरमधील थकीत शेतकऱ्यांनी कागदपत्रे सादर करावीत

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : राज्य शासनाच्या प्रस्तावित कर्ज निवारण योजनेसाठी जिल्ह्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती संकलित केली जात आहे. नेर तालुक्यात एकूण ५ हजार ३९० थकीत सभासद असून त्यापैकी आतापर्यंत ४ हजार ८०५ थकीत शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यात आली आहे. उर्वरित ५८५ शेतकऱ्यांनी तात्काळ संबंधित सोसायटीच्या सचिवांकडे किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.शाखा नेर येथे भेट देऊन आधार कार्ड, फार्मर आयडी व इतर आवश्यक कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन नेर येथील सहकार अधिकारी एम.एम भगत यांनी केले आहे.

शेती क्षेत्रासह शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांच्या अनुषंगाने प्रस्तावित कर्ज निवारण योजनेसाठी विहीत नमुना प्रपत्र अ व ब मध्ये माहिती मागविण्यात आली आहे. सहाय्यक निबंधकांच्या मार्गदर्शनाखाली विहीत नमुन्यात प्रपत्र अ व ब मध्ये माहिती भरण्याचे काम सुरू आहे. ज्या सभासदांचे आधार तपशील अद्याप सेवा सोसायटीकडे प्राप्त झालेले नाहीत, ते प्राप्त करुन घेण्यासाठी सहकार अधिकारी व संबंधित कार्यालयीन कर्मचारी, तसेच संबंधित सहकारी संस्था सचिव किंवा बँकेचे वसुली अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आवश्यक माहिती व कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन नेरचे सहकार अधिकारी मनोज भगत यांनी केले आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# विदर्भासाठी संशोधन व नवोपक्रमाचे नवे पर्व; 'व्हि जी राईज सेंटर'चे उद्घाटन

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेत नव्या उपक्रमाला प्रारंभ

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन येथे उभारण्यात आलेल्या 'व्हि जी राईज सेंटर'चा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. संशोधन,नवोपक्रम, कौशल्य विकास व उद्योजकता यांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणारे हे केंद्र विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी नवे पर्व ठरणार असल्याचे मत व्यक्त करून मान्यवरांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेत आता नव्या उपक्रमास सुरुवात झाल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल असे सांगितले.





श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित स्व वसंतराव गुलालकरी राईज (RISE) सेंटरच्या उद्घाटन समारंभ छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून डॉ. माधव जी. लाभे, उद्घाटक म्हणून डॉ. यशवंत काटपातळ,विशेष अतिथी म्हणून समित सिंघई तसेच हरीश मोहोड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले व कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव डॉ. व्ही.जी. ठाकरे,स्वीकृत सदस्य डॉ. अमोल महल्ले, दानदाते प्रशांत गुलालकरी,प्राचार्य डॉ. जी. आर.गोसावी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून हेमंत काळमेघ यांनी सांगितले की, प्रत्यक्ष अनुभव, प्रकल्पाधारित शिक्षण व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे, हा या केंद्राचा मुख्य हेतू आहे.व्हि जी राईज म्हणजे रिसर्च, इनोव्हेशन, स्किलिंग व एंटरप्रेन्युअरशिप. या चार स्तंभांवर आधारित एकात्मिक परिसंस्था येथे विकसित करण्यात आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आयओटी, रोबोटिक्स, इलेक्ट्रिक व्हेईकल, स्मार्ट ॲग्रीकल्चर, स्मार्ट हेल्थकेअर आदी क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष काम करण्याची संधी सेंटरच्या माध्यमातून मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संशोधन व नवोपक्रम प्रयोगशाळा, प्रोटोटाइप विकासासाठी स्वतंत्र सुविधा, स्टार्टअपसाठी को-वर्किंग स्पेस तसेच सेमिनार हॉल्स, मीटिंग रूम इ. अत्याधुनिक पायाभूत सुविधा येथे उपलब्ध असणार आहे. विविध संस्थांमधील आंतरशाखीय संशोधन व उद्योग-शैक्षणिक सहकार्य वाढविण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे सुमित सिंघई यांनी सांगितले.

सेंटरबाबत बोलताना प्रशांत गुलालकारी यांनी सांगितले की, 'विदर्भातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या संधींसाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागू नये, या उद्देशाने राईज सेंटरची संकल्पना मांडली. शिक्षण व उद्योग यांच्यातील दरी कमी झाली पाहिजे. विद्यार्थ्यांना नोकरी शोधणारे नव्हे, तर रोजगारनिर्माते बनविण्याचा आमचा प्रयत्न आहे.' आपल्या वडिलांच्या वसंतराव गुलालकरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे केंद्र सुरू केल्याचे सांगत त्यांनी मूल्याधिष्ठित शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि प्रादेशिक विकास यावर भर दिला.

व्हि जी राईज सेंटरमुळे विदर्भात संशोधन संस्कृतीला चालना मिळेल, स्थानिक समस्यांवर स्थानिक उपाय शोधले जातील. युवक, महिला व वंचित घटकांसाठी नवी संधी निर्माण होईल, अशी अपेक्षा डॉ.यशवंत काटपातळ यांनी व्यक्त केली. शासकीय उपक्रम, स्टार्टअप इंडिया व आत्मनिर्भर भारत यांसारख्या धोरणांना पूरक ठरणारे प्रकल्प येथे विकसित होणार असल्याचे हरीश मोहोड यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

'योग्य वातावरण व मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या कल्पना संशोधनात, स्टार्टअपमध्ये व सामाजिक परिवर्तनात रूपांतरित होऊ शकतात,' असा विश्वास माधव लाभे यांनी यावेळी व्यक्त केला. व्हि जी राईज सेंटर डॉ. पंजाबराव देशमुख पॉलिटेक्निक येथे सुरू झाल्यामुळे भविष्यात विदर्भाच्या शैक्षणिक व औद्योगिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, अशी अपेक्षा हर्षवर्धन देशमुख यांनी यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केली.

प्राचार्य डॉ.जी.आर गोसावी यांनी स्वागत पर भाषण केले. संचालन प्रा.अभिजीत खोने आभार प्रदर्शन प्रा.प्रशांत ठाकरे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीव सभासद विविध महाविद्यालयाचे प्राचार्य मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जंगली डुकराच्या हल्ल्यात मजूर जखमी



**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

टाकरखेडा संभू ते देवरी निपाणी शेतशिवार परिसरात सकाळी सुमारे आठ वाजताच्या सुमारास जंगली डुकराने केलेल्या हल्ल्यात एक मजूर युवक जखमी झाला. देवेंद्र मधुकर जवंजाळ (वय ४२) असे जखमी युवकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, देवेंद्र जवंजाळ हे तूर पिकाची पाहणी करण्यासाठी शेतात गेले असता अचानक जंगली डुकराने त्यांच्यावर झडप घालत हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या दोन्ही पायांना गंभीर जखमा झाल्या. जखमी अवस्थेतच त्यांनी कसाबसा शेतातून बाहेर पडत टाकरखेडा शंभू गाव गाठले व स्थानिक डॉक्टरांकडे उपचारासाठी दाखल झाले.डॉक्टरांनी त्यांच्या दोन्ही पायांवर टाके मारून प्राथमिक उपचार केले असून पुढील उपचार सुरू आहेत. देवेंद्र जवंजाळ हे अत्यंत गरीब कुटुंबातील मजूर असून त्यांच्या उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज आहे.परिसरात जंगली डुकरांचा वाढता वावर पाहता शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने तात्काळ दखल घेऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### अमरावतीचे नाव दिल्लीत गाजणार!

## डॉ. स्मिता देशमुख यांना 'जिजाबाई अचिव्हर्स अवॉर्ड'

**अमरावती/का.प्र.**

येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था संचलित, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता रावसाहेब देशमुख यांना दिल्ली विद्यापीठाच्या प्रतिष्ठित शिवाजी कॉलेजतर्फे दिला जाणारा 'जिजाबाई अचिव्हर्स अवॉर्ड २०२५-२६' जाहीर झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे बहुमूल्य योगदान आणि सांस्कृतिक दूत म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा गौरव



शिवजयंतीच्या निमित्ताने करण्यात येत आहे.

राजमाता जिजाऊंच्या प्रेरणेतून २०१० मध्ये सुरू करण्यात आलेला हा पुरस्कार शिक्षण, क्रीडा, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रांत क्रांती घडवून आणणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. डॉ. स्मिता देशमुख यांनी शैक्षणिक क्षेत्रात राखून ठेवलेली नैतिकता, अखंडता आणि नागरी जबाबदारीचे भान या गुणांची समितीने विशेष प्रशंसा केली आहे.शिवाजी कॉलेजचे प्राचार्य प्रो. वीरेंद्र भारद्वाज आणि 'विमेन डेव्हलपमेंट सेल'च्या निमंत्रक डॉ. सुनीता सिंग यांनी या निवडीबद्दल आनंद व्यक्त केला आहे. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी दिल्ली येथे होणाऱ्या भव्य सोहळ्यात डॉ. देशमुख यांच्या कार्यावर आधारित एका लघुपटाचे सादरीकरण देखील केले जाणार आहे. पुरस्काराचे स्वरूप २१ हजार रुपये रोख सन्मानचिन्ह असे राहील.

**अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरणारा**

हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून, संपूर्ण अमरावती शहराच्या आणि शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा आहे. डॉ. स्मिता देशमुख यांच्या या यशामुळे सर्वच स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संक्षिप्त

### डॉ.हेडगेवार हॉस्पिटलमध्ये तपासणी शिबीर

**अमरावती-** २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत डॉ.हेडगेवार हॉस्पिटल, मुधोळकर पेठ येथे रुग्णाच्या सुविधे साठी युरोफ्लोमेट्री चाचणी व मूत्ररोग निदान निःशुल्क तपासणी शिबिर युरोसर्जन, मूत्रविकार तज्ञ डॉ.प्रतिक चिरडे यांच्या मार्गदर्शनात आयोजित केले आहे.यानिमित्त युरोफ्लोमेट्री चाचणी करण्यात येईल. युरोसर्जन डॉ.प्रतिक चिरडे हे रुग्ण तपासणी करतील आणि निदान करून रुग्णांना उपचार सुचविण्यात येतील. विशेषतः युरोफ्लोमेट्री चाचणीच्या दिवशी रुग्णांनी भरपूर पाणी पिवून चाचणीसाठी थांबणे गरजेचे आहे. रुग्णांनी सोबत पाण्याची बाटली, आधीचे रिपोर्ट आणि औषधाची चिट्ठी सोबत आणावी. रुग्णांनी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून पहिले ७५ रुग्णांची तपासणी करण्यात येईल. पहिल्या ३० पुरुष रुग्णांची निःशुल्क पीएसए टेस्ट करण्यात येईल .अधिक माहितीसाठी डॉ. हेडगेवार हॉस्पिटल, मुधोळकर पेठ येथे प्रत्यक्ष अथवा ०७२१-२५६६५८५ किंवा ७७६९०८६३८३ या क्रमांकावर नोंदणीसाठी संपर्क साधावा आणि शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन हॉस्पिटलने केले आहे.

### पुनर्विवाहित परिचय संमेलन रविवारी


**अमरावतीं-**येथील क्रांती ज्योती ब्रिगेड सामाजिक संघटना महाराष्ट्र प्रदेश तर्फे १५ वे राज्यस्तरीय माळी व ओबीसी समाजातील घटस्फोटित, विधवा, विधुर, वयस्क युवक युवती व पालकांचे पुनर्विवाहित परिचय संमेलन रविवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी स्थानिक पंचवटी चौका जवळील मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात सकाळी ११ ते ५ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.संमेलनाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर राहतील. उदघाटन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संचालक हेमंत काळमेघ तर स्वागताध्यक्ष डॉ. नीलकंठ यावलकर राहतील.सदरील संमेलनात 'जीवनवेल' या परिचय पुस्तिकेचे विमोचन डॉ. अनिल सावरकर, नीलकंठ कात्रे, सुनीलभाऊ राणा यांचे हस्ते होईल. विशेष अतिथी म्हणून डॉ. रामचंद्र शेळके, सुभाष बनसोड, उद्धव फुटाणे, अरुण खेरडे प्रमुख अतिथी प्रमोद सोनार, दिलीप लोखंडे, प्रदीप चर्जन, रामराव वानखडे, सुशांत चर्जन, दीपक लोखंडे, भैय्या चर्जन, राजेंद्र ढोरे, सुहास गोगे, राजू सुंदरकर, डॉ. अशोक उमक, संजय हिंगासपुरे, सुधीर रसे, अमोल चिमोटे आदी मान्यवर उपस्थित राहतील.

## ३०० पेक्षा अधिक शिक्षकांचे जुनी पेन्शन योजनेचे दस्तावेज गहाळ

### अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग कार्यालयातील गंभीर प्रकार भाजपच्या शिक्षक नेत्या डॉ.संगीता शिंदे यांची तक्रार

**अमरावती/का.प्र.**

आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या ३०० पेक्षा अधिक शिक्षकांच्या जुनी पेन्शन योजनेशी संबंधित महत्त्वाचे मूळ दस्तावेज अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याबाबत भाजपच्या शिक्षक नेत्या डॉ.संगीता शिंदे यांनी लेखी तक्रार सादर करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.



शासन निर्णय क्रमांक फेब्रुवारी २०२४ तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपूर यांच्या ७ जानेवारी २०२६ च्या निर्णयानुसार पात्र कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार आदिवासी विकास विभागातील शासकीय आश्रमशाळांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांनी नियमानुसार अर्ज व आवश्यक कागदपत्रे सादर केली होती.मात्र, संबंधित शिक्षकांचे मूळ दस्तावेज कार्यालयात उपलब्ध नसल्याची बाब समोर आल्याने संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणाची तातडीने चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच सर्व पात्र शिक्षकांना त्वरित जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी भाजपच्या शिक्षक नेत्या डॉ.संगीता शिंदे यांनी आदिवासी विकास मंत्री अशोक ऊईके यांनी यांच्याकडे केली आहे.

संगीता शिंदे यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे, तीन उपसमित्यांच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश असूनही दोन वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.दरम्यान, संबंधित शिक्षकांनी NPS/UPS पर्यायाबाबत स्पष्टता देत जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी केली आहे. या गंभीर प्रकारामुळे शिक्षकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, शासनाने तत्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## मोकाट जनावरे व शुद्धपाणी पुरवठ्यासाठी वडुरावासीयांचा टाहो

**अमरावती/का.प्र.**


मौजे वडुरा येथे जलशुद्धीकरण पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली होती. परंतु ती योजना पूर्णत्वास न जाता अपुरी सोडून काम पूर्ण झाल्याचे रेकॉर्डवर दाखविल्या गेले. त्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून शुद्ध पाणी पुरवठा गावकऱ्यांना मिळू शकला नाही. परिणामी क्षारपाणी गावकऱ्यांना पाजले गेले. त्यामुळे अनेक रोगराइचे संकटे आली.तसेच वडुरा येथे देवगाईचे सोबत गावकऱ्यांची गुरे ढोरे राहत असून, मोकाट जनावरांचा सुळसुळाट होऊन भन्नाटशाही तयार झाली.यामुळे शेतातील पिके उध्वस्त होत असून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. ग्रामपंचायत मध्ये राजकीय हस्तक्षेपाच्या मनमानीमुळे हा शुद्ध पाणीपुरवठा करणे अशक्य होते,



हे आता गावकऱ्यांच्या लक्षात आले. त्यासाठी गावातील शेतकरी संघटनेचे माजी विदर्भ प्रमुख धनंजय पाटील काकडे यांनी पिण्याचा पाण्याचा प्रश्न हा सतत तीन वर्षापासून लावून धरला.

नादुरुस्त असलेली गावातील पाईपलाईन सुद्धा इंजिनियर अंबाडकर यांच्या देखरेखेखाली दुरुस्त करून घेण्यात आली होती.तसेच राजेश वाटाणे यांच्या नेतृत्वात गावातील ३५ घरकुल परिपूर्ण करण्यात आली होती. ग्रामपंचायत फक्त चार- पाच नावे पंचायत समितीकडे पाठवीत होती.यावेळी सुद्धा बी.डि.ओ. वानखडे यांच्याकडे तक्रार दाखल करून त्यांनी पिण्याचे पाण्याचा प्रश्न अधिकाऱ्याचे निदर्शनास आणून दिला.त्यानुसार तात्काळ टाकीवरून,पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. गावकऱ्यांनी बी.डि.ओ. व ग्रामपंचायतला आर. ओ .फिल्टर बसविण्यात यावे व स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात यावा, यासाठी निवेदन दिले. पाणी पुरवठा अधिकारी उमप यांच्याशी व ग्रा. पं. कार्यालय वडूरा त्यावर चर्चा झाली.यावेळी सरपंच चेतन काकडे, ग्रामसेवक जयश्री ठाकरे, इंजिनियर शुभम वाघमारे,धनंजय पाटील काकडे व सुरेश सुळे,अशोक साकरकर,अंबादास बुल, श्रीकृष्ण पोहोकर, रामाभाऊ राऊत, पिंट्या साबळे व इतर कर्मचारी तेजस डहाके व अंकुश ठाकरे हे सुद्धा उपस्थित होते.

### नवनियुक्त पदाधिका-यांचा सत्कार



**अमरावती-**श्री अंबादेवी संस्थान तर्फे अमरावती महानगर पालिकेचे नवनियुक्त महापौर श्रीचंद तेजवानी तसेच उपमहापौर सचिन भेंडे व गटनेता चेतन गावंडे यांचा श्री अंबादेवी मंदिरात आई जगदंबेचा प्रसाद, शाल व श्रीफळ देऊन संस्थेचे उपाध्यक्ष किशोर बेंद्रे व सचिव डॉ. जयंत पांढरीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व गटनेता चेतन गावडे यांचा संत्कार अशोक खंडेलवाल, विश्वस्त श्री अंबादेवी संस्थान, यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी महापौरांनी आपल्या मनोगतामध्ये आपले मत व्यक्त करतांना संस्थेला सहकार्याची ग्वाही दिली व परिसर स्वच्छ राहील याकडे विशेष लक्ष देईल असे सांगितले. संचालन श्री अंबादेवी संस्थानच्या विश्वस्त मीना पाठक आभार प्रदर्शन डॉ. जयंत पांढरीकर यांनी केले. कार्यक्रमाला विलास मराठे, ॲड. दिपक श्रीमाळी तसेच व्यवस्थापक आप्पाजी कोल्हे यांचेसह श्री अंबादेवी संस्थान चा सेवेकरी वर्ग उपस्थित होते.

### बेबी थोरात यांचे निधन

**करतखेडा :** दर्यापूर तालुक्यातील पिंपळोद येथील ज्येष्ठ नागरिक बेबी शेषराव थोरात यांचे महाशिवरात्रीच्या दिवशी १५ फेब्रुवारीला सकाळी साडेदहा वाजता वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७० वर्षे होते. त्यांचा सागर वाडी येथे अंतिम संस्कार करण्यात आला. त्यांच्या मागे दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे.

## अचलपूर महावितरण विभागीय कार्यालयात दलालांचा सुळसुळाट

**अचलपूर/वार्ताहर**

परतवाडा शहरातील अचलपूर महावितरण विभागीय कार्यालय मध्ये दलालांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात असून या कार्यालयात उपविभागीय अभियंता व कनिष्ठ अभियंतांच्या उद्धट व मनमानी कारभारामुळे ग्राहक मोठ्या प्रमाणात त्रस्त झालेले आहे .एकीकडे या कार्यालयामध्ये नवीन कनेक्शन, मीटर दुरुस्ती व नवीन मीटरची मागणी ,थकीत वीज देयक भरून तात्काळ वीज पुरवठा सुरू करणे असे विविध महावितरणाशी संबंधित कामांसाठी अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरातून नव्हे तर अचलपूर तालुक्यातील नागरिक, शेतकरी ,कामगार वर्ग मोठ्या संख्येने येतात.पण अचलपूर महावितरण विभागीय कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दुर्लक्षामुळे कार्यरत असलेले अधिकारी-कर्मचारी व कोणताही अंकुश नसल्याने अनेक अभियंता व कनिष्ठ अभियंता ची मनमानी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे.यामुळे ग्राहक वर्ग मोठ्या प्रमाणात त्रस्त झालेला आहे.

एकीकडे अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातून अनेक दुकानदार व्यावसायिक आपले थकीत वीज देयक भरतात .पण हे थकीत वीज देयक भरल्यानंतर तात्काळ त्यांचा विज पुरवठा संबंधित अभियंत्याकडून सुरू केला जात नाही .त्यासाठी सुद्धा त्या दुकानदारांना आर्थिक भुर्दंड सहन करून अनेक चकरा या कार्यालयात माराव्या लागतात. विशेष म्हणजे काही दलाल तक्रारीसाठी आलेल्या त्या दुकानदारांना पैशाची मागणी करीत तात्काळ ती समस्या मार्गी लावणार असे आश्वासन सुद्धा देत असल्याची माहिती समोर आलेली आहे .एकीकडे अचलपूर महावितरण विभागीय कार्यालयातील अधिकारी - कर्मचारी यांच्याकडे ग्राहकांसोबत संवाद व तक्रारीचे विचारपूस करण्यासाठी ही वेळ नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अनेक अधिकारी- कर्मचारी हे मोबाईलवर व सहकारी सोबत संवादात व्यस्त असल्याचे चित्र पाहायला मिळते .यामुळे ग्राहकांनी आपल्या तक्रारी मांडायच्या तरी कुठे ? हा प्रश्न निर्माण झालेला आहे. यामुळे वरिष्ठ अधिकारी अचलपूर महावितरण विभागीय कार्यालयात वाढत्या दलालांच्या सुळसुळाटवर आणि अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारावर अंकुश लावून ग्राहकांना तात्काळ सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी ठोस निर्णय घेणार काय ? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

■ अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात नव्हे तर तालुक्यातून महावितरणच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहे.तसेच शेतकरी बांधवांच्या कृषी पंपाशी संबंधित सुद्धा अकरावीचा त्यात समावेश आहे. यामुळे शेतकरी व नागरिकांना महावितरण संबंधित सर्व सुविधा चांगल्या प्रकारे मिळाव्या आणि दप्तर दिरंगाई व अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारावर अंकुश लागावा आणि सर्वसामान्य जनतेला कोणताही त्रास होऊ नये यासाठी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून तत्काळ तोडगा काढण्याचे आदेश देणार आहे.

**-आ.प्रवीण तायडे**

■ यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेणार आहे.कार्यालयात येणाऱ्या ग्राहकांना सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्या व भविष्यात नागरिकांच्या अचलपूर महावितरण विभागीय कार्यालयाशी संबंधित कोणतीही तक्रारी येऊ नये यासाठी ठोस उपाय योजना राबविण्याचे आदेशही संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना देणार आहे.

**-खा.बळवंत वानखडे,खासदार**

# शिवाजी महाराज जयंतीनिमित्त

## जाणता राजा

जाणता राजा, रयतेचा राजा म्हणून जगभरात दरारा असलेल्या छत्रपती शिवाजी महारा जांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी साजरी केली जाते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, स्वभावा तील सहिष्णुता, दूरदृष्टी, करारीपणा व धाडसी वृत्ती अशी अनेकविध गोष्टी आजही समाजाला प्रेरणा देतात. शिवाजी महाराजांपासून प्रेरणा घेत लोकमान्य टिळक स्वातंत्र्य संग्रामात सहाभागी झाले होते आणि त्यांनी शिवाजी महाराज जयंती उत्सव साजरा करण्याची प्रथा सुरु केली.

छत्रपती शिवाजी महाराज हे असे महापुरुष होऊन गेले की, त्यांचे कार्य, पराक्रम आणि विचार यांची प्रेरणा अजूनही ताजी आहे. आजही आपण त्यांच्या काळासंदर्भात त्यांच्या स्वराज्य निर्मितीचा विचार करायला लागतो तेव्हा त्यांनी किती प्रतिकूल स्थितीत हे सतीचे वाण आपल्या हाती घेतले होते याचा आश्चर्य वाटतो.

शिवाजी महाराज ज्या प्रदेशात रहात होते तो प्रदेश आदिलशहाच्या अधिपत्याखाली होता. तेव्हा त्यांच्या विरोधात बंड करणे म्हणजे प्राणाशी गाठच असायची. डोळे फोडणे, मालमत्तेची राखरांगोळी करुन जबर दंड बसवणे, कुटुंबांसह जाळून हत्या करणे, तोफेच्या तोंडी देणे, कडेलोट करणे, हत्तीच्या पायाखाली चिरडून मारणे किंवा घोड्यांच्या पायांना बांधून फरपटत नेणे अशा अमानुष शिक्षा दिल्या जात असत. अशा शिक्षा भोगण्यापेक्षा त्यांच्या पायाशी शरण जाणे परवडेल अशी मानसिकता समाजात होती. पण शिवाजी महाराजांनी अशाही परिस्थितीत परकीयांची राजवट उलथून टाकून स्वत:चे राज्य निर्माण करण्याचा पण केला. हे त्यांचे महान कार्य आजही आपल्याला प्रेरणा देत असते.

शिवाजी महाराजांनी एकदा साहस करण्याचा निर्धार केल्यावर कितीही संकटे आली तरीही आपल्या ध्येयापासून विचलित न होण्याचा त्यांचा गुणही असामान्यच होता. राजे निश्चयापासून ढळले असते तर सारे सहकारीही बिथरले असते. म्हणून खंबीरपणे उभे राहून महाराजांनी केवळ अडचणींना तोंडच दिले असे नाही तर त्या अडचणींतून मोठ्या कुशलतेने मार्गही काढले. महाराजांनी आपल्या सवंगड्यात स्वराज्य स्थापनेचा ध्येयवाद इतका पक्का रुजवला होता की, त्या ध्येयवादाच्या मार्गातून त्यांचे सहकारी कधीही ढळले नाहीत. शिवाजी महाराजांचे काही आप्त त्यांच्या विरोधात होते. पण तरीसुद्धा ते डगमगले नाही. स्वराज्यापायी आपल्या संसाराची



वाताहत कशाला करुन घ्यायची? असा विपरीत विचार शिवाजी महाराजांनी केला नाही. शिवाजी महाराजांचे आयुष्य संघर्षमय होते. तरी त्यावर पाय रोवून उभे राहत महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली.

शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे होते. शिवाजी महाराज घोड्यांचा वापर निर्णायक प्रसंगी करत असत. शिवाजी महाराजांनी अनेक मोहिमांमध्ये घोड्यांचा वापर नेमकेपणाने केला. शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास, तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे सात घोडे होते. कृष्णा या पांढऱ्या घोड्यावर शिवाजी महाराज राज्यभिषेकानंतर बसले होते. सुरतवर चढाई, आग्राहून सुटका अशा मोहिमांवर त्यांनी विजय मिळवला.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करताना सुमारे ४०० गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वत: बांधले, तर काही किल्ले लढाया करुन जिंकले. महाराजांचे गड-किल्ले म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतीकच होते.

आजच्या घडीला शेकडो फूट बोअर करुनही पाणी लागत नाही. परंतु महाराजांच्या ४०० वर्षानंतरही महाराष्ट्रातील कुठल्याही किल्ल्यावर गेलो, तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावरील टाक्यांमधून स्वच्छ पाणी आढळते. या गड-किल्ल्यांवर कोणतीही पाईपलाईन असल्याचे दिसत नाही.

शिवाजी महाराजांनी प्रत्येक किल्ल्यावर २ प्रकारचे हौद बांधले. एक खुले आणि दुसरे भूगर्भात किल्ल्यावरील पाण्याचे हौद वा टाक बांधकामात खडक फोडण्यासाठी दारुगोळा किंवा सुरुंग कधीच वापरले नाहीत. त्याऐवजी नैसर्गिक साधनांचा वापर करुन खडक फोडले. म्हणूनच टाक्यांचा आकार एकदम आयताकृती आहे. याच टाक्यांमधील पाणी संपूर्ण गडावर वापरले जायचे. ते पाणी स्वच्छ ठेवण्यासाठी नैसर्गिक तंत्राचा वापर केला जायचा. पाण्याचे टाके ५० ते १५० फुट खडकापर्यंत खोल कोरलेले आहेत. वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वत: डिझाइन करुन राजगड बांधल्याचे सांगितले जाते.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अष्टप्रधान मंडळाचे महत्त्व अनन्यसाधारण होते. जगाच्या इतिहासात हा एकमेव राजा आहे, ज्याच्या दरबारी कधी स्त्री किंवा नर्तकी नाचली नाही. छत्रपती शिवाजी महाराज अतिशय चारित्र्यसंपन्न होते. महाराजांनी स्वत:साठी मोठे महाल बांधले नाहीत. सत्तेचा वापर स्वत:च्या किंवा कुटुंबाच्या फायद्यासाठी केला नाही. शिवाजी महाराज नेहमी 'रयतेचे स्वराज्य' असाच शब्द वापरत.

महाराष्ट्राच्या किनार पट्टीवर १६७१ मध्ये मीठ शेती केली जायची. परंतु इंग्रज, डच, पोर्तुगीज यांनी तेथील शेती मोडीत काढण्यासाठी गोवा प्रांतातून मीठ आणून त्याची स्वस्तात विक्री सुरु केली, हे लक्षात आल्यावर महाराजांनी आयात मिठावर कर लावला, त्यामुळे आयात मीठ महाग झाले व आपल्या शेतकऱ्यांच्या मिठाची मागणी वाढली. रयतेच्या विचारांचे निर्णय म्हणजे जाणता राजा.

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले हाच केवळ त्यांचा मोठेपणा आहे असे नाही, तर त्यांनी शुन्यातून स्वराज्य निर्माण केले आणि अक्षरश: मुठभर सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी इतिहासदत्त कार्य केले. मध्ययुगामध्ये अनेक राजे, महाराजे आणि सुलतान होऊन गेले त्यांच्याशी तुलना केली असता शिवाजी महाराजांचे स्वराज्य विस्ताराने फारसे मोठे नव्हते. प्रजेला कसलाही त्रास होऊ नये, याबाबत शिवाजी महाराज कमालीचे दक्ष होते.भूमीवर अधिपत्य गाजवणारे अनेक भूपती..

या जगती जन्मले आणि मेले, परंतु करोडो हृदयावर अधिपत्य गाजवणारे एकच शिवछत्रपती अवतरले !! छत्रपती शिवाजी महाराज ..

गगन भेदी नजर ज्याची, पहाड
सम विशाल काया !!
धगधगता सुर्य ही झुकतो, वंदितो
तुला शिवराया !!!

**कविता फाले - बोरीकर**

## शिवछत्रपती...

तू शिवछत्रपती, तू
शिवछत्रपती
गीत शौर्याचे
उमटती नभांगणी

जणू आकाशीचा चंद्र
खुडूनी
उतरला सह्याद्रीच्या अंगणी

समशेर तुझी चौफेर उधळे
शौर्य गाजविले तू रणांगणी

मराठी अस्मितेचा ध्वज
लहरे
सर्वदुर जणू तो रंग
अस्मानी

स्वराज्याचे तोरण बांधिले
पाजलेस तू शत्रूस पाणी

गडकोटावरती नाव कोरले
सार्थ झाली जिजाऊंची
वाणी


अस्मिता बनून झळकतो
तू प्रत्येक मराठी
मनाच्या प्रांगणी

अभिमानाने लवुनी
मुजरा करतो

कित्येक सहस्त्रवेळा
तुज वंदुनी

**राजश्री शेषरावजी खाजोने**
चांदूर बाजार,
जि.अमरावती
मो.९६६५६८०६३

# शिवजयंती : स्वराज्याच्या स्वप्नपूर्तीचा सुवर्णदिन



***'निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू। अखंडस्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।'***

समर्थ रामदास स्वामींनी ज्यांचे वर्णन अशा शब्दांत केले, त्या छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यामागचा उद्देश केवळ आनंदोत्सव नसून महाराजांचे विचार, त्यांचे युद्धकौशल्य आणि त्यांचे 'रयतेचे राज्य' ही संकल्पना पुन्हा एकदा स्मरणात आणणे हा आहे. १९ व्या शतकात महात्मा जोतिराव फुले यांनी रायगडावरील महाराजांची समाधी शोधून काढली आणि १८७० मध्ये पुण्यात पहिली शिवजयंती साजरी केली. पुढे लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले, जेणेकरून समाज एकत्र येईल. शिवाजी महाराजांनी वयाच्या १५ व्या वर्षी रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्याची शपथ घेतली, तेव्हा त्यांचे स्वप्न केवळ एक राज्य जिंकणे हे नव्हते. त्यांचे स्वप्न होते 'रयतेचे राज्य' निर्माण करणे.शिवाजी महाराज हे केवळ एक योद्धे नव्हते, तर ते एक कुशल प्रशासक आणि दूरदृष्टी असलेले नेते होते. शत्रूच्या स्त्रीलाही मातेचा दर्जा देऊन सन्मानित केले.बलाढ्य शत्रूंना आपल्या बुद्धीच्या जोरावर धूळ चारली. भारताच्या समुद्री सीमा सुरक्षित करण्यासाठी आरमाराची उभारणी केली, म्हणूनच त्यांना 'भारतीय आरमाराचे जनक' मानले जाते.भ्रष्टाचारमुक्त आणि शेतकऱ्यांच्या हिताचे राज्य (रयतेचे राज्य) निर्माण केले.

आज आपण २१ व्या शतकात जगत असतानाही अनेक सामाजिक आणि राजकीय प्रश्नांनी वेढलेले आहोत. अशा वेळी शिवराय फक्त पुतळ्यापुरते मर्यादित न राहता, त्यांचे विचार आचरणात आणणे ही काळाची गरज आहे.केवळ घोषणा देऊन स्वराज्य येत नाही, तर त्यासाठी प्रामाणिकपणा, चारित्र्य आणि कष्टाची तयारी लागते.आजच्या काळात शिवजयंती साजरी करताना केवळ ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुका काढण्यापेक्षा, महाराजांचे विचार आचरणात आणणे अधिक महत्त्वाचे आहे. पर्यावरणाचे रक्षण, गडकिल्ल्यांचे संवर्धन आणि समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान करणे हीच महाराजांना खरी मानवंदना ठरेल.

**वर्षा आवदे**

# स्त्री सन्मानाचे अग्रदूत

डिजिटल युगात परंपरा आणि आधुनिकतेचा संगम राखण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोककल्याणकारी स्वराज्यात स्त्रियांबद्दलचे धोरण सन्मान, सुरक्षा आणि नीतिमत्तेवर कसे आधारित होते हे अभ्यासनीय आहे.शिवकाळात परस्त्रीला मातेसमान मानल्या जाई.महिलांवरील अत्याचाराला, कडेलोट, चौरंगा सारखी कठोर शिक्षा दिली जात असे.आजच्या काळात सरकारने हे धोरण खालील प्रमाणे शेवटच्या माणसापर्यंत राबवायला हवे.

**न्याय प्रणाली:-** कर्तव्य कठोर भावनेने महिलांवरील गुन्ह्यांसाठी महाराजांप्रमाणेच वेगवान आणि कठोर कायदे असावे.

**सुरक्षितता:-** कामाच्या ठिकाणी आणि सार्वजनिक ठिकाणी महिलांना निर्भयपणे काम करता येईल अशी व्यवस्था असावी. शाळा, विद्यालये सुरक्षित असावी जेणेकरून पुन्हा कोणी निर्भया बळी पडू नये.



**समान संधी आणि आदर:-** सर्वप्रथम स्वतःच्या कुटुंबात स्त्री पुरुष भेद न ठेवता, महिलांना समान संधी, आदर, सन्मान, आणि निर्णय प्रक्रियेत प्राधान्य दिले जावे.स्त्री ही समाजाचा कणा आणि कुटुंबाचा आधार असते, ज्या कुटुंबात महिलांचा सन्मान केला जातो, तिच्या कर्तुत्वाला मान्यता दिली जाते, तो समाज नेहमीच अग्रेसर असतो.

**नैतिक शिक्षण:-** कुटुंबातील संस्कार आणि शालेय जीवनापासूनचे शिक्षण यातूनच पुरुषांना संस्काराचे धडे देणे आवश्यक आहे. जेणेकरून स्त्रियांबद्दलची आदराची भावना वाढीस लागेल. केवळ कायदे करून चालणार नाही तर महाराजांसारखी स्त्री-सन्मान ही वृत्ती प्रत्येकाने जोपासणे गरजेचे आहे. शिवरायांच्या प्रशासकीय नियमावलीत स्त्रियांच्या दृष्टिकोनाबद्दल अत्यंत स्पष्ट आणि कडक नियम दिले होते.

**युद्धप्रसंगी:-** शत्रु मुलखावर स्वारी करताना, सैनिकांना सक्त आदेश दिले जायचे की स्त्रिया, बालक, वृद्ध यांना जराही त्रास होऊ नये स्त्रिया जर सापडल्या तर त्यांना सन्मानाने त्यांच्या घरी पोहोचवण्याची व्यवस्था करावी.स्त्रिया वृद्ध आणि बालक यांची सुरक्षा करावी. आणि युद्धप्रसंगी कोणत्याही सैनिक वा पदाधिकाऱ्याने स्वतःसोबत स्त्रियांना सोबत नेऊ नये जेणेकरून स्त्रियांचा अनादर होईल.

एखाद्या वतनदाराने जप्तीच्या प्रसंगी स्त्रियांवर अन्याय केला तर महाराज केवळ त्याला शारीरिक शिक्षा देत नसत तर त्याचे वतन जप्त केल्या जाई.त्याला सत्तेवरून खाली केल्या जाई. गंभीर गुन्हा झाला तर मृत्युदंडाची शिक्षा ठरलेलीच असायची.उदाहरणार्थ रांजणगावच्या पाटलाने जेव्हा एका स्त्रीवर अत्याचार केला तेव्हा महाराजांनी त्याचे हात पाय तोडण्याची म्हणजे चौरंगा करण्याची कठोर शिक्षा दिली होती, यातून स्त्रियांच्या सुरक्षिततेबाबत zero tolerance हे धोरण वापरले होते.तसेच शिवरायांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने साडी चोळी देऊन तिच्या घरी सन्मानाने पाठवले होते आणि आदराने अशीच 'आमुची आई असती सुंदर रूपवती आम्हीही सुंदर झालो असतो...' हे उद्गार काढले. जेणेकरून सुभेदाराच्या सुनेला सुरक्षित वाटेल.यावरून शिवरायांचे स्त्रीविषयक धोरण लक्षात येते.महाराजांच्या मते स्वराज्य म्हणजे केवळ प्रदेश जिंकणे नव्हे तर स्वराज्यातील प्रत्येक व्यक्तीचे रक्षण करणे होय रयतेच्या रक्षणात स्त्रियांचे रक्षण हे सर्वोच्च स्थानी जपले जाई.

स्त्रियांच्या सती प्रथेला महाराजांनी विरोध केलेला होता.उदाहरणार्थ शहाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर, शोक मग्न जिजाऊ माँसाहेब जेव्हा सती जायला निघाल्या तेव्हा महाराजांनी मासाहेबांना सती जाण्यापासून रोखलेले होते.एकंदरीत स्त्री संरक्षण याला सर्वोच्च स्थान होते.स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू नसून एक ऊर्जा शक्ती आणि माता भगिनी मानली जात असे.आजच्या काळात जेव्हा आपण महिला सुरक्षेचा विचार करतो तेव्हा महाराजांनी पाचशे वर्षांपूर्वी राबविलेले हे zero tolerance धोरणच आपल्याला दिशादर्शक ठरू शकते.

**आजच्या काळातील स्त्रियांची स्थिती:-** जगात ९९% स्त्रियांना आयुष्यात एकदा तरी शारीरिक किंवा लैंगिक हिंसेचा सामना करावा लागतो, कुटुंबात वा बाहेर स्त्री सुरक्षित नसून स्त्रियांच्या अपहरण, बलात्कार व हत्येचे प्रमाण वाढत आहे.द लायन सेटच्या २०२५ च्या अहवालानुसार जगात एक अब्जाहून अधिक मुली बालपणीच लैंगिक शोषणाच्या बळी ठरल्या आहेत.याची आकडेवारी फार मोठी आहे सामाजिक भीती आणि बदनामीमुळे बहुतांश वेळेस घटनांची तक्रारच केली जात नाही प्रत्यक्षात हा आकडा फार मोठा असू शकतो.

महाराजांच्या नीतिमत्तेचा वारसा सांगणारे काही महत्त्वाचे कायदे खालील प्रमाणे.कायद्याच्या काही तरतुदी, घरगुती हिंसाचार २०२५ कौटुंबिक छळापासून महिलांना कायदेशीर संरक्षण, कलम ३५४ विनयभंग करणे, ४९८ अ, शारीरिक मासिक छळ, ३०४ ब हुंडाबळी ५०९ शब्द किंवा इशाराने अपमान करणे, ३५४ क चोरून पाहणे, ३५४ ड पाठलाग करणे, विशाखा मार्गदर्शक कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळा विरुद्ध संरक्षण, इद्मेंद पोक्सो कायदा, अल्पवयीन मुला-मुलींच्या संरक्षणासाठी अत्यंत कठोर तरतुदी,

**कलम ३५४ IPC/BNS :-** विनयभंग किंवा स्त्रीच्या अब्रूला हात लावणाऱ्यांपासून कठोर शिक्षेची तरतूद, शक्ती कायदा महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणात फाशी सारख्या कठोर शिक्षेची आणि जलद सुनावणीची Fast track ची तरतूद . या कायद्याची अंमलबजावणी करताना महाराजांसारखे zero tolerance दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे.महाराजांप्रमाणेच कठोर कायद्यांची अंमलबजावणी झाली तर गुन्हेगारांमध्ये वचक बसेल, बालपणापासून मुलांवर स्त्रियांचा आदर ठेवणे हे संस्कार करणे आवश्यक आहे.स्वसंरक्षण याचे प्रशिक्षण अत्यंत गरजेचे असून स्त्रियांना शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे.सुरक्षित वातावरण सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही आणि रात्रीच्या वेळी सुरक्षा पथके यांची गस्त वाढवणे , आणि सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक आहे.महाराजांचे स्त्री सन्मान धोरण आणि आदर हाच वारसा आज जपणे अत्यंत गरजेचे आहे.जय जिजाऊ - जय शिवराय



**प्रा. मयुराताई देशमुख**
जिजाऊ ब्रिगेड आंतरराष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष

# महिला विषयक धोरण आणि आजची स्थिती

रांझ्याच्या पाटलाने बलात्कार केल्याचे समजताच त्याचे हातपाय तोडून चौरंग केला. आज मात्र माता भगिनींची अब्रू लुटणारे हजारो नराधम न्यायालयाच्या छत्राखाली स्वतःला वाचवण्यासाठी धडपडत आहेत. म्हणून आजही शिवरायांच्या स्वराज्याची छाप प्रत्येकाच्या श्वासाश्वासात आहे. पाच वर्षांपूर्वी हिंगणघाट येथे एकतर्फी प्रेमातून प्राध्यापिका असलेल्या तरुणीला एका नराधमाने जिवंत जाळल्याची घटना असो की कोपर्डीच्या बहिणीची झालेली निर्घृण हत्या असो की मागील वर्षी बदलापुरात झालेला चिमुरडी वरील अत्याचार ! या सर्व घटनांनी संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. केवळ याच घटना नाही तर यासारख्या अनेक घटना रोजच या पावन भूमीत घडत आहेत. महिलांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जात आहे. आज या पावन भूमीत कोणतीच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. नराधमांना कायद्याचा धाक नाही. नराधमांना अटक होते त्यांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून जनतेतून उठाव होतो. मोर्चे निघतात. अनेक वर्ष न्यायालयात खटला चालतो. या नराधमांना फाशी होईल अशी अपेक्षा असताना त्यांना जन्मठेपेची शिक्षा होते आणि ही शिक्षाही रद्द व्हावी यासाठी हे नराधम वरच्या न्यायालयात अपील करतात. दररोजचे वर्तमानपत्र चाळलं तर त्यात विनयभंग, छेडछाड, बलात्काराची एकतरी बातमी दिसतेच. आजूबाजूला घडणाऱ्या महिलांविरोधी गुन्ह्यांच्या घटना पाहिल्या की शिवरायांच्या विचारांची, शिवरायांच्या धोरणाची कधी नव्हे इतकी गरज आज असल्याचे जाणवते. कारण शिवरायांच्या शिवशाहित महिला जितक्या सुरक्षित होत्या तितक्या त्या कोणत्याच काळात नव्हत्या. कारण शिवरायांचे महिला विषयक धोरण.

शिवरायांनी महाराष्ट्राला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा संकल्प केला. मराठी माणसांच्या मनात अस्मिता निर्माण केली. अठरापगड जातींना एकत्र करून त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यात सर्वात मोठे कार्य म्हणजे महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सुधारणा, नियम आणि उचललेले कठोर पावले. त्यांचे हे पाऊल म्हणजे महिला मुक्तीसाठी केलेली क्रांतीच होती. हजारो वर्षांपासून चालू असलेल्या अनिष्ठ चालीरीती बदलण्याची धमक कोणत्याच राजाने दाखवली नाही, ती धमक शिवरायांनी दाखवली. त्यांनी स्वतःच्या आईला सती जाण्यापासून परावृत्त केले ही त्याकाळातील सामाजिक क्रांतीच होती. त्याकाळी महिलांना गुलामीची वागणूक दिली जात होती. महिलांची खरेदी - विक्री केली जात होती. महिलांना गुलाम म्हणून वागवले जात होते. शिवरायांनी या सर्व गोष्टींवर बंदी आणली. शिवरायांचे महिलाविषयक धोरण अत्यंत आदराचे होते. जिजामाता या शिवरायांच्या गुरू होत्या. जिजामातेनेच त्यांना स्त्री जातीच्या सन्मानाचे बाळकडू पाजले म्हणूनच पर स्त्री मातेसमान मानणारा व शत्रूच्या स्त्रियांना सन्मान देणारा युगपुरुष म्हणून शिवरायांची इतिहासात नोंद झाली. शिवराय खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. रक्षणकर्ते होते. सैन्याला राजांचे सक्त आदेश होते. स्त्रियांना मोहिमेवर आणू नये, त्यांना युद्धात पकडू नये. स्त्री संबंधी गुन्ह्याला क्षमा नव्हतीच उलट कठोर शिक्षा होती, मग तो कोणीही असो. साधा शिपाई, वतनदार, किल्लेदार, कुणालाही माफी नव्हती. हातपाय तोडणे, देहदंड अशा कठोर शिक्षा दिल्या जात.



रांझ्याच्या पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या तरुण मुलीला उचलून नेऊन भोगली. त्या तरुण मुलीने आत्महत्या केली. जेंव्हा ही गोष्ट शिवरायांना समजली तेंव्हा शिवरायांनी त्याच्या मुसक्या बांधून त्याला पुण्याला आणले. त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिली. जी गोष्ट रांझ्याच्या पाटलाची तीच गोष्ट कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची. तीच गोष्ट सकूजी गायकवाड या सेनापतीची. महिलांसबंधी गुन्ह्याला त्यांच्याकडे क्षमा नव्हती उलट कडक शिक्षाच होती. शिवरायांच्या या महिलाविषयक धोरणामुळेच महिला सुरक्षित होत्या. आजची परिस्थिती मात्र पूर्ण भिन्न आहे. महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. महिलांना सुरक्षा पुरवण्यात सरकार अपयशी ठरत आहे. कायदे असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरला नाही. राज्यकर्त्यांनी शिवरायांच्या महिलाविषयक धोरणांचा अभ्यास करुन ते राबवण्याचा प्रयत्न केल्यास देशात शिवशाही अवतरल्या शिवाय राहणार नाही.

**श्याम ठाणेदार**

# क्लासला जाणा-या विद्यार्थिनीचा पाठलाग ; आय-कार्ड ओढून छेडछाड

■ प्रतिनिधी | अकोला ■

*क्लासला जाणाऱ्या विद्यार्थिनीचा पाठलाग करून तिचे आय-कार्ड जबरदस्तीने ओढत छेडछाड करणाऱ्या विकृत प्रवृत्तीच्या आरोपीस अवघ्या काही दिवसांत जेरबंद करण्यात अकोला पोलीस दलाला यश आले आहे. सोशल मीडियावर या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शहरात संतापाची लाट उसळली होती. अखेर ३०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची तपासणी, २०० मोटारसायकलींची पडताळणी आणि तांत्रिक विश्लेषणाच्या जोरावर पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या.*

## ३०० सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपीला ठोकल्या बेड्या; अकोला पोलीस दलाची कारवाई

१४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळच्या सुमारास तोष्णीवाल ले-आऊट परिसरात ही घटना घडली. विद्यार्थिनी नेहमीप्रमाणे क्लाससाठी जात असताना अज्ञात मोपेडस्वाराने तिचा पाठलाग केला. त्याने जबरदस्तीने तिचे ओळखपत्र (आय-कार्ड) ओढून छेडछाड केली. या प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होताच प्रकरणाची गंभीरता वाढली. अकोल्यात कोचिंगसाठी बाहेर जिल्ह्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला.

घटनेची दखल घेत पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेसह सर्व पोलीस ठाण्यांना आरोपीचा तात्काळ शोध घेण्याचे आदेश दिले. अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या



मार्गदर्शनाखाली तपासाला वेग देण्यात आला.

तपासादरम्यान संशयिताचे वर्णन आणि वापरलेल्या वाहनाची रंग, मॉडेल व कंपनी याची माहिती निश्चित करण्यात आली. त्यानुसार तब्बल २०० हून अधिक दुचाकींची तपासणी करण्यात आली. परिसरातील आणि आजूबाजूच्या भागातील ३०० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज बारकाईने तपासण्यात आले. मोबाईल लोकेशन, तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीद्वारे आरोपीची ओळख पटली.

दरम्यान, अशाच प्रकारची घटना डाबकी रोड पोलीस ठाणे हद्दीत घडल्याची माहिती मिळाली. आरोपीने दुसरे वाहन वापरून गुन्हा केल्याचे समोर आले. डाबकी रोड पोलिसांच्या मदतीने सापळा रचत आरोपीवर पाळत ठेवण्यात आली आणि अखेर त्याला अटक करण्यात आली.या प्रकरणी पोलीस स्टेशन सिव्हिल लाईन, अकोला येथे अप. क्र. ३४२/२०२६, कलम ७४, ७५(२), ७८ बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी विवेक उर्फ विकी दिलीपराव खांडेकर (रा. वानखेडे नगर, डाबकी रोड, अकोला) याला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई यशस्वी केली. या पथकात उपनिरीक्षक गोपाळ जाधव, हेड कॉन्स्टेबल शेख वसीम, महेंद्र मलिये, रवी खंदारे, किशोर सोनोने, अब्दुल माजिद तसेच डाबकी रोडचे पीआय दीपक कोळी, पीएसआय अनिल चव्हाण, एएसआय दीपक तायडे, सिव्हिल लाइनचे पीआय मालती कायटे, पीएसआय शामली निकम, शक्ती कांबळे आदींचा सहभाग होता.

या धडाकेबाज कारवाईमुळे महिलांच्या सुरक्षिततेबाबत पोलिसांची 'झिरो टॉलरन्स' भूमिका अधोरेखित झाली आहे. 'महिलांवरील अत्याचार सहन केले जाणार नाहीत. कोणतीही संशयास्पद घटना घडल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा,' असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

---

### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार नामे मधुकर मोतीराम येवले सर्व रा. मु. धाबा, ता. बार्शीटाकली, जी. अकोला यांनी दिलेल्या अधिकार व माहितीच्या आधारे सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार मधुकर मोतीराम येवले यांच्या मालकीचे व ताब्यात असलेली मालमत्ता ज्याचे वर्णन :- ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ५७०, मौजे - धाबा, ता. बार्शीटाकली, जी. अकोला ज्याचे मोजमाप एकून क्षेत्रफळ ७०२ चौ. फुट, ज्याचे चातुर्सिमा - पूर्वेस - बोल, पश्चीमेस - रस्ता, उत्तरेस- रस्ता, दक्षिणेस - खाली जागा या वर्णनाची मालमत्ता आमचे पक्षकार यांचे मालकीची आहे. सदरहू मालमत्ता गहान ठेवून आमचे पक्षकार हे जना स्माल फायनान्स बँक कडून कर्ज घेत आहेत.

येणेप्रमाणे सदरहु वरील वर्णनाच्या व चतु:सिमेतील सदर मिळकती संबंधी इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, वा इतर कसल्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करिता हि जाहीर नोटीस.

ठिकाण :- अकोला
दिनांक :- १६/०२/२०२६

**पक्षाकाराकरिता अधिवक्ता**
**ॲड. अजय. वा. गोडे**
शॉप क. २३ – ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला,
ता. जि. अकोला, मो.क्र. ९१७५९३८२४२.

### जाहीर सूचना

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. रवी गजानन गवाई, रा. अकोला ता. आणि जि. अकोला हे मौजे उमरी प्र. अकोला, ता आणि जि. अकोला येथील सर्व्हे क्रमांक ८३/२ मधील अकृषक प्लॉट क्रमांक २३ व २४ , याचे ऐकून क्षेत्रफळ ३२०.०० चौ. मी, यावर 'पावन वाटिका अपार्टमेंट' या नावाने इमारतीचे बाधकाम केले आहे, ज्यापैकी चौथ्या मजल्यावरील 'फ्लॅट क्रमांक १५' बांधकाम क्षेत्रफळ ५२.०० चौ.मी. जमिनीचा २०.०० चौ.मी.अविभाजित हिश्यास:, ता. आणि जिल्हा अकोला, हि मालमत्ता खरेदी करण्याचा करार श्री. दिनेश नरेश शर्मा व श्री. गोपाल नरेश शर्मा, यांच्याशी केला असून यांनी सदर मालमत्ता रजिस्टर खरेदी क्र. १३५७, दिनांक ३०/०६/२०२० खरेदी केली असून, मालकी व ताब्यात आहे. सदर मालमत्तेचे जुनी मूळ खरेदिखत र.द.क्र. ३९०८, दिनांक १७/०७/२०१४ हि गहाळ झाली आहे. सदर मालमत्ता खरेदीसाठी माझे पक्षकार हे Muthoot Homefin (India) Ltd. अकोला यांच्याकडून कर्ज घेणार असून, नमूद मालमत्ता गहाण देत आहेत व त्या करिता गहाळ दस्ताची अन्यंत आवशक्यता आहे, म्हणून कोणालाही मिळाल्यास संपर्क साधावा.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किवां गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा; अन्यथा सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार, हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल. तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार/देणार जबाबदार राहील.

अकोला
दिनक:- १८/०२/२०२६

**ॲड. गौरव शि. देशमुख**
आळशी प्लॉट, गजानन महाराज फोटो जवळ, दक्षता नगर चौक, ता. जि. अकोला.
मो. नं. ९०२८२३२२४६

### जाहीर नोटीस

सर्वत्र जनतेस वित्तीय संस्थाना बँकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा- अकोला ता. जि अकोला यांनी ग्राहक नामे श्री. किरण केशव इंगळे रा. पारस, ता. बाळापूर जि. अकोला यांनी आमचे पक्षकाराकडे सदरची मिळकत गहाण ठेऊन कर्ज मिळण्या करीता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे - पारस मालमत्ता क्र.८७९, क्षेत्रफळ २००० चौ.फु. (१८५.८७ चौ.मी.) व त्यावरील बांधकामा सह ग्रा. पंचायत पारस, हद्दीतील, ता. बाळापूर जि. अकोला.

त्यास चतुर्सिमा : पूर्वेस :- शेत पश्चिमेस :- रस्ता उत्तर : शेत दक्षिण :- मंदिर वरील सदरहू मालमत्ता हि श्री. केशव नामदेव इंगळे यांची वडिलोपार्जित मालमत्ता आहे. तरी वरील मालमत्तेवर आज रोजी कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध, खरेदी, गहाण, बोजा व ईसार व इतर काही व्यवहार असल्यास वर दिलेल्या पत्यावर ७ दिवसाच्या आत लेखी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही. असे समजून आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा -अकोला वरील मालमत्ता गहाण ठेऊन वरील ग्राहक यांना कर्जाची रक्कम वितरित करतील त्या नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करीता जाहीर नोटीस.

दिनांक : १८/०२/२०२६
ठिकाण : अकोला

**अधिवक्ता रुपेश ना. इस्तापे**
(नोटरी भारत सरकार)
ऑफीस : आनंद बेकरी जवळ, रामदास पेठ,
अकोला मो. ९४२३४३०१७१

### जाहीर सुचना

सर्व जनतेस, बँक व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री रवींद्र भीमराव इंगोले व श्री महेंद्र भीमराव इंगोले रा. अकोला ता. जि. अकोला ह्यांनी महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लि. येथे खालील वर्णनाची मालमत्ता खरेदी करण्यासाठी गृहकर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे नायगाव म. न. पा., ता. जि. अकोला च्या हद्दीतील शेत स. क्र. ३४ चे वि. तहसीलदार, अकोला यांच्या फाईल वरील मह. प्र. क्र. एन. ए.ए.-४८ / नायगाव/६६/२०२४-२५ आदेश दि. १९/०६/२०२५ नुसार पारित ले-आउट नुसार उत्तर-दक्षिण वाटणीचा पूर्वेकडील भागाचा प्लॉट ५७ ज्याचे क्षेत्रफळ ४६.४६चौ.मी. असून, ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : प्लॉट क्र. ५६ पश्चिमेस : सरदार दत्तुजी गोपनारायण यांची जमीन, ऊत्तरेस : रस्ता व दक्षिणेस: ५ फु. रुंदीचा रस्ता.

वर नमुद मालमत्तेचे पुर्विचे मुळ खरेदीखत दस्त क्र. २५५५ दि. २१/०५/१९९९ जे की मालमत्तेचे साखळी मुळ दस्त आहेत ते हरविलेले/ गहाळ झाले आहे. त्याकरीता पो.स्टे. अकोट फैल, अकोला येथे दि. १५/११/२०२५ रोजी तक्रार दाखल आहे.

त्याअर्थी वरील मालमत्तेवर जर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार, ताबा अथवा आक्षेप असल्यास त्यांनी हि सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप अथवा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लि. तर्फे
**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ८१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## अवैध नळजोडण्यांवर मनपाची कारवाई

**अकोला :** थकीत पाणीपट्टी कर आणि अवैध नळजोडण्यांविरोधात महानगरपालिकेच्या जलप्रदाय विभागाने मंगळवारी ठोस कारवाई केली. प्रभाग क्रमांक ३ मधील गड्डम प्लॉट परिसरातील 'माँ वैष्णवी रेसिडेंसी-५' येथे पाच नळजोडण्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी दोन वैध पण थकबाकीदार जोडण्या तसेच तीन अवैध नळजोडण्या खंडित करण्यात आल्या.

मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

नेम. तारिख :- २४/०३/२०२६

चौकशी क्रमांक :-०४/२०२६ - कलम - 50A(I) नुसार जाहिर नोटिस
महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम - 50A(I) अन्वये
**अर्जदार :-** १) श्री. शंकर रामभाऊ जवंजाळ रा. मु.पो. चंडीकापूर, ता. अकोट जि. अकोला

सर्व संबंधितांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यांत येते की, श्री. चंडीका देवी संस्थान चंडिकापूर ता. अकोट जि. अकोला नों.क्र. A-482(अकोला) या न्यासाचा कारभार व्यवस्थित व योग्यरितीने चालवाया दृष्टीने अर्जदार यांनी वरील अर्ज या कार्यालयात केला आहे.

हया अर्थि या नोटिसीने जाहिर करण्यांत येते की, सदरहु न्यासाचे हित संबंध असणाऱ्या ज्या लोकांना सदर न्सासाचे योजने विषयी काही निवेदन / हरकत करावयाची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन ३० (तीस) दिवसाच्या आंत तशा प्रकारचे लेखी निवेदन / हरकत योजनेच्या मसुद्यावरील चौकशी क्रमांक देउन महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम १९५० चे कलम ७३ (अ) नुसार दहा रुपयांचा कोर्ट फी लावून अर्ज मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे दाखल करावा, तसे न केल्यास सदरहु बाबतीत कोणासही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन कार्यवही एकतर्फी चालवुन निकाल देण्यात येईल. ही नोटीस आज दिनांक - १७/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्यानिशी दिली.

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

### जाहीर नोटीस
**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१९/२०२६ प्रोसेस नं.१९९९/२०२६
चौ.ता. ०६/०३/२०२६ दिनांक : १२/०२/२०२६

**अर्जदार :** १. त्र्यंबक रूपचंद माने २. प्रसाद त्र्यंबकराव माने दोन्ही रा. संतोषी माता मंदिराच्या मागे, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला ३. प्रणाली पंकज दरने रा. गोगटे किराणा जवळ, यशोदा नगर नं. २, गल्ली नं. २, रूख्मीनी नगर, अमरावती. ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुलोचना त्र्यंबक माने
**पत्ता :-** रा.संतोषी माता मंदिर, न्यु खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुलोचना त्र्यंबक माने यांचे दि. ०२/०२/२०२५ रोजी राहते घरी संतोषी माता मंदिर, न्यु खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २४८/२०२६ प्रोसेस नं.२३०४/२०२६
चौ.ता. ०२/०४/२०२६ दिनांक : १७/०२/२०२६

**अर्जदार :** १. कैलास अर्जुन जाधव रा. जुना आरटीओ ऑफिस, गौतम नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. दुर्गा सदानंद गवई रा. बोरगाव, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. अर्जुन विठोबा जाधव २. गौकर्णा अर्जुन जाधव
**पत्ता :-** रा. जुना आरटीओ ऑफिस, गौतम नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अर्जुन विठोबा जाधव यांचे दि. २०/१०/२०२५ रोजी व तसेच मयत गौकर्णा अर्जुन जाधव यांचे दि. २८/११/२०१७ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही त्याअर्थी प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४९/२०२६ प्रोसेस नं.१३८७/२०२६
चौ.ता. ११/०३/२०२६ दिनांक : ०२/०२/२०२६

**अर्जदार :** १. लक्ष्मीबाई पांडुरंग चिमणकर २. अंशुमन नरेंद्र चिमणकर दोघेही रा. लक्ष्मी निवास, गायत्री नगर, गायत्री मंदिरजवळ, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नरेंद्र पांडुरंग चिमणकर
**पत्ता :-** रा. लक्ष्मी निवास, गायत्री नगर, गायत्री शक्तिपिठ जवळ, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयातं वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नरेंद्र पांडुरंग चिमणकर यांचे दि. २७/०८/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# थकबाकीदारांवर मनपाची कारवाई
# उत्तर झोनमधील मालमत्तेला सील

■ प्रतिनिधी | अकोला ■

मालमत्ता कर थकविणाऱ्या धारकांवर अकोला महानगरपालिकेने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. उत्तर झोन अंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील एका मालमत्तेवर थकबाकीपोटी सील ठोकण्यात आले.

मनपा आयुक्त डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार आणि सहाय्यक आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. वार्ड क्र. सी-६ मधील मालमत्ता क्रमांक १६१ ही कृषी उत्पन्न बाजार समिती सेथील 'श्यामलाल दाल मिल' यांच्या ताब्यात असून २०१७-१८ पासून तब्बल ९४ हजार


## शास्ती अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन



८६० रुपयांचा मालमत्ता कर थकीत होता. वारंवार नोटीस देऊनही कर न भरल्याने अखेर संबंधित मालमत्तेला सील लावण्यात आले.

या कारवाईवेळी सहाय्यक अधीक्षक पंकज जोगळेकर, वरिष्ठ लिपिक हेमंत शेळवणे, लिपिक भीमचंद्र रामटेके, मोहन घाटोळ, उबेदुर रहमान आदी कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, थकबाकीदारांना दिलासा देण्यासाठी मनपा प्रशासनाने १४ फेब्रुवारी ते ३१ मार्चदरम्यान 'शास्ती अभय योजना' राबविली आहे. या योजनेअंतर्गत तीन टप्प्यांत शास्ती रकमेत सवलत देण्यात येणार आहे.

पहिल्या टप्प्यात (१४ फेब्रुवारी ते ५ मार्च) कर भरल्यास शास्तीवर १०० टक्के सूट, दुसऱ्या टप्प्यात (६ मार्च ते २० मार्च) ९० टक्के सूट, तर तिसऱ्या टप्प्यात (२१ मार्च ते ३१ मार्च) ८५ टक्के सूट दिली जाणार आहे. थकित कराचा एकरकमी भरणा करून सील, जप्ती आणि लिलावासारखी अप्रिय कारवाई टाळावी, असे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे. मनपाच्या या कारवाईमुळे कर थकबाकीदारांमध्ये खळबळ उडाली आहे.

## छत्रपतींची तुलना टिपूशी : आर्वीत पोंक्षेंची ज्वालामुखी गर्जना

# ‘अधर्माविरुद्ध लढणे हाच खरा शिवविचार’

**आर्वी/जनमाध्यम**



शब्दांचा मारा कसा असतो, याचा प्रत्यय आर्वीकरांना शिवजयंतीच्या निमित्ताने आला. शिवराय जन्मोत्सव समितीच्या व्यासपीठावरून अभिनेते व परखड व्याख्याते शरद पोंक्षे यांनी थेट आणि रोखठोक सवाल उपस्थित करत वातावरण तापवले. छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतान यांच्याशी करणाऱ्यांचा आत्मविश्वास महाराष्ट्रात वाढतोच कसा हा महाराष्ट्र आहे की विस्मृतीचा प्रदेश असा जळजळीत प्रश्न त्यांनी विचारताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. समितीचे अध्यक्ष पवन ढोले यांनी स्वागत केले, तर विवेक उर्फ नंदू वैद्य यांनी प्रास्ताविकातून शिवजयंतीचा वैचारिक हेतू स्पष्ट केला. मात्र पुढे पोंक्षे यांनी घेतलेली झंझावाती भूमिका हा कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला.शिवजयंती म्हणजे केवळ मिरवणूक, फटाके आणि घोषणाबाजी नव्हे. महाराजांचे गुण, त्यांची राज्यकारभाराची शिस्त, निर्णयक्षमता आणि धैर्य आपल्या आयुष्यात उतरवणे हीच खरी शिवभक्ती, असे मत त्यांनी व्यक्त केले. आज धर्म आणि जात यांच्या राजकारणामुळे समाजात निर्माण होत असलेल्या गोंधळावर त्यांनी कठोर शब्दांत टीका केली.‘सेक्युलरिझम’च्या नावाखाली हिंदू समाजाला हीनत्वाची भावना दिली जाते, असा आरोप करत ते म्हणाले, हीन भावना दूर ठेवणारा तोच खरा हिंदू. आपण ताठ मानेने जगतो, ते शिवरायांमुळे. माता जिजाऊंनी दिलेले रामायण-महाभारताचे संस्कार घराघरांत रुजवले, तर प्रत्येक घरात एक शिवराय घडेल.संघर्ष हा हिंदू-मुस्लिम नसून ‘धर्म-अधर्म’ यांच्यातील आहे, असे सांगत त्यांनी ऐतिहासिक दाखल्यांसह शिवरायांच्या युद्धकौशल्याचा, गनिमी काव्याचा आणि अष्टप्रधान मंडळाच्या व्यवस्थापनाचा सविस्तर ऊहापोह केला. अधर्माविरुद्ध उभे राहणे, अन्याय सहन न करणे आणि स्वाभिमान जपणे हाच खरा शिवविचार, असे ते म्हणाले.प्रमुख अतिथी सुधीर दिवे यांनी समितीच्या उपक्रमांचे कौतुक करत, उत्सवाला प्रबोधनाची जोड देणे, हीच खरी शिवसेवा, असे नमूद केले. उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट, विवेक बिंड, विनय देशपांडे, अनिल जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अखेरीस अंकुश झाडे यांच्या स्वरचित कवितेने वातावरण भारावून गेले. किशोर राऊत यांनी आभार मानले.

## मेघा चंदनखेडे यांचे राज्यस्तरीय विज्ञान ऑलिंपियाडमध्ये अभूतपूर्व यश

**सेलू/जनमाध्यम**

राज्य शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आणि SCERT, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धेत सेलू येथील दीपचंद चौधरी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या जीवशास्त्र शिक्षिका मेघा चंदनखेडे यांनी जिल्ह्यात आणि राज्यात चमकदार यश मिळवले आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण वर्धा जिल्ह्यात आनंदाची लहर पसरली आहे.



तालुका ते राज्य: यशाचा प्रवास - शिक्षकांच्या शैक्षणिक आणि बौद्धिक कौशल्यांचा विकास करण्यासाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेत मेघा यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरला. वर्धा येथील केसरीमल कन्या शाळा येथे झालेल्या नागपूर विभागीय स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकावर आपले स्थान निश्चित केले.यानंतर, ३० जानेवारी २०२६ रोजी पुणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत त्यांनी सखोल ज्ञान, प्रगल्भ मांडणी आणि अभ्यासातील पकड यामुळे निर्णायक ठसा उमटवला. मेघा चंदनखेडे ही जीवशास्त्र विषयातील अभ्यासक असून, विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहेत. कठीण संकल्पना सहज समजवून सांगण्याची त्यांची पद्धत आणि अध्यापन शैली प्रेरणादायक ठरते. त्यांच्या यशामुळे महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता राज्यस्तरावर अधोरेखित झाली आहे.या यशामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या सुवासिनी पोहाणे (वंजारी) व उपप्राचार्या डॉ. के. एस. मकरंदे यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. संस्थेचे पदाधिकारी, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. मंगेश वडुरकर, पर्यवेक्षक जी. बी. खंडागळे, एच. जे. मुडे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी मेघा यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.संस्थेचे पदाधिकारी म्हणतात, शिक्षकांनी सातत्याने स्वतःला अपडेट ठेवणे गरजेचे आहे.मेघा चंदनखेडे यांचे राज्यस्तरीय यश संपूर्ण शैक्षणिक समुदायासाठी अभिमान आणि प्रेरणादायी ठरणारे आहे.

# लघू-मध्यम वृत्तपत्रांचा एल्गार

## हक्कांसाठी वरोरा येथे २१ फेब्रुवारीला राज्यस्तरीय अधिवेशन

**चंद्रपूर/जनमाध्यम**

डिजिटल माध्यमांचा वेग, बदलते जाहिरात धोरण आणि शासकीय मान्यतेच्या गुंतागुंतीत लघु व मध्यम वृत्तपत्रांचा श्वास कोंडला जात असताना आता या माध्यमांचा आवाज थेट सत्तेच्या दालनापर्यंत पोहोचवण्यासाठी वरोरा येथे २१ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय अधिवेशनाचे रणशिंग फुंकले जाणार आहे. हक्क, सन्मान आणि अस्तित्व या त्रिसूत्रीवर आधारित हे अधिवेशन स्मॉल अँड मिडीयम न्यूजपेपर असोसिएशन, महाराष्ट्रतर्फे आयोजित करण्यात आले आहे.

नगर भवन, हनुमान वॉर्ड, वरोरा येथे सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत होणाऱ्या या अधिवेशनात राज्यातील विविध जिल्ह्यांतील संपादक, पत्रकार, प्रकाशक, मुद्रक, वार्ताहर तसेच डिजिटल माध्यमांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. लघु व मध्यम वृत्तपत्रांसमोरील आर्थिक अडचणी, जाहिरात वाटपातील असमानता, शासन मान्यतेतील विलंब, पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, तसेच बदलत्या तंत्रज्ञानाचा योग्य वापर या विषयांवर रोखठोक चर्चा रंगणार आहे.अधिवेशनाचे उद्घाटन बल्लारपूरचे आमदार तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते होणार आहे. विशेष अतिथी म्हणून खासदार प्रतिभा धानोरकर, तर प्रमुख अतिथी म्हणून वणीचे आ.संजय देरकर आणि राजुराचे आ. देवराव भोंगळे जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष उत्तम वाडकर राहतील. शिवसेना (शिंदे गट) लोकसभा संघटक मुकेश जीवतोडे तसेच वरोरा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष अर्चना ठाकरे यांचीही उपस्थिती राहणार आहे. जिल्हा माहिती अधिकारी व विविध मान्यवर अधिकारी देखील अधिवेशनात सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.अधिवेशनात सहभागी पत्रकारांना मुक्तपणे आपले अनुभव, प्रश्न आणि सूचना मांडण्याची संधी दिली जाणार आहे. लघु व मध्यम वृत्तपत्रांचा आवाज कुणी दाबू शकत नाही. पत्रकारांचा सन्मान अबाधित ठेवण्यासाठी संघटित शक्ती उभी राहिली पाहिजे, असा संदेश आयोजकांनी दिला आहे.

**पुरस्कारांचा गौरव सोहळा**

अधिवेशनात पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याचा सन्मान करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय युवा पत्रकार पुरस्कार अश्विनी पुरी यांना प्रदान केला जाणार आहे. जिल्ह्यांतील ज्येष्ठ संपादक, पत्रकार व माध्यम प्रतिनिधींना जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांच्या दीर्घकालीन योगदानाचा गौरव करण्यात येणार आहे. वरोरा उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.प्रफुल खुजे यांना ‘देवदूत पुरस्कार’ जाहीर करण्यात आला आहे.वरोऱ्यात रंगणारे हे अधिवेशन केवळ चर्चासत्र न ठरता लघु व मध्यम वृत्तपत्रांच्या अस्तित्वासाठीचा निर्णायक टप्पा ठरेल, अपेक्षा व्यक्त होत आहे.

### संक्षिप्त

## सेवाग्राममध्ये महिलांसाठी मोफत शिवणकला प्रशिक्षण

**सेवाग्राम**- महिलांना स्वयंपूर्ण बनविण्याच्या उद्देशाने आशा ट्रस्ट यांच्या माध्यमातून आशा लर्निंग सेंटर सेवाग्राम येथे मोफत शिवणकला (टेलरिंग) प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येत आहेत. ग्रामीण भागातील महिलांना व विद्यार्थिनींना कौशल्याधारित शिक्षण मिळावे आणि त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे. या प्रशिक्षणामध्ये पर्स, बॅग, पाउच, सॅनिटरी नॅपकिन आदी वस्तू तयार करण्याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन दिले जाणार आहे. घरगुती व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक असलेले प्राथमिक ते प्रगत प्रशिक्षण येथे दिले जाईल. विशेष म्हणजे हे सर्व प्रशिक्षण पूर्णपणे मोफत असून महिलांसाठी ही एक मोठी संधी मानली जात आहे.दुपारी १२ वाजल्यापासून वर्गांना सुरुवात होणार असून इच्छुकांनी रामेश्वर ममसरा ९३२५२२२४२७, ८००७११९६०१,मीना मॅडम ९४२०४२८८८० यांच्याशी संपर्क साधून नोंदणी करावी, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**वर्धा**-सावंगी मेघे ते वर्धा मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. नरेश दुधे (५१), रा. तिगाव असे मृताचे नाव आहे. ते दुचाकीने घरी परतत असताना भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की त्यांचा जागीच मृत्यू झाला. धडक दिल्यानंतर वाहनचालकाने घटनास्थळावरून पळ काढल्याचे सांगितले जाते. घटनेची माहिती मिळताच सावंगी पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविला. याप्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## घरासमोरून दुचाकी चोरी

**वर्धा**-मदना परिसरात घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. एमएच ३२ एझेड १५८६ क्रमांकाची दुचाकी चोरीस गेली असून याप्रकरणी खरांगणा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अश्वीन धुर्वे यांनी रात्री दुचाकी घरासमोर उभी केली होती. सकाळी उठून पाहिले असता वाहन जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोधाशोध करूनही वाहनाचा मागमूस लागला नाही. त्यानंतर पोलिसांत तक्रार देण्यात आली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

## कुलूपबंद घर फोडून ६६ हजारांचा ऐवज लंपास

**वर्धा**-रामदेवबाबा कॉलनी परिसरात कुलूपबंद घर फोडून चोरट्याने




६६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना समोर आली आहे. प्रशांत मसराम यांनी घराला कुलूप लावले असताना अज्ञात चोरट्याने कुलूप तोडून घरात प्रवेश केला. सोन्याचे मंगळसूत्र, अंगठ्या, कानातील टॉप्स, नाकातील दागिने, चांदीचे साहित्य, रोख १४ हजार रुपये व मोबाईल असा ऐवज चोरीस गेला आहे. घटना लक्षात येताच पोलिसांना माहिती देण्यात आली. रामनगर पोलिसांनी पंचनामा करून गुन्हा दाखल केला आहे. परिसरात वाढत्या घरफोड्यांमुळे भीतीचे वातावरण असून पोलिसांनी गस्त वाढविण्याची मागणी होत आहे.

## करंट लागल्याने कामगाराचा मृत्यू

**वर्धा** - सोलर पॅनल शेडवर काम करताना विद्युत प्रवाह लागल्याने एका कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सुरज भंगीलाल परसमोडे (५१), रा. ज्ञानेश्वरनगर म्हसाळा असे मृताचे नाव आहे. एमआयडीसी बरबडी येथील कंपनीत काम करताना फेन्सिंगचा पाइप विजेच्या खांबाला लागल्याने त्यांना जोराचा करंट बसला. घटनेनंतर सहकाऱ्यांनी त्यांना तातडीने सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी सेवाग्राम पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. घटनेमुळे कामगार वर्गात हळहळ व्यक्त होत असून सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

# जिल्ह्यात आरटीई प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

## जिल्ह्यात ११३ शाळांमध्ये १३४७ जागांवर प्रवेश देणार

**वर्धा/जनमाध्यम**

बालकांचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेश प्रक्रियेला दि.१७ फेब्रुवारी पासून सुरुवात झाली आहे. शासनाच्या प्राथमिक शिक्षण संचालनालमाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी सुधारित सूचना निर्गमित केल्या असून, जिल्ह्यातील वंचित व दुर्बल घटकातील बालकांसाठी ही संधी उपलब्ध झाली आहे. पालकांना १० मार्च पर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करता येतील.

पालकांनी https://student.maharashtra.gov.in/admportal या संकेतस्थळावर जाऊन विहित मुदतीत अर्ज भरणे आवश्यक आहे. अर्जात घराचे ठिकाण निश्चित करण्यासाठी ’गुगल मॅप’चा वापर करण्यात येणार असून, रहिवासी क्षेत्रापासून एक किलोमीटर अंतरावरील शाळांची निवड करता येईल, पालकांना अर्जात अचूक माहिती भरण्याचे व शेवटच्या क्षणी होणारी तांत्रिक गर्दी टाळण्यासाठी वेळेत अर्ज करणे गरजेचे आहे. एकापेक्षा जास्त अर्ज भरल्यास लॉटरीसाठी विचार केला जाणार नसल्याने अर्ज काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे.




**कागदपत्रांची पूर्तता आवश्यक**

प्रवेशासाठी पालकांचे आधारकार्ड, बालकाचा जन्मदाखला, रहिवासी पुरावा आणि एक लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेला दाखला अनिवार्य आहे. शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या देखरेखीत कागदपत्र पडताळणी समिती गठीत करण्यात आली असून ही समिती पालकांनी अपलोड केलेल्या मूळ कागदपत्रांची तपासणी करणार आहे.

पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता पोर्टलवर नियमित अपडेट्स तपासावेत.

**जिल्ह्यात १ हजार ३७६ जागा**

जिल्ह्यात वर्धा तालुक्यात ४२ शाळांमध्ये ४६७ जागा व नर्सरी मध्ये २९, आर्वी तालुक्यात १२ शाळांमध्ये ११८ जागा, आष्टी तालुक्यात ४ शाळांमध्ये ५७ जागा, देवळी तालुक्यात १३ शाळांमध्ये १७१ जागा, हिंगणघाट तालुक्यात १८ शाळांमध्ये २१९ जागा, कारंजा तालुक्यात ६ शाळांमध्ये ८२ जागा, समुद्रपूर तालुक्यात ६ शाळांमध्ये ८२ जागा, सेलू तालुक्यात १२ शाळांमध्ये १६१ जागा याप्रमाणे १ हजार ३७६ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया होईल. चुकीची माहिती भरून दिशाभूल केल्याचे आढळल्यास प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द होणार असल्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी कळविले आहे.

# कर्जमाफीची आशा मावळली

## नोटिसांच्या छायेत साहूरचा शेतकरी

**साहूर/जनमाध्यम**

अस्मानी-सुलतानी संकटांनी होरपळलेल्या शेतकऱ्याच्या आयुष्यात यंदाचा खरीप आणि रब्बी हंगाम जणू डोकेदुखी ठरला आहे. निवडणुकीपूर्वी जाहीर झालेल्या कर्जमाफीच्या आश्वासनाने क्षणभर दिलासा मिळाला; मात्र प्रत्यक्षात पदरात काहीच न पडल्याने आता निराशेची छाया दाटली आहे. थकीत पीककर्जामुळे बँकांनी दरवाजे बंद केले असून, थकीतदारांना नोटीसांवर नोटीस बजावल्या जात आहेत.दरवर्षी खरीप हंगामात बँकांकडून शेतकऱ्यांना कर्जवाटप केले जाते. परंतु साहूर व परिसरातील अनेक शेतकऱ्यांची लाखो रुपयांची कर्जे थकीत असल्याने बँका नव्याने कर्ज देण्यास नकार देत आहेत.

आधी थकीत कर्ज भरा, मगच नवीन पीककर्ज मिळेल, असे स्पष्ट शब्दांत अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे. परिणामी, येणाऱ्या खरीप पेरणीसाठी पैसा कुठून आणायचा, हा ज्वलंत प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.गतवर्षीच्या तुलनेत यंदा बियाणे व खतांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे उत्पादन घटले, बाजारभाव घसरले आणि उत्पन्न कमी झाले. अशा दुहेरी फटक्यात शेतकरी आधीच कोलमडला असताना, कर्जमाफीच्या आश्वासनावर विश्वास ठेवून अनेकांनी थकीत रक्कम भरली नाही. मात्र शासनाकडून ठोस निर्णय न झाल्याने त्यांचे कर्ज थकीत खात्यात गेले आहे. दरम्यान, बँकांकडून कर्ज नाकारल्याने शेतकऱ्यांना खाजगी सावकारांचा आधार घ्यावा लागत आहे.

पाच ते दहा टक्के व्याजदराने पैसे देणारे सावकार पुन्हा डोके वर काढत असून, शेतकरी सावकारी पाशात अडकण्याची भीती व्यक्त होत आहे. कर्जमाफीची घोषणा झाली तेव्हा आशेचा किरण दिसला; पण आता निराशेचे ढग दाटले आहेत, अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.एकीकडे दुष्काळी परिस्थिती, तर दुसरीकडे बँकांची कठोर भूमिका या दुहेरी संकटात साहूरचा शेतकरी सापडला आहे. शासनाने कर्जमाफीबाबत तातडीने ठोस निर्णय घेऊन शेतकऱ्यांना नव्याने उभारी देण्याची गरज निर्माण झाली आहे, अन्यथा वाढत्या कर्जाच्या डोंगराखाली शेतकऱ्यांचे स्वप्नच गाडले जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

## सिंदीत मोफत आरोग्य तपासणी शिबीर; ९५५ नागरिकांची वैद्यकीय तपासणी

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम:**

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी लोककल्याण फाऊंडेशन आणि आरोग्य सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबीराने नागरिकांचा आरोग्य जागरूकता वाढवली.नगर परिषद सभागृहात झालेल्या शिबिरात ४८८ महिला आणि ४६७ पुरुष अशा एकूण ९५५ लाभार्थींनी सहभाग नोंदविला.



अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मशीनद्वारे विविध शारीरिक तपासण्या करण्यात आल्या. तपासणीनंतर तज्ज्ञ डॉक्टरांनी अहवालाच्या आधारे काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे दैनंदिन धावपळीत आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या नागरिकांना, तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना तात्काळ वैद्यकीय सेवा मिळण्याची संधी मिळाली. उद्घाटक अॅड. सुधीर कोठारी यांनी दोन ते तीन हजार रुपये खर्च येणाऱ्या तपासण्या मोफत करण्यात आलेल्या या शिबीराचे विशेष कौतुक केले.उद्घाटन सोहळ्याला माजी आ.राजू तिमांडे, नगराध्यक्षा राणी कलोडे, उपाध्यक्ष अकील शेख, नगरसेवक शरद तळवेकर, आशिष देवतळे, सहकार नेते बबन हिंगनेकर तसेच स्नेहल कलोडे, धनराज तळवेकर, शिवेश कावळे यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात डॉ. वृशांक तळवेकर, डॉ. ऐश्वर्या तळवेकर, डॉ. कोहळे, डॉ. रविंद्र शेटे, डॉ. सुरज राठोड, डॉ. चेतन रिगाणे, डॉ. स्वप्निल तलमले, डॉ. सौरभ चव्हाण यांसारख्या तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. काही गरीब व गरजू रुग्णांचा पुढील उपचाराचा खर्च लोककल्याण फाऊंडेशनतर्फे उचलण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.दोन दिवस चाललेल्या शिबिराला नगर परिषदेचे अध्यक्ष सुधीर पांगुळ, भाजपा प्रभाग अध्यक्ष मधुमाऊ राऊत, इन्फीनिटी पॉवर सोल्युशनचे आकाश पाल, पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद छाजेड, मोहन सुरकार आदी मान्यवरांनी भेटी दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन भिकुलाल पालीवाल यांनी केले तर आभार किशोर भांदकर यांनी मानले.शिबीराच्या यशस्वितेसाठी संगीता जयस्वाल, धनश्री पोकळे, दुर्गा पालीवाल, मनोज पेटकर, किशोर भांदकर, रवि जयस्वाल, पराग देवस्थळे, मयुर भुते, गोकुल ठाकरे, राज बावणकर, विलास तळवेकर, गिरीधर कारमोरे, तुषार ठोंबरे, देवाशिष जबस्वाल, आयुष पालीवाल, खुशाल बोरकर, विपीन हाडके, वैभव मुंडाले, स्वप्नील भोले व इतर मित्र परिवारांनी सक्रिय सहभाग घेतला.मोफत आरोग्य तपासणी शिबीरामुळे नागरिकांचे आरोग्य संवर्धन झाले आणि सामाजिक जबाबदारीचा अनोखा संदेश दिला.

## पंखांतून उमलली वर्धाची निसर्गगाथा

# ‘ग्रेट बकॅयार्ड बर्ड काउंट’मध्ये ९० पक्षी प्रजातींची नोंद

**वर्धा/जनमाध्यम**



जागतिक स्तरावर राबविण्यात येणाऱ्या Great Backyard Bird Count या उपक्रमाला मराठीत ‘महान अंगण पक्षी गणना’ असे संबोधले जाते. या उपक्रमाच्या निमित्ताने वर्धा जिल्ह्यात विविध भागांत केलेल्या निरीक्षणात तब्बल ९० पक्षी प्रजातींची नोंद करण्यात आली. या नोंदी जागतिक पक्षी माहिती मंच eBird (ई-पक्षी नोंद संकेतस्थळ) येथे नोंदविण्यात आल्या.

नोंदविलेल्या प्रजातींमध्ये जागतिक स्तरावर धोक्याच्या श्रेणीत असलेल्या पक्ष्यांचाही समावेश आहे. International Union for Conservation of Nature या आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघटनेच्या वर्गीकरणानुसार ‘असुरक्षित’ गटातील नदी सुरय (नदीतील सुरेख पक्षी), ‘संकट समीप’ गटातील तिरंदाज (पाण्यात मासे टिपणारा पक्षी) तसेच पांढऱ्या मानेचा करकोचा हे पक्षी आढळले. ही नोंद जिल्ह्यातील जलसंपत्ती आणि पर्यावरणीय समतोल अधोरेखित करणारी ठरली आहे.याशिवाय मधुबाज (मधमाशांच्या पोळ्यांवर उपजीविका करणारा शिकारी पक्षी), हिवाळ्यात येणारा राजहंस, चक्रवाक, काळा थिरथिरा, हिरवट वटवट्या, पिवळा शेपट्या, छोटा कंठेरी चिखल्या, मोठ्या संख्येने छोटा आर्ली, माळ भिंगरी, लाल पुठ्ठ्याची भिंगरी तसेच पिवळ्या कंठाची चिमणी या प्रजातींची नोंद घेण्यात आली.



दिग्रस तलाव, बोर व्याघ्र प्रकल्पाजवळील डोंगरगाव धरण आणि नवीन मोहन नगर परिसरात ही निरीक्षण मोहीम पार पडली. महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे विदर्भ समन्वयक राहुल वकारे, पवन दरणे, माजी वनपाल अशोक भानसे आणि ज्ञानचंद गडवानी यांनी प्रत्यक्ष क्षेत्रभेट देऊन पक्षी निरीक्षण केले.वर्ध्यातील तलाव, गवताळ प्रदेश आणि वृक्षराजी यांमुळे स्थानिक तसेच हंगामी स्थलांतरित पक्ष्यांना अनुकूल अधिवास उपलब्ध होत असल्याचे या गणनेतून स्पष्ट झाले आहे. पर्यावरण संवर्धनासाठी आणि जैवविविधतेच्या जतनासाठी अशा उपक्रमांचे सातत्य आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## गळफास घेऊन व्यक्तीची आत्महत्या

**हिंगणघाट** - शहरातील भीमनगर वार्ड परिसरात एका ४५ वर्षीय व्यक्तीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. प्रवीण माणिकराव हाडके असे मृताचे नाव आहे. कुटुंबीयांनी दरवाजा आतून बंद असल्याचे पाहून संशय व्यक्त केला. दरवाजा उघडून पाहिले असता ते गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. आत्महत्येमागील कारण स्पष्ट



झाले नसून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चंदू वाढवे करीत आहेत.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ८४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## तहसीलदार, चांदूर बाजार यांचे कार्यालय

Email.tah.chandurbz@gmail.com

क्र.स.म.अ./कावी-८८/२०२५ , दिनांक ०७.०१.२०२६

**जाहीरनामा**

अर्जदार - श्री.बबन ज्ञानदेवराव बैले,
रा.वाठोंडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत वाठोंडा,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

याद्वारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणे कळविण्यात येते की, **श्री.बबन ज्ञानदेवराव बैले** रा.वाठोंडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी स्वतःचे जन्म दिनांक १०.०२.१९७८, वाठोंडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत वाठोंडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोद जन्म मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत वाठोंडा, पंचायत समिती चांदूर बाजार, जि.अमरावती हद्दीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत वाठोंडा यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या आत आपला आक्षेप अथवा हरकती लेखी स्वरुपात या कार्यालामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अथवा हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. सदर जाहीरनामा आज दिनांक ०७.०१.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

शिक्का

**तहसीलदार,
तथा तालुका दंडाधिकारी,
चांदूर बाजार**

---

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.) क्र.४०/२०२६ ने.ता.१६.०३.२०२६

**वामन -- विरुध्द -- निरंक**

**अर्जदार :** १. वामन उत्तमराव झिमटे, रा.एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. कसुमबाई रामदास लायबर, रा.सदक पुरा. माहुली जहांगीर, जि.अम.
३. आशा रामराव भोणे, रा.दादापूर,एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावता

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **पंचफुला उत्तमराव झिमटे** यांचा मृत्यू दि.**२५.०८.२०१५** रोजी व **उत्तमराव तुकाराम झिमटे** यांचा मृत्यू **३०.०७.१९९६** रोजी राहत्या घरी एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ हा मुलगा व अर्जदार नं.२ व ३ ह्या मुली आहेत मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **१७ फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३५/२०२६
**श्री.साहेबराव -वि- निरंक**
पुढील ता.१७.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Sahebrao S/o Amrutrao Shelare,
Age 72 Yrs. Occu.: Labourer
R/o Itwara Pura, Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अंजना अमृतराव शेलारे** ही दिनांक 16.10.2018 रोजी **नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **साहेबराव विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **साहेबराव विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर सुचना

आम जनतेला सुचित करण्यात येत आहे की, माझे पक्षकार हे खाली वर्णन केलेली सदरहू मालमत्ता **श्री.सुरेंद्र दौलतराव रामटेके** यांच्याकडून विकत घेऊन **युनियन बँक ऑफ इंडिया शाखा अमरावती** मध्ये गहाण करण्याचा विचार करीत आहेत. तसेच त्यांनी युनियन बँक ऑफ इंडिया शाखा अमरावती यांना कळविले की, नोंदणीकृत विक्रीपत्र श्री.सुशील चंद्रशेखर पडोळे तर्फे आम मुखत्यार श्री.सुनील वसंतराव ठाकरे यांनी श्री.किशोर सितकुरीया मेश्राम यांच्या नावे करुन दिले जे दुय्यम निबंधक साहेब, अमरावती, बुक नं.१, दस्त क्र.१८१२/२००५, दिनांक १५.०६.२००५ रोजी नोंदणीकृत झाले व ते गहाळ झालेले आहे/हरविलेले आहे. याची तक्रार पोलीस ठाणे, अमरावती येथे १५.०२.२०२६ रोजी दिलेली आहे. ज्याचा नं.००१३/२०२६ हा आहे.

**स्थावर मालमत्ता/प्लॉटचे वर्णन -** ग्रामपंचायत काठोरा बु., ता.जि.अमरावती यांच्या हद्दीतील सरा नं.७३/१, ७३/२ मधील मौजा - काठोरा, मधील प्लॉट नं.१४, आराजी ७१.७५ चौ.मी. (७६६.२५ चौ.फुट) व त्यावर बांधलेले बांधकाम आराजी ४६.०० चौ.मी (४९५.०० चौ.फुट) आहे व सदरहू प्लॉटची चतुःसिमा येणेप्रमाणे आहे

पुर्वेस - सरकारी रोड
पश्चिमेस - अशोक पुरके यांचे घर
उत्तरेस - सरकारी रोड
दक्षिणेस - खुली जागा

तरी आम जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, उपरोक्त मालमत्तेवर कुणा व्यक्तिचा अथवा कुठल्याही आर्थिक संस्थेचा, बँकेचा गहाण, विक्रीपत्र, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र किंवा अन्य कुठल्याही कारणाने मालकी हक्क किंवा अधिकार असल्यास किंवा कुठलेही प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्यास त्या संदर्भात कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा. उपरोक्त मुदतीत कुठलाही आक्षेप न आल्यास माझे पक्षकार युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा अमरावती मध्ये उपरोक्त मालमत्ता गहाण ठेवून कर्ज वितरण करेल व त्यानंतर कुणाचा कुठल्याही प्रकारचा आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही आणि मान्य केला जाणार नाही.

**नागपूर
दिनांक १७.०२.२०२५**

(ॲड.मिथील ह.कोलते)
रा.गाळा नं.४० व ४७ **गुलशन आरकॅट**, पहिला माळा, रेल्वे स्टेशन, अमरावतीसमोर अमरावती
मो.९२२६७२५६५१,
९४०५७००२१४

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १६३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

# जिल्ह्यातील ३ हजार २९४ शेतकऱ्यांचे आधार अपडेट प्रलंबित

## -कर्जमाफीच्या प्रक्रियेत तांत्रिक अडथळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाकडून शेती क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी प्रस्तावित कर्ज निवारण योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, अमरावती जिल्ह्यातील थकीत कर्जदार शेतकरी सभासदांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. मात्र, अद्यापही जिल्ह्यातील सुमारे ३ हजार २९४ शेतकरी सभासदांचे आधार क्रमांक प्राप्त झाले नसल्याने त्यांच्या कर्जमाफीच्या प्रक्रियेत तांत्रिक अडथळा निर्माण झाला आहे.

शासनाच्या प्रस्तावित कर्जमाफी पोर्टलवर अमरावती जिल्ह्यातील एकूण ७३ हजार ४१३ खाती नोंदवण्यात आली आहेत. यापैकी प्राथमिक कृषी पत पुरवठा सेवा सहकारी संस्थांचे १ हजार ४५० थकीत कर्जदार आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा स्तरावरील १ हजार ८४४ कर्जदार अशा एकूण ३ हजार २९४ सभासदांची आधार कार्ड माहिती अद्याप अप्राप्त आहे. विहित नमुना प्रपत्र 'अ' व 'ब' मध्ये ही माहिती भरण्याचे काम सध्या सेवा सहकारी संस्था आणि बँक स्तरावर सुरू आहे.

ज्या शेतकऱ्यांचे आधार क्रमांक प्रलंबित आहेत, त्यांनी ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास त्यांना प्रस्तावित योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील संबंधित सर्व शेतकरी सभासदांनी आपल्या संस्थेचे सचिव, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे वसुली अधिकारी किंवा तालुका उप/सहायक निबंधक कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा. संपर्काच्या वेळी आपले आधार कार्ड व आवश्यक कागदपत्रे सादर करून आपली माहिती अद्ययावत करावी, असे आवाहन विभागीय सहनिबंधक आणि जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी केले आहे.

---

# शहरात वाहतूक नियमांमध्ये बदल

## -पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरात चित्रा चौक ते नागपूरी गेट उड्डाणपुलाचे उर्वरित बांधकाम नियोजनबध्द पध्दतीने पुर्ण करण्यासाठी आज दि. १८ फेब्रुवारी ते ४ मार्च २०२६ पर्यंत वाहतूक नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. यासाठी पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी अधिसूचना जारी केली आहे.

सर्व वाहनांना वाहतूकीसाठी बंद करण्यात येणारे मार्ग - टांगा पडाव ते नागपूरी गेट चौक पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी पादचारीसह. चित्रा चौक ते नागपूरी गेट सर्व प्रकारचे जड व हलके मालवाहु तसेच बसेस इत्यादी वाहनांना प्रवेश बंदी राहील. वाहतूकीस पर्यायी मार्ग- टांगा पडाव-जवाहर गेट-सक्करसाथ-नागपूरी गेट. दिपक चौक-चौधरी चौक-आदर्श हॉटेल-पिंजारा मस्जिद मार्गे नागपूरी गेट. फक्त दुचाकी, कार, ऑटोसाठी लागू राहील. इतर सर्व वाहनांना प्रवेशबंदी राहील. वाहतूक परिस्थितीनुसार वाहतूक थांबविणे व वळविणे याबाबत सर्व अधिकार वाहतूक विभागास राहील. तसेच अत्यावश्यक वेळी जनहित लक्षात घेता सहायक पोलीस आयुक्त वाहतुक अमरावती शहर यांना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून नियोजित अधिसूचनेमध्ये वाहतूकीच्या नियमनाबाबत अंशतः बदल करण्याचे अधिकार राहील.

या अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालक, वाहनधारकांवर मोटर वाहन अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी या कालावधीत सहकार्य करावे आणि वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

**नगर परिषद कार्यालय, चांदूर बाजार, जि.अमरावती
ई-निविदा सुचना (दुसरी वेळ)**

सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, नगर परिषद, चांदूर बाजारचे बांधकाम विभागामार्फत कार्यालयीन जा.क.१४०८/२६, दिनांक १८.०२.२०२६ अन्वये नगर परिषद चांदूर बाजार कार्यालयामध्ये विभागा अंतर्गत विविध कामासाठी मनुष्यबळ पुरविणे या कामाची निविदा शासनाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

http:\\www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा सादर करण्याबाबतचा दिनांक व वेळ

| अ.क्र. | विवरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करणे | दि.१८.०२.२०२६ पासून | दु.५.०० वा. |
| २. | निविदा अपलोड करणे | दि.१८.०२.२०२६ ते दि.२६.०२.२०२६ | दु.४.०० वा. पर्यत |
| ३. | निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | दि.२७.०२.२०२६ | दु.४.०० वा. |

उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या कामाकरीता ऑनलाईन पध्दतीने दर आमंत्रित करण्यात येत आहेत.

**(सौ.मनिषा मनिष नांगलीया)
अध्यक्ष,
नगर परिषद, चांदूर बाजार**

**(गिता ठाकरे)
मुख्य अधिकारी
नगर परिषद, चांदूर बाजार**

---

महसूल व वन विभाग
भूमि अभिलेख विभाग, महाराष्ट्र राज्य
उपसंचालक भूमि अभिलेख अमरावती प्रदेश अमरावती यांचे कार्यालय
पत्ता- तालुका प्रशासकीय ईमारत, मोर्शी रोड, अमरावती-४४४६०३
फोन नं.०७२१-२६६२७४७ ई-मेल - ddlraravati@gmail.com
क्र.अपील/जाहीर नोटीस/अ.नि.नो.क्र.१५७५/२०२६ दि.०९.०२.२०२६

**प्रति,**
**अपिलार्थी -** १. कैलास बाबारावजी यावलीकर, रा.यावली शहीद, ता.जि.अमरावती
२. अलका गजानन इंगोले, रा.वणी ममदापूर, ता.तिवसा, जि.अमरावती
३. मंगला श्रीधरराव रोहणकर, रा.रोहणा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
४. साधना रामदासराव भुगल, रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. शारदा चंद्रशेखर वाईकर, रा.आसेगांव पुर्णा, ता.अचलपूर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**उत्तरार्थी -** १. जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख अमरावती/अकोला
२. सुनंदा प्रभाकरराव सिनकर, रा.अर्जुन नगर, ता.जि.अमरावती
३. मंगेश प्रभाकरराव सिनकर, रा.अर्जुन नगर, ता.जि.अमरावती
४. अर्चना किरण श्रीखंडे, रा.जुना बायपास रोड, गोंड बाबा मंदिराजवळ, देशपांडे लेआऊट, अमरावती, ता.जि.अमरावती
५. **प्रणिता** राजेश भोगे, रा.राधानगर, अमरावती, ता.जि.अमरावती
६. भावना योगेश साबळे, रा.गणोजा देवी, ता.भातकुली, जि.अमरावती
७. माधवी वैभव इंगोले, रा.अकोला, ता.जि.अकोला
८. कविता राजेंद्र घाटे, ता.तारखेडा, ता.जि.अमरावती

**विषय -** **महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम चे १९६६ कलम २४७ अन्वये अपील अर्ज मौजे यावली शहीद शिट नं.३, प्लॉट नं.४१०**

ज्याअर्थी अपीलार्थी यांनी इकडील पिठासनासमोर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत विषयांकीत अपील सादर केले आहे. परंतु उत्तरार्थी यांना नोटीसने कळवूनही त्यापैकी उत्तरार्थी अ.नं.६, ७ व ८ हे स्वतः किंवा त्यांचे अधिवक्ता सुनावणी वेळी सातत्याने गैरहजर आहेत. यास्तव उक्त उत्तरार्थी यांना कळविण्यात येते की, दि.११.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या पिठासनासमोर आपण स्वतः अगर आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी उपस्थित रहावे, नाहीपेक्षा प्रकरणी एकतर्फी निकाल देण्यात येईल, याची सर्व हितसंबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९.०२.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

(महेशकुमार शिंदे)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख (सं)
उपसंचालक भूमि अभिलेख
अमरावती प्रदेश, अमरावती

---

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.) क्र.४४/२०२६ ने.ता.१६.०३.२०२६

**मिना अधिक एक -- विरुध्द -- निरंक**

**अर्जदार :** १. मीना बबनराव इंगोले, रा.वार्ड नं.२ गोकुळसरा, ता.धामणगांव रे., जि.अमरावती
२. गजानन गोकुळ ठाकरे, रा.धनोडी बहादरपूर, ता.आर्वी, जि.वर्धा

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **कुसूमाबाई गजानन ठाकरे** यांचा मृत्यू दि.**०६.०४.२००६** रोजी राहत्या घरी धानोरा सिकरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ हा मुलगी व अर्जदार नं.२ हे पती आहेत मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **१७ फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८०/२०२६
**मिना व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२७.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Mina Dnyaneshwar Chandurkar, Age 54 Yrs. Occu.: Labourer
R/o House No.235, Nandura, Tq. Dist. Amravati.
2. Rajshri Prashant Tiwaskar, Age 35 Yrs. Occu.: Bueiness
R/o Near Railway Station, Rukhmini Nagar, Amravati.
3. Nikita Rajendra Bagekar, Age 32 Yrs. Occu.: Labourer
R/o MIDC Road, Near Sent Fransis School, Jankidevi Rathi Ngr.Amravti
4. Shubham Dnyaneshwar Chandurkar, Age 29 Yrs. Occu.: Labourer
R/o House No.235, Nandura, Tq. Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **ज्ञानेश्वर लक्ष्मण चांदुरकर** हे दिनांक 25.12.2017 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मिना व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मिना व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व
सत्र न्यायाधिश-६, यांचे न्यायालय**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ३४/२०२६ ने.ता. २५/०३/२०२६**

**अर्जदार :- १. वैशाली विनोद लांडगे,** वय - ४० वर्षे, व्यवसाय - शेती
रा. पळसमंडळ, ता. नांदगाव खंडेश्वर जि अमरावती

**विरूध्द**

**गैरअर्जदार -निरंक**

**अर्ज - हिंदू अज्ञान पालनकर्ता कायदा १९५६ चे कलम ८ प्रमाणे शेत मौजा इतापुर, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती सर्व्हे नं. १३/१ मधील सामाईक हिस्सेदार अज्ञान श्रावणी विनोद लांडगेमालक असल्याने विक्रीसाठी परवानगी मिळण्याबाबत.**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता ट्रान्सफर करण्याची परवानगी मिळण्याकरीता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश-६, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**संपत्तीचे विवरण- मौजा इतापुर ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील सर्वे नं. १३/१, भोगवटार वर्ग-१, क्षेत्रफळ २.८० हे. आर आहे. आकार रू. ४.४६ होते.**

त्या अर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहिर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक २५-०३-२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश -६, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे, वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १७.०२.२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दिसाठी दिला.

शिक्का

**आदेशानुसार,
सहा. अधिक्षक (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

---

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व
सत्र न्यायाधिश-६, यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क. २६३/२०२५ ने.ता. १०/०३/२०२६

**अर्जदार :- १. सुरैया बानो अब्दुल कलीम** वय :- ५० वर्षे, व्यवसाय - घरकाम **२. सुमया कौसर अब्दुल कलीम** व्यवसाय -घरकाम वय २४ वर्षे, व्यवसाय - शिक्षण **३. सादिया तबसुम अब्बुल** क्लीम वय २२ वर्षे, व्यवसाय - शिक्षण **४. शेख उमर अब्दुल कलीम** व्यवसाय - शिक्षण वय १७ वर्षे, अर्जदार क. १ स्वतःकरिता व अ.पा.क. म्हणून अर्जदार क. ४ करिता सर्व अर्जदार रा. धानोरा म्हाली, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती

**गैरअर्जदार :-**
**विरुध्द- कोणीही नाहीं**

**अर्ज पालक पाल्य अधिनियमाचे १८९० चे कलम २९ व ३१ प्रमाणे शेत जमिन विकण्याची परवानगी मिळण्याबाबत.**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता टान्सफर करण्याची परवानगी मिळण्याकरीता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश ६ अमरावत्ती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**संपत्तीचे विवरण- मौजा धानोरा म्हाली ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती यांीील घोत गट नं. २४६ क्षेत्रफळ ०३ हे. आर आकार रू. ८.७० पैसे, भोगवटदार वर्ग १ हि शेत जमीन ज्यांच्या चतुः सिमा खालीप्रमाणे -**

**पूर्वेस-शं**कर मोहोड मांचे शेत **पश्चिमेस** -शिख पळसखेड
**दक्षिणेस -** एकनाथ लोखंडे यांचे शेत **उत्तरेस** -देविदास ठेवरे यांचे शेत

त्या अर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहिर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक १०-०३-२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश ६. अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे वर नमूद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सबहू, अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.आज दिनांक १६.०२.२०२६ रोजी माझे सत्तीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दिसाठी दिला.

शिक्का

**आदेशानुसार,
सहा. अधिक्षक (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार,
जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२५३/२०२५ ने.ता.२४.०३.२०२६

**अर्जदार :** **१.** सूर्यकांता मधुकरराव दाभाडे, वय ६४ धंदा - घरकाम
रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार :** १. प्रियंका आनंदकुमार दाभाडे, वय २६ धंदा - घरकाम
२. युवराज आनंदकुमार दाभाडे, वय अज्ञान, धंदा - निरंक
अर्जदार नं.२ अज्ञान तर्फे आई अ.पा.क.गै.अ.नं.१
सर्व रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत आनंदकुमार मधुकरराव दाभाडे** यांचा मृत्यू दिनांक **०५.०९.२०२४** रोजी आजारपणामुळे राहते घरी, ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२५३/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१७.०२.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

प्रो.नं.५०७/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१७.०२.२०२६

वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./७८/२०२६ दिनांक ०१.०४.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -** १. राजेंद्र गोपाळराव पागृत, वय ५२ वर्षे, धंदा - शेती
२. जयंत गोपाळराव पागृत, वय ५७ वर्षे, धंदा - शेती
३. गजानन गोपाळराव पागृत, वय ६० वर्षे, धंदा - शेती
अ.नं.१ ते ३ रा.सहयोग नगर बनोसा, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. महानंदा पुंडलिकराव अंबुलकर, वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.काटसूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. चंदा भानुदास इंगळे, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.येवदा, ता.दर्यापूर, जि.अमरावती
६. मिरा अविनाश ठाकरे, वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.वणी बेलखेड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **गोपाळ तुळशीराम पागृत** हे दिनांक **०८.१०.२०२१** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **गोपाळ तुळशीराम पागृते** यांचे नांवे मौजा चांडोळा, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील अ.क.८०, मालमत्ता नं.७३, क्षेत्र १३१९ चौ.फुट यावर बांधलेले घर येणेप्रमाणे मिळकत असून त्याची अंदाजे किंमत १०,००० रु.आहे.

आज दि.१७.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार,
जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६०/२०२६ ने.ता.०७.०३.२०२६

**अर्जदार :** **१.** दिनेश उत्तमराव भडके, वय ५५ धंदा - शेती
२. कल्याणी दिनेशराव भडके, वय २५ धंदा - शिक्षण
३. सोनाली दिनेशराव भडके, वय २४ धंदा - शिक्षण
अर्जदार नं.१ ते ३ रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. रंजना रामेश्वर वांगे, वय ५३ धंदा - घरकाम
रा.विलायतपुरा, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत उत्तम शंकरराव भडके** यांचा मृत्यू दिनांक **०३.१२.१९९१** रोजी रा. ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक पंचफुला उत्तमराव भडके** हिचा दि.**१७.१०.२००९** रोजी रा. ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.६०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.०२.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार,
जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५९/२०२६ ने.ता.१३.०३.२०२६

**अर्जदार :** **१.** श्रीमती दुर्गा मनोहर भट्ट, वय ६७ धंदा - घरकाम व शेती
रा.भट्टपुरा, चांदूर बाजार, जि.अमरावती
२. सौ.नम्रता हितेश व्यास, वय ५१ धंदा - घरकाम व शेती
रा.१०२, वेदांत पेरीडॉट, सेंट्रल बाजार रोड, अभ्यंकर नगर चौक जवळ, २ बजाज नगर, शंकर नगर, नागपूर-४४००१०
३. सौ.चेतना मनिष जोशी, वय ४७ धंदा - नोकरी व शेती
रा.Plot No.77, Bailtaridi Road, Behind Jiyanti Meanshan, Manish Nagar, Somalwada, Nagpur-440015
४. सौ.ज्योतिका हितेश डावे, वय ४४ धंदा - घरकाम व शेती
रा.Kanapriya Metropolis, Flat No.7407, Block-7, Wing-1, Motinagar, Erragada, Balanagar, Sanathnagar, I.E. K.V.Rangareedy (A.P.)-500018
५. वैभव मनोहरभाई भट्ट, वय ४१, व्यवसाय - धंदा आणि शेती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत मनोहर नारायण भट्ट** यांचा मृत्यू दिनांक **०३.०३.२०२५** रोजी झेनिथ हॉस्पीटल, अमरावती, जि.अमरावती येथे झाला. ते कायमचे भट्टपुरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**०४.०२.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.) क्र.४७/२०२६ ने.ता.१७.०३.२०२६

**कौसल्या अधिक चार -- विरुध्द -- निरंक**

**अर्जदार :** १. कौसल्या भीमराव कटकतलवारे, रा.वार्ड नं.५ नांदगांव खंडे., ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. पुष्पा भीमराव कटकतलवारे, रा.वार्ड नं.५ नांदगांव खंडे., ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. गिता तुळशीराम गडलिंग, रा.सी.आर.पी.एफ.रोड, बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ, शिवणगांव, ता.जि.नागपूर
४. सविता शरद ढोकणे, वार्ड नं.१, चिखली वैद्य,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
५. गजानन भीमराव कटकतलवारे, रा.नांदगांव खंडे., ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **भीमराव गुलाबराव कटकतलवारे** यांचा मृत्यू दि.**२१.१०.२०२४** रोजी नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी व अर्जदार नं.२ ते ४ ह्या मुली आहेत व अर्जदार नं.५ हा मयताचा मुलगा आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.) क्र.४६/२०२६ ने.ता.१८.०३.२०२६

**पंकज अधिक तीन -- विरुध्द -- निरंक**

**अर्जदार :** १. पंकज उत्तम मार्गे, रा.वडुरा, जि.अमरावती
२. सविता बंडू राठोड, रा.मोझरी, ता.मंगरुळपीर, जि.वाशिम
३. संगीता सुनिल मोरे, रा.वार्ड नं.१, मल्हारा, अमरावती, ता.जि.अमरावती
४. सुनिता पुरुषोत्तम लाहे, रा.भडशिवनी, पो.शहा, ता.कारंजा, जि.वाशिम

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **उत्तम गणपत मार्गे** यांचा मृत्यू दि.**०३.०९.२००७** रोजी व **पंचफुला गणपत मार्गे** यांचा मृत्यू **०१.०८.२०२५** रोजी राहत्या घरी वडुरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ हा मुलगा व अर्जदार नं.२ ते ४ ह्या मुली आहेत मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **१७ फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### पवार २२ रविवारी आकाशवाणीवर



**अमरावती**-जिल्ह्याच्या पर्यावरण संरक्षणार्थ सातत्याने उपक्रम राबविणारे पर्यावरणवादी शिक्षक वि.दा. पवार यांची 'पर्यावरण संरक्षण' या विषयावर २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १०. ०० वाजता अमरावती आकाशवाणीच्या विविधा सदरा अंतर्गत 'लोक जागर' या कार्यक्रमात मुलाखत प्रसारित होणार आहे.आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे यांनी वि.दा.पवार यांच्याशी संवाद साधला आहे. विदर्भ पर्यावरण परिषदेचे अमरावती जिल्हा समन्वक,प्रभात पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष असलेले वि.दा. पवार पर्यावरण संवर्धन विषयी आपले विचार या कार्यक्रमातून मांडणार आहे. कार्यक्रमासाठी निर्मिती सहाय्य उद्घोषिका स्नेहल ठाकरे यांचे असून या कार्यक्रमाचा आस्वाद रसिकांनी आकाशवाणीच्या एफएम बँड १०१. ५ वर किंवा न्यूज ओन एयर या ॲपच्या माध्यमातून घ्यावा असे आवाहन अखिल भारतीय रेडिओ महासंघाचे वतीने सचिव संजय वाघुळे,वनराईचे मधु घराड तथा निसर्ग संरक्षण संस्थेचे प्रा.निशिकांत काळे यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी आज पासून आमरण उपोषण

**कुऱ्हा**-शेतकरी न्याय हक्क विचार मंचाच्या वतीने एक कास्तकार लाख कास्तकार १९ फेब्रुवारी शिवजयंती पर्वावर विनोद दारोकार यांचे आमरण उपोषण उपोषणाच्या प्रमुख मागण्या माझे व इतर सर्व शेतकर्यांचे नैसर्गिक आपत्ती अनुदान' रक्कम त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावे.एकही शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार नाही याची ग्वाही द्यावी.भ्रष्ट तलाठी व कोतवाल यांचे चौकशी चे काय झाले यांची माहिती द्यावी.बिबट्याचा धुमाकूळ असल्यामुळे कौंडण्यपूर व भिवापूर फिडर मधील शेती विज पुरवठा हा सातही दिवस, दिवसा करण्यात यावा.सौर कनेक्शन सक्तीचे करु नये, ज्याला जे कनेक्शन लागेल ते देण्यात यावे.मध्यप्रदेश या राज्या प्रमाणे शेतीमालाला भावांतर योजना लागू करावी.उपोषण स्थळ आठवडी बाजार कुऱ्हा येथे, साय. ४ वाजता पासून या आमरण उपोषणाला सुरुवात होणार आहे.तेव्हा कुऱ्हा व परिसरातील सर्वांनी उपस्थित रहाण्याचे आव्हान उपोषण कर्ते विनोद दारोकार यांनी केले आहे.

### श्री शंकर मंदीरावर महाशिवरात्री पर्वावर 'कळस' चढविला



**कुऱ्हा**-वऱ्हा येथील श्री शंकर संस्थान येथे महाशिवरात्री उत्सवा निमीत्त दि. १६ फेब्रुवारी २०२६ लाभ वऱ्हाचे दानशूर छगनभाऊ गोमासे यांनी त्यांच्या आई वडीलांच्या स्व. नारायण शिवराम गोमासे व स्व. अन्नापूर्णाबाई नारायण गोमासे यांच्या स्मृती प्रित्यर्थ पितळी कळस देवून सकाळी ११ वा. छगन गोमासे व सौ. अर्चना गोमासे यांनी विधिवत पूजा कुऱ्हाचे मुरलीधर महाराज शर्मा यांनी केली असून मंदीरावर कळस चढविण्यासाठी सिध्दबाल हनुमान श्रीक्षेत्र दाबेरी नबीपूर (विचोरी) येथील आचार्य माधव दास महाराज (केतपूर गौरक्षण) यांच्या उपास्थितीत अतुल बद्रे व बाळसाहेब सावंत आदीच्या उपस्थितीत कळस चढविण्यात आला.यावेळी श्री शंकर संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त आणि गावकरी, भजन मंडळी आदींची उपस्थिती होती दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम यामध्ये बाऱ्या, दफडीचे भजन, महिलांचे भजन आणि सायंकाळी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.



### महाशिवरात्रीनिमित्त फराळ वितरण

**तिवसा**-येथील शिक्षकस्थित असलेल्या सिद्धेश्वर शिव मंदिर व संकट मोचन हनुमान मंदिर येथे महाशिवरात्रीचे औचित्य साधून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना पार्वतीमाता महिला उत्सव समितीच्या वतीने २५ किलोचे उसळ, राजगिरा लाडू व रत्नाळू असे फराळ वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुष्पा टेकाडे, भारती कापसे,सिंधू ढोबाळे, कुमुदिनी सोनटक्के, मोनाली कापसे,अश्विनी देशपांडे, अर्चना कडगे,कविता बायस्कर, अनिता कापसे,ज्योती कापसे, ज्योती रिठे, पुष्पा रिठे, वैशाली कुर्हेकर, सुरेखा आंबाडकर,अवंतिका पुनसे,सुषमा खेडकर, सिंधू आमले व पुरुष-युवक मंडळीनी मोलाचे सहकार्य केले. १६ फेब्रुवारी रोजी कार्यक्रमाची सांगता होईल.

## जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण (दिशा) समितीची आढावा बैठक

# महापौर तेजवाणी यांची मनपा शाळांवर सोलर बसविण्यासाठी निधीची मागणी

**अमरावती/का.प्र.**



जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण (दिशा) समितीची महत्त्वपूर्ण सभा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे उत्साहात पार पडली. अमरावती महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व महानगरपालिका शाळांमध्ये सौरऊर्जा प्रणाली बसविण्यासाठी नियोजन विभागाकडून स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.महानगरपालिकेच्या एकूण ६३ शाळांपैकी ३२ शाळांवर सोलर पॅनेल बसविण्यात आले असून उर्वरित ३१ शाळांवर अद्याप सौरऊर्जा प्रकल्प बसविणे बाकी आहे. या उर्वरित शाळांमध्ये सोलर प्रणाली बसविण्यासाठी आवश्यक निधी मंजूर करावा, असे त्यांनी सभेत स्पष्ट केले.

सभेच्या अध्यक्षस्थानी खा.बलवंत वानखडे होते. यावेळी आ.गजानन लवटे,आ.प्रविण तायडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, परीविक्षाधिन अधिकारी कौशल्या एम., अशासकीय सदस्य मोरेश्वर वानखडे, जिल्हा विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांच्यासह नगरपालिकेचे अध्यक्ष उपस्थित होते. विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित यंत्रणांचे प्रतिनिधी देखील सभेला उपस्थित होते.सभेदरम्यान अमरावतीचे नवनिर्वाचित महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी महत्त्वपूर्ण विषय मांडला.महापौरांनी सांगितले की, सौरऊर्जा प्रकल्पांमुळे शाळांच्या वीज खर्चात लक्षणीय बचत होणार असून पर्यावरण संरक्षणालाही चालना मिळणार आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये नूतनीकरणीय ऊर्जेबाबत जागरूकता निर्माण होईल. 'स्वच्छ आणि हरित अमरावती' या संकल्पनेच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.महापौरांनी मांडलेल्या प्रस्तावावर अध्यक्ष खा. बलवंत वानखडे यांनी सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करण्यात येईल, असे आश्वासन दिले. संबंधित विभागांना प्रस्तावाचा सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आवश्यक तांत्रिक व आर्थिक बाबींची तपासणी करून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.दरम्यान, बैठकीत नवनिर्वाचित महापौर श्रीचंद तेजवाणी यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा भेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

## पाण्याची टाकी सुरू करा व अवैध दारू विक्री थांबवा, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**



गावात दोन वर्षांपूर्वी बांधकाम पूर्ण झालेल्या जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याच्या टाकीतून अद्याप पाणीपुरवठा सुरू न झाल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. तसेच आठवडी बाजार व बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री सुरू असल्याची तक्रार माजी उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर हे रामा व परिसराच्या दौऱ्यावर आले असताना प्रदीप शेंडे यांनी त्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जलजीवन मिशन अंतर्गत गावात पाण्याची टाकी उभारण्यात आली असली तरी गेल्या दोन वर्षांपासून ती कार्यान्वित करण्यात आलेली नाही. परिणामी उन्हाळ्यात नागरिकांना मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाईचा सामना करावा लागतो.'टाकीचे बांधकाम पूर्ण असूनही पाणीपुरवठा सुरू होत नसल्याने ग्रामस्थांना टँकरवर अवलंबून राहावे लागते. याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही कार्यवाही झालेली नाही,' असे प्रदीप शेंडे यांनी निवेदनात नमूद केले आहे.याशिवाय गावातील आठवडी बाजार व बसस्थानक परिसरात खुलेआम अवैध दारू विक्री सुरू असून त्यामुळे सामाजिक वातावरण बिघडत असल्याची तक्रारही करण्यात आली आहे. संबंधितांवर तातडीने कारवाई करून पाणीपुरवठा सुरू करावा व अवैध दारू विक्री बंद करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्याचे आश्वासन दिल्याचे समजते. ग्रामस्थांनी प्रशासनाने तात्काळ ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# मारडा शिवारात कालव्याचे पाणी साचल्याने रस्ता बंद



**कुऱ्हा/वार्ताहर**

परिसरातील मारडा शेत शिवारात मुख्य कालव्याचे पाणी वऱ्हा, घोटा आणि मारडा या पांदण रस्त्यावर तीन ते चार फूट साचल्याने शेतकऱ्यांचा शेतात जाण्याचा मुख्य रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे. गेल्या तीन वर्षांपासून हीच परिस्थिती कायम असून संबंधित विभागाकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही.

या भागातील सुमारे ३५ ते ४० शेतकऱ्यांची ये-जा या रस्त्यावरून होत असून अंदाजे ४०० ते ५०० एकर शेतीसाठी हा प्रमुख मार्ग आहे. रस्त्यावर पाणी साचल्याने शेकडो हेक्टरमधील पिके शेतातच अडकून पडली असून शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे.

शेतकरी न्याय हक्क विचार मंचचे अध्यक्ष दिनेश वानखडे व समन्वयक नंदकिशोर जिरापुरे यांनी उपविभागीय कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा कालवे विभाग यांना निवेदन देत आठ दिवसांच्या आत कालव्याचे वेस्टेज पाणी बंद न केल्यास मारडा येथील शेतकऱ्यांसह उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे.निवेदन स्वीकारताना संबंधित अधिकाऱ्यांनी प्रकरणाची दखल घेऊन येत्या आठ दिवसांत साचलेले पाणी पूर्णतः बंद करण्याचे आश्वासन शेतकऱ्यांना दिले.यावेळी सौरभ भुसाटे, हुशन शहा, राम भुसाटे, राजू भाऊ भुसाटे, अशोकराव पाटील, अभय अवघड, स्वप्नील आसोले, ज्ञानेश्वर आसोले, माधवराव आसोले, बबनराव आसोले यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# पोदारमध्ये विद्यार्थ्यांनी साकारले छत्रपती शिवाजी महाराजाची भूमिका

**अमरावती/का.प्र.**



स्थानिय पोदार इंटरनॅशनल स्कूल अमरावती मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विद्यार्थ्यांनी साकारले छत्रपती शिवाजी महाराजाची भुमिका.मॉर्निंग शिफ्टच्या विद्यार्थ्यांनी 'इंद्र जिमी जंभ पर' या गाण्यावर तसेच आफ्टरनुन शिफ्टच्या विद्यार्थ्यांनी 'राजे राजे' या गाण्याद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देवुन नृत्यप्रस्तूती दिली. नृत्यप्रस्तूती नंतर 'जय भवानी, जय शिवाजी' या शिवगर्जनेमुळे शाळेचे संपुर्ण वातावरण शिवमय झाले. ज्यामध्ये मॉर्निंग शिफ्ट मधुन वर्ग आठवी चा श्रीरंग खंडार तसेच आफ्टरनुन शिफ्ट मधुन विराज बर्वे याने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भुमिका साकार केली. यासोबतच जिजामाता यांच्या वेशभुषेमध्ये शर्वरी साळुंके, तानाजी मालुसरे यांच्या वेशभुषेमध्ये स्वरूप वाघ, बाजीप्रभु देशपांडे यांच्या वेशभुषेमध्ये संस्कार साहु, छत्रपती संभाजी महाजन यांच्या वेशभुषेमध्ये देवांश चांभरे ने सुध्दा आपआपल्या भुमिका पार पाडल्या. शिवजयंती वर प्राचार्या मनिषा संगर यांनी शुभेच्छा देवुन महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य, मानवता, राष्ट्रप्रेम, नेतृत्व क्षमता, सर्वधर्मसमभाव इत्यादी गुणांना आपल्या अंगीकृत करण्यासाठी प्रोत्साहित केले. कार्यक्रमाच्या या यशासाठी प्राचार्या मनिषा संगर यांच्या नेतृत्वामध्ये उपप्राचार्य डॉ. आशिष भेटाळू, अपर्णा शेळके, डॉ. आशिष खुळे, सोनाली गवई, विशाखा सावरकर, विजेता वानखेडे, सारीका सालपे, रोशनी दर्जी तसेच पोदार फॅकल्टी व्दारा अथक प्रयत्न केले गेले.

# सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उमंग २०२६सोहळा

**अमरावती/का.प्र.**



सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे वार्षीक सेहसंमेलन उमंग २०२६ सोहळा आयोजित करण्यात आला. कबड्डी, खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल, फुटबॉल, रस्सी खेच, कॅरम, बुध्दीबळ, बॅडमिंटन, टेबल टेनिस इत्यादी खेळ आयोजित करण्यात आले. औरा ऑफ आर्टस, रॉकर्ज व्हाईस ऑफ सिपना, थिएटर आणि व्हेरायटी इंटरटेनमेंट, जलसा डांस स्पर्धा, आयकॉनिक फॅशन शो, जल्लोष डीजे नाईट, बक्षिस वितरण समारंभ इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रसंगी अतिथी म्हणुन प्रा. डॉ. संजय कळमकर, कवी व व्याख्याते लाभले, सोबत संस्थेचे अध्यक्ष जगदिशभाऊ गुप्ता, प्राचार्य संजय खेरडे, विद्यार्थी कार्यक्रम अधिव्याख्याता डॉ. प्रविण मळसने, सांस्कृतीक प्रभारी प्रा. स्मिता जिरापुरे, किडाप्रभारी महेश बुधाडे, सांस्कृक्तिक विद्यार्थी प्रतिनिधी श्रावणी रोटे, श्रीवत्स खंडारे, किडा विद्यार्थी प्रतिनीधी अमेय पोटे,धनश्री नांदुरकर व्यासपीठावर उपस्थित होते.प्रा. डॉ. संजय कळमकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधीत करतांना आपल्या आई-वडिलांच्या त्यागाचे आणि आपल्या संस्कृतीचे भान ठेऊन यथोचित प्रगती करण्याचे आवाहन केले. संचालन गौरी अनसिंगकर,श्रावणी रोटे,धनश्री नांदुरकर, श्रीवत्स खंडारे,नेइल असोपा, शान सोळंकी, अमेय पोटे यांनी केले.बक्षीस वितरण कार्यक्रमाकरीता संदिपजी सांगवे, विभागीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ, अमरावती यांच्या हस्ते संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील गुणवत्ता यादितील विद्यार्थी, खेळातील व सांस्कृतीक कार्यक्रमातील कलर कोट मानकरी, विविध खेळात यशस्वी विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. माहिती व तंत्रज्ञान विभागाने कीडायन सिपना कप पटकाविला. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता प्रा. स्मिता जिरापुरे, प्रा. सुमित जामकर, प्रा. प्रेम जाखोटिया, डॉ. गायत्री तायडे, डॉ. आशिष बर्डेकर, प्रा. निकीता मोढोड, प्रा. अंकिता पांडे, प्रा. राजश्री वैद्य, डॉ. स्मिता तंबाखे यांनी विशेष प्रयत्न केले.

# श्रमसंस्कारातूनच जबाबदार नागरिक घडतात-डॉ.कमलाकर पायस

## ऋणमोचन येथे श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**अमरावती/का.प्र.**



तक्षशिला महाविद्यालय, दारापूर च्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन ऋणमोचन येथे उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात झाले. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव डॉ. कमलाकर पायस होते, तर संस्थेचे सीईओ प्रा. रोशन प्रकाश राव यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मल्लू पडवाल उपस्थित होते.

यावेळी ऋणमोचन (नांदेड खुर्द) ग्रामपंचायतीचे सरपंच विश्वास पाटील, ग्रामसचिव कल्पना दिवे तसेच शिबिरासाठी पुढाकार घेणारे विजयराव चौधरी आणि अरुण पाटील तायडे हे मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. यशवंत हरणे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. कमलाकर पायस यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची प्रभावी चळवळ असून श्रमसंस्कारातून विद्यार्थ्यांमध्ये कर्तव्यभावना, शिस्त आणि समाजाशी जोडून घेण्याची प्रेरणा निर्माण होते. उद्घाटक प्रा. रोशन प्रकाश यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना प्रेरित करताना सांगितले की श्रमसंस्कार शिबिर म्हणजे शिक्षणाच्या चौकटीबाहेर जाऊन जीवन शिकण्याची संधी असून समाजासाठी काम करताना नेतृत्वगुण, संघभावना आणि संवेदनशीलता विकसित होते.प्राचार्य डॉ. मल्लू पटवाल यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिबिरातील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आणि समाजाशी नाते दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. शिबिराच्या निमित्ताने ऋणमोचनचे महात्म्य याविषयी डॉ. कमलाकर पायस तसेच पी.आर.एस. राव यांनी मार्गदर्शन करताना श्रमसंस्कार, सामाजिक जबाबदारी आणि ग्रामविकास यांचे महत्त्व स्पष्ट केले.कार्यक्रमाचे संचालन यश पवार यांनी प्रभावीपणे केले तर आभार प्रदर्शन प्रा. खेमानंद फुलझेले यांनी केले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, गावातील नागरिक तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सर्वश्री डॉ. सारिका दांडगे, डॉ. रजनी गेडाम, डॉ. शितल तायडे, डॉ. ओमप्रकाश बोबडे, डॉ. कुंदन अलोणी, आदेश गावंडे, प्रा. पूजा चोरपगार, प्रा. रवीना बेलसरे, प्रा. अमिता तंवर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, सामाजिक जाणीव आणि श्रमसंस्कार अधिक दृढ होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

## भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात शिवजयंती निमित्य व्याख्यान

# 'राष्ट्रनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी हीच शिवरायांची शिकवण- डॉ.खांडेकर




**परतवाडा** - भारतीय विद्या मंदिर, अमरावती द्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने 'छत्रपती शिवराय यांचे विचार व कार्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर हे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात प्रा. डॉ. अंकुश तुरखडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा संक्षिप्त आढावा घेतला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवा वृत्ती, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. चिखले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या ध्येयाने प्रेरित कार्य, पराक्रम, शौर्य, दूरदृष्टी आणि प्रशासन कौशल्य यांचे सविस्तर विवेचन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांनी अत्यंत सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते दूरदर्शी, लोकाभिमुख आणि मूल्याधिष्ठित राज्यकारभाराचे आदर्श उदाहरण होते. त्यांनी स्वराज्य ही संकल्पना केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित ठेवली नाही, तर ती सामाजिक न्याय, लोककल्याण आणि सर्वधर्म समभाव या तत्त्वांवर आधारलेली होती.राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये हेच गुण विकसित करणारे प्रभावी व्यासपीठ आहे. समाजकार्य, ग्रामीण विकास, पर्यावरण संवर्धन आणि जनजागृती उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि त्यांच्यात सामाजिक जबाबदारीची जाणीव दृढ होते. शिवरायांच्या जीवनचरित्रातून प्रेरणा घेऊन प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, स्त्रीसन्मान, राष्ट्रनिष्ठा आणि समाजसेवा या मूल्यांचा अंगीकार करावा. 'स्वतःच्या प्रगतीसोबत समाजाची प्रगती साधणे, हेच खरे शिवरायांचे विचार आहेत,' असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शुभम धोंडे यांनी केले. कार्यक्रमास प्रा. विशाल तायडे, प्रा. सारंग धारस्कर, प्रा. ईशान राणे, डॉ. मंगेश शेळके, प्रा. किल्लेदार, प्रा. वैष्णव, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिवासी शेतकऱ्यांसाठी बच्चू कडूंची मेळघाटातून पदयात्रा १ मार्च पासून

## ३० जून पर्यंत कर्जमाफीचा निर्णय न झाल्यास १ जुलैपासून राज्यभरात रेल रोको

**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाट व दुर्गम भागातील आदिवासी मजूर आणि शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रहार प्रमुख माजी मंत्री बच्चू कडू यांनी मेळघाटात २५० किलोमीटरची पदयात्रा काढण्याची घोषणा केली आहे. ही पदयात्रा केवळ आंदोलन नसून, मेळघाटातील वास्तव परिस्थितीचा थेट आढावा घेत सरकारला जाब विचारण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

शेतकऱ्यांना न्याय आणि संपूर्ण कर्जमाफी मिळावी, यासाठी माजी मंत्री बच्चू कडू यांनी पुन्हा आक्रमक भूमिका घेतली आहे. आज बुधवार १८ फेब्रुवारीला कुरळ पूर्णा इथं बच्चू कडू यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका जाहीर केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना गतवर्षी दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनाची आठवण करून देण्यासाठी १ मार्च ते ९ मार्च दरम्यान मेळघाटात पदयात्रा काढण्याचा निर्णय बच्चू कडू यांनी जाहीर केला. तसंच ९



मार्चनंतर राज्यभर आंदोलन छेडण्यात येणार असून ३० जूनपर्यंत सरकारनं कर्जमाफीचा निर्णय घेतला नाही, तर १ जुलैपासून राज्यभर रेल रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही बच्चू कडू यांनी दिला.

### मुख्यमंत्री आणि पालकमंत्री गंभीर नाही

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे विदर्भातील आहेत. असं असताना मेळघाटाच्या प्रश्नांकडे मुख्यमंत्र्यांनी कधीही गांभीर्यानं पाहिलं नाही. मुख्यमंत्र्यांचा मेळघाटात कधीही दौरा देखील झालेला नाही. अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे जिल्ह्यातील रेतीचे ट्रक किती धावतात, कोणाचे धावतात आणि कोणाचे धावायला नकोत या संदर्भात बैठका घेतात. मात्र मेघाटातील आदिवासींचे प्रश्न काय आहेत. या संदर्भात त्यांनी आजवर कधीही बैठक घेतली नाही,' अशी टीका देखील बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांवर केली.

बच्चू कडू यांनी सांगितलं की, रायगड किल्ल्यावर शिवजयंती पासून आंदोलनाची सुरुवात आम्ही गेल्यावर्षी केली होती. त्यानंतर गुरुकुंज मोझरी इथं उपोषण (पान २ वर)

# 'जनसंवाद'मध्ये १२०० नागरिकांनी मांडल्या समस्या

## जागेवरच १३७ तक्रारी निकाली, गावातच ऐकल्या समस्या



**अमरावती/प्रतिनिधीः-** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्हा प्रशासनाच्या वतीने नागरिकांच्या समस्या निवारणासाठी आज

### जिल्ह्यात मिळाला उत्स्फुर्त प्रतिसाद

एकाच दिवशी तालुकास्तरावर 'जनसंवाद व तक्रार निवारण' कार्यक्रम पार पडला. जिल्ह्यातील १४ तालुक्यात ११९७ तक्रारी प्रत्यक्ष येऊन समस्या मांडल्यात. यातील १३७ तक्रारींवर जागेवरच समाधान करण्यात आले.

जिल्ह्यातील आज पार पडलेल्या तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. अमरावती तालुक्यात ५२, तिवसा ३५, भातकुली ५६, दर्यापूर ८५, (पान २ वर)

# 'मुळव्याध स्पेशालिस्ट'चा भांडाफोड

## बडनेरातील कथित डॉक्टरवर गुन्हा, -मनपा आरोग्य विभागाची संयुक्त धाड

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा परिसरात स्वतःला 'मुळव्याध-भंगदर स्पेशालिस्ट' म्हणून जाहिरात करत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या एका व्यक्तीचा मनपा आरोग्य विभागाने पर्दाफाश केला आहे. अनधिकृतरीत्या उपचार व शस्त्रक्रिया केल्याच्या आरोपावरून संबंधिताविरुद्ध बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगीना मशीद परिसरातील आठवडी बाजाराजवळ गेल्या १२ ते १५ वर्षांपासून दवाखाना चालवणारे डॉ. इंद्रजीत श्रीराम सरकार यांच्याविरुद्ध जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच महाराष्ट्र वैद्यकीय



परिषदेकडे तक्रारी (पान २ वर)

### जप्तीची कारवाई -

मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, पोलिस व आरोग्य विभागाच्या संयुक्त पथकाने दवाखान्यातून विविध प्रकारची औषधे व शस्त्रक्रियेसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले. ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक व इलेक्ट्रोपॅथिक औषधांसह सुई, धागे, प्रोटॉस्कोपी साहित्य आदी सुमारे ३,५०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. 'मुळव्याध-भंगदर स्पेशालिस्ट' असा फलकही उतरवण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्यकर्तृत्व आणि विचार आजही सुसंगत

**-शिवजयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे विशेष व्याख्यान, उत्स्फूर्त प्रतिसाद**



**अमरावती/प्रतिनिधीः-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अमरावती जिल्हा प्रशासनाच्या वतीने आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत या विशेष व्याख्यानाचे आयोजन नियोजन भवन येथे करण्यात आले होते. यावेळी वक्ते प्रा. प्रेमकुमार बोके तसेच डॉ. वैभव मस्के यांनी शिवरायांची विचारधारा, व्यवस्थापन कौशल्य, कार्यकर्तृत्व, त्यांचे शौर्य तसे त्यांचे आजही सुसंगत असलेले विचार यांची यावेळी उपस्थितांना माहिती दिली.

अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे संचालक श्रीकांत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, तहसीलदार विजय लोखंडे आदी यावेळी उपस्थित होते.

प्रेमकुमार बोके यांनी छत्रपती (पान २ वर)

# पैशांच्या वादातून पित्याला मारहाण

**दारूच्या नादात मुलाचा संताप अनावर**

**अमरावती/प्रतिनिधीः-** दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याचा राग मनात धरत मुलाने स्वतःच्या वडिलांवर लोखंडी औजाराने हल्ला केल्याची धक्कादायक घटना वलगाव परिसरात घडली. या प्रकरणी वडिलांच्या तक्रारीवरून वलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



माहितीनुसार, १७ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास सतीनगर, वलगाव येथे ही घटना घडली. फिर्यादी विठ्ठल सखाराम दाभेराव हे कामावरून घरी परतले असता त्यांचा मुलगा निखिल विठ्ठल दाभेराव (वय ४०) घरात होता. त्याने दारूसाठी पैशांची मागणी केली. पैसे नसल्याचे (पान २ वर)

# सातुर्णा परिसरात बनावट मालकी दाखवून ७ लाख उकळले

## जमीन व्यवहारातून फसवणूक उघड

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वतःचीच जमीन असल्याचे भासवून ७ लाख रुपयांची रक्कम उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी १७ फेब्रुवारी रोजी राजापेठ पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

तक्रारदार राजेश शर्मा यांच्या तक्रारीनुसार, नोव्हेंबर २०२४ ते ४ डिसेंबर २०२४ दरम्यान प्रसाद नगर, सातुर्णा परिसरात



हा कथित व्यवहार झाला. फिर्यादी राजेश शर्मा यांना राजू अर्जुनलाल वावळे, संजय अर्जुनलाल वावळे, एक अज्ञात महिला, प्रमोद सुभाष ठाकरे (पान २ वर)

# भरधाव ट्रकची पिकअपला धडक; चालक गंभीर

## बडनेरा हद्दीत मध्यरात्री अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर रोडवरील चक्रधर पेट्रोल पंपासमोर भरधाव ट्रकने बोलेरो पिकअपला जोरदार धडक दिल्याने पिकअप चालक गंभीर जखमी झाल्याची घटना १६ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री उघडकीस आली. या प्रकरणी बडनेरा पोलिस ठाणे येथे आरोपी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी आतिफ मोहम्मद




आरिफ (रा. छायानगर, नागपुरी गेट) यांच्या माहितीनुसार, ते आपल्या मामा मोहम्मद साबीर मोहम्मद (पान २ वर)

# धारदार शस्त्रासह फिरणारा इसम जेरबंद

## गाडगेनगर डी.बी. पथकाची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील शेगाव जिल्हा परिषद शाळेजवळ धारदार शस्त्र घेऊन फिरणाऱ्या एका इसमाला गाडगेनगर पोलिसांच्या डी.बी. पथकाने तात्काळ कारवाई करत ताब्यात घेतले. ही कारवाई बुधवारी दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.२० वाजता करण्यात आली.

पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, एक इसम




संशयास्पद हालचाली करत शस्त्रासह परिसरात फिरत असल्याची खबर मिळताच डी.बी. (पान २ वर)

# मूकबधीर मुलीवरील अत्याचाराच्या प्रयत्नात आरोपी दोषी

**११ महिने ७ दिवस सश्रम कारावासाची शिक्षा**

**अमरावती/प्रतिनिधीः-** मूकबधीर अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या प्रयत्नप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत शिक्षा सुनावली आहे. प्रशांत अरुण आठवले (वय ४०, रा. लोणी पोलिस ठाणे हद्द, जि. अमरावती ग्रामीण) यास ११ महिने ७ दिवस सश्रम कारावास व १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.



ही कारवाई जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्र. ३) वाय. ए. गोस्वामी यांच्या न्यायालयात करण्यात आली. न्यायालयाने अपंग व्यक्ती अधिकार कायदा, २०१६ च्या कलम ९२(डी) अंतर्गत गुन्हा सिद्ध झाल्याचे नमूद केले. प्रकरणातील पीडिता ही जन्मतः मूकबधीर व मतीमंद आहे. घटनेच्या दिवशी तिचे आई-वडील बाहेर गेले असताना आरोपीने तिला घराजवळील गोठ्यात नेऊन शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी शेजारी राहणारा सुजल गवई तेथे आल्याने आरोपी घटनास्थळा (पान २ वर)

# शिवजयंतीनिमित्त अमरावतीत मांस विक्री दुकाने बंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावती महानगरपालिका हद्दीतील सर्व कत्तलखाने व मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याचे आदेश प्रशासनाकडून जारी करण्यात आले आहेत.

शहरात शिवजयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

स्वास्थ्य विभागातील अधिकाऱ्यांना आपल्या कार्यक्षेत्रातील मांस विक्रेत्यांना पूर्वसूचना देऊन १९ फेब्रुवारी रोजी दुकाने पूर्णतः बंद राहतील याची खात्री करण्यास सांगण्यात आले आहे. नियमांचे

# महावितरणचे स्मार्ट वीजमीटर पारदर्शक व ग्राहकांच्या आर्थिक बचतीचे



## - संचालक राजेंद्र पवार यांचे प्रतिपादन

**अमरावती/प्रतिनिधीः-** बदलत्या तंत्रज्ञानावर आधारित असलेले महावितरणचे स्मार्ट मीटर हे वीज ग्राहकांसाठी अत्यंत फायद्याचे आहे. या मीटरमुळे, ग्राहकांना मिळणाऱ्या विविध सुविधांची आणि आर्थिक लाभांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवा. स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या मनात काही गैरसमज असतील तर ते प्रत्यक्ष भेटीतून आणि प्रात्यक्षिकातून दूर करा, असे आवाहन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी केले. महावितरण कंपनीच्या वतीने बडनेरा बस (पान २ वर)

# बेनोडा (शहिद) येथे विहिरीत आढळला मृतदेह

**बेनोडा/प्रतिनिधीः-** घरातून अचानक बेपत्ता झालेल्या इसमाचा अखेर शेतातील विहिरीत



मृतदेह आढळल्याने बेनोडा (शहिद) परिसरात शोककळा पसरली आहे. मोहन विठ्ठलराव संपकार (वय ४३, रा. वार्ड क्र. ६, रेल्वे स्टेशन रोड) यांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

माहितीनुसार, मोहन संपकार हे मागील सात ते आठ दिवसांपासून बेपत्ता होते. कुटुंबीयांनी नातेवाईक, मित्रपरिवार व गावात सर्वत्र शोध घेतला; मात्र काहीच धागादोरा लागला नाही. अखेर त्यांच्या वडिलांनी बेनोडा पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. दरम्यान, बुधवारी (१८ फेब्रुवारी २०२६) सकाळी गावालगत हेमंत दामोदर टावरी यांच्या शेतात काम करणाऱ्या मजुराला विहिरीत पाण्यावर एक मृतदेह तरंगताना दिसला. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. ओळख पटविल्यानंतर मृतदेह मोहन संपकार यांचाच असल्याचे स्पष्ट झाले. मोहन हे विवाहित होते; मात्र मागील (पान २ वर)







